सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | गुरुवार, २७ नोव्हेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २६७ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



भ्रष्टाचाराची समस्या आज सर्वत्र विद्यमान आहे. सामान्य नागरिकापासून ते उच्चपदस्थ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वदूर भ्रष्टाचार आहे. या समस्येवर आपण काय चिंतन केले? भ्रष्टाचाराचे मूळ व्यक्तीच्या चारित्र्याच्या ऱ्हासात आहे. म्हणून चारित्र्यसंपन्न व्यक्तीच भ्रष्टाचाराचे उच्चाटन करू शकते.

**- सुरेशराव केतकर**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

## विनम्र अभिवादन



साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात अमूल्य योगदान देणारे दैनिक तरुण भारतचे संस्थापक संपादक ग. त्र्यं. माडखोलकर यांची आज पुण्यतिथी.

# भारताला राष्ट्रकुल खेळांचे यजमानपद




**◆ ग्लासगो, २६ नोव्हेंबर**

भारताला २०३० च्या कॉमनवेल्थ गेम्सचे यजमानपद मिळाले आहे. बुधवारी स्कॉटलंडमधील ग्लासगो येथे राष्ट्रकुल क्रीडा कार्यकारी मंडळाच्या बैठकीनंतर अहमदाबादला यजमान शहर म्हणून घोषित करण्यात आले, अशी माहिती केंद्रीय मंत्री मनसुख मंडाविया दिली.

२०३० मध्ये राष्ट्रकुल खेळांना १०० वर्षे पूर्ण होतील आणि या ऐतिहासिक प्रसंगी भारतात खेळांचे आयोजन करणे ही एक सन्मानाची बाब ठरणार आहे.

भारत २० वर्षांनंतर कॉमनवेल्थ गेम्सचे यजमानपद भूषवत आहे. यापूर्वी २०१० मध्ये नवी दिल्लीत या खेळांचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी भारतीय खेळाडूंनी ३८ सुवर्ण पदकांसह एकूण १०१ पदके जिंकली होती.

गेल्या महिन्यात राष्ट्रकुल खेळांच्या कार्यकारी मंडळाने अहमदाबादमध्ये खेळांचे आयोजन करण्याची शिफारस केली होती. ग्लासगो येथील महासभेच्या बैठकीत आता अंतिम मंजुरी देण्यात आली आहे. अहमदाबादसह नायजेरियातील अबुजा देखील या स्पर्धेत सहभागी होता, परंतु भारताने बाजी मारली.



केंद्रीय मंत्री मनसुख मंडावीया माहिती देताना

राष्ट्रकुल खेळ २०३४ च्या आयोजनासाठी आफ्रिकन शहराचा विचार करण्याचा निर्णय घेण्यात आला.

### ७४ सदस्य देशांच्या प्रतिनिधींची भारताला मान्यता

राष्ट्रकुल क्रीडा महासभेतील ७४ सदस्य देश आणि प्रदेशांच्या प्रतिनिधींनी भारताच्या २०३० साठीच्या बोलीला मान्यता दिली. बैठकीत भारताचे प्रतिनिधीत्व संयुक्त क्रीडा सचिवांसह भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्ष पी. टी. उषा आणि गुजरातचे क्रीडा मंत्री हर्ष संघवी यांच्यासह इतरांनी केले. यावेळी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे अध्यक्ष डॉ. डोनाल्ड रुकारे म्हणाले, भारत राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत युवाशक्ती, महत्त्वाकांक्षा, समृद्ध संस्कृती आणि प्रासंगिकता आणतो. यामुळे राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी एका नवीन सुवर्णयुगाची सुरुवात झाली. २०३४ आणि त्यानंतरच्या खेळांचे आयोजन करण्यासाठी अनेक देश उत्सुक आहेत, हे सांगताना मला आनंद होत आहे. आम्ही आमच्या राष्ट्रकुल खेळांच्या पुढील शतकाची सुरुवात सकारात्मक जोमाने करत आहोत. *(वृत्तसंस्था)*


**यंदा १५ ते १७ खेळांचा समावेश**

२०३० च्या राष्ट्रकुल स्पर्धेत १५ ते १७ खेळांचा समावेश केला जाईल. त्यात ॲथलेटिक्स आणि पॅरा-ॲथलेटिक्स, पोहणे, पॅरास्विमिंग, टेबल टेनिस आणि पॅरा टेबल टेनिस, बाउल्स आणि पॅरा बाउल्स, वेटलिफ्टिंग आणि पॅरा वेटलिफ्टिंग, कलात्मक जिम्नॅस्टिक्स, नेटबॉल आणि बॉक्सिंग आदींचा अंतर्भाव राहील.

# भारत झुगारणार चीनचा दबाव

## दुर्मिळ खनिज चुंबक उत्पादनासाठी ७,२८० कोटी मंजूर

### केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय



**◆ नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

पायाभूत सुविधा आणि औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी एकूण १९,९८१ कोटी रुपयांच्या चार मोठ्या योजनांना केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बुधवारी झालेल्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. यात संरक्षण क्षेत्र आणि इलेक्ट्रिक वाहनांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या खनिज चुंबक धातू उत्पादन योजनेसाठी ७,२८० कोटी रुपयांचा समावेश आहे. चीनच्या दबावाला झुगारण्यासाठी भारताने निर्णायक पावले उचलण्यास प्रारंभ केला आहे.

या व्यतिरिक्त पुणे मेट्रोच्या विस्तारासाठी ९,८५८ कोटी रुपये, देवभूमी द्वारका (ओखा)-कनालस रेल्वेमार्गाच्या दुपदरीकरणासाठी १,४५७ कोटी रुपये आणि बदलापूर-कर्जनत तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेसाठी १,३२४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला.

खनिज चुंबक धातू उत्पादनाला भारत गंभीरतेने घेत आहे. योजनेसाठी मंजूर केलेली रक्कम यापूर्वीच्या निधीपेक्षा तिप्पट आहे. चीनने दुर्मिळ धातूंच्या निर्यातीवर नियंत्रण आणले असताना केंद्र सरकारने हे पाऊल उचलले आहे. जगातील एकूण दुर्मिळ धातूंपैकी ६० ते ७० टक्के हिस्सा चीनचा आहे आणि त्यावरील प्रक्रियेचा विचार केला असता, हा हिस्सा ९० टक्क्यांचा आहे.

योजनेनुसार दुर्मिळ धातू चुंबकाच्या उत्पादनासाठी एकीकृत उत्पादन सुविधा विकसित करण्याचा उद्देश यामागे आहे. यात मातीतील ऑक्साईड धातूत, धातू मिश्रधातूमध्ये आणि शेवटी मिश्रधातू चुंबकांमध्ये बदल करण्याच्या प्रक्रियेचा समावेश आहे. या अंतर्गत दरवर्षी हजार मेट्रिक टन क्षमता निर्माण केली जाईल आणि दरवर्षी १२०० मेट्रिक टन क्षमतेचे प्रकल्प स्थापन केले जातील. *(वृत्तसंस्था)*

### संरक्षण उत्पादनात महत्त्वपूर्ण भूमिका

इलेक्ट्रिक वाहने, नूतनीकरणीय ऊर्जा आणि संरक्षण उत्पादनांमध्ये या दुर्मिळ धातूंचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. देशात सद्यपरिस्थितीत या क्षेत्रात मर्यादित गुंतवणूक, तांत्रिक कौशल्याचा अभाव आणि प्रकल्पांसाठी दीर्घ कालावधीसारख्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. सरकारी मदतीशिवाय सध्या व्यावसायिक उत्पादन शक्य नाही. भारतात वापर होणाऱ्या दुर्मिळ स्थायी धातू चुंबकाच्या निर्यातीसाठी चीनने परवाने देणे सुरू केले असले, तरी भारतीय कंपन्यांना अद्याप ते मिळालेले नाहीत. भारतात दरवर्षी जवळपास दोन हजार टन ऑक्साईडची मागणी असते.

# सोलापूर तरुण भारत डिजिटल न्यूज चॅनलचे आज उद्घाटन

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

वृत्तपत्राच्या क्षेत्रात गेली चार दशकं कार्यरत असणाऱ्या दैनिक तरुण भारतच्या सोलापूर तरुण भारत डिजिटल न्यूज चॅनलचा उद्घाटन सोहळा गुरुवार, २७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४.३० वाजता होटगी रोडवरील तरुण भारतच्या कार्यालयात होईल. ज्येष्ठ पत्रकार तथा महाराष्ट्र राज्य डिजिटल मीडिया संघाचे अध्यक्ष राजा माने, दैनिक तरुण भारत आणि सोलापूर तरुण भारत डिजिटल न्यूज चैनलचे कार्यकारी संचालक दिलीप पेठे, दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीनिवास बिनगुंदगी, सोलापूर तरुण भारत डिजिटल न्यूज चॅनलच्या चॅनेल हेड अश्विनी तडवळकर आदींच्या उपस्थितीत होईल.

सोलापूर तरुण भारत Solapur Tarun Bharat Digital बातमी नव्हे विचार NEWS

## महत्त्वाचे

### बाजाराची विक्रमी तेजीला गवसणी

**मुंबई** : मागील तीन सत्रात घसरणीने तोट्यात असणारा देशांतर्गत बाजार अचानक बुधवारी उसळला आणि निर्देशांक, निफ्टीत विक्रमी तेजी नोंदविण्यात आली. विविध क्षेत्रांमध्ये झालेल्या व्यापक खरेदीमुळे गुंतवणूकदारांना मोठा नफा झाला. दिवसभरातील व्यवहारात निर्देशांकाने तब्बल १०२३ अंकांची उसळी घेतली तर निफ्टीही ३२० अंकांनी वधारला. निर्देशांकात दिवसअखेर १.२१ टक्क्यांची वाढ झाली आणि तो ८५,६१० वर स्थिरावला. निफ्टी २६,२०५ वर बंद झाला. निर्देशांकात बजाज, रिलायन्स इंडस्ट्रीज, सन फार्मा आणि टाटा मोटर्स आदी शेअर्स चमकदार कामगिरी करणारे ठरले.

### ब्राझीलच्या माजी राष्ट्राध्यक्षांना २७ वर्षांची शिक्षा

**ब्राझिलिया** : ब्राझीलचे माजी राष्ट्राध्यक्ष ७० वर्षीय जायर बोल्सोनारो यांना सर्वोच्च न्यायालयाने सत्तांतराचा कट रचल्याप्रकरणी २७ वर्षांची शिक्षा सुनावली. मंगळवारी हा निर्णय देण्यात आला. त्यांनी २०२२ च्या राष्ट्रपती निवडणुकीत पराभव होऊनही सत्तेत राहण्यासाठी सध्याचे राष्ट्राध्यक्ष लुला डी सिल्वा यांचे सरकार पाडण्याचा कट रचला होता.

# अपक्षांना चिन्हांचे वाटप; प्रचारासाठी अवघे चारच दिवस

## जिल्ह्यातील ११ नगरपालिकांच्या प्रचाराचा धुरळा सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

जिल्ह्यातील अनगर नगरपंचायतीची निवडणूक बिनविरोध झाली. तर उर्वरित ११ नगरपालिकेची निवडणूक लागली आहे. एकूण ११ नगराध्यक्षपदासाठी ६६ तर २७२ नगरसेवक पदाच्या निवडीसाठी ९५१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. प्रामुख्याने महायुतीत राजकीय संघर्ष असून, महाविकास आघाडीने मात्र अनेक ठिकाणी एकीची मूठ बांधली आहे. राष्ट्रीय व राज्यस्तरीय पक्षाची चिन्हे आहेत, त्यांनी अर्ज छाननी होताच प्रचारास शुभारंभ केला. मात्र अपक्ष उमेदवारांना अधिकृत निवडणूक चिन्हांचे वाटप बुधवारी झाल्याने प्रचारासाठी त्यांच्या हातात अवघे चारच दिवस राहिले आहेत.



अपक्ष उमेदवारांना मतदारांपर्यंत आपले चिन्ह पोचवण्यासाठी आता केवळ चार दिवस मिळणार आहेत. याउलट, राष्ट्रीय व राज्यस्तरीय पक्षांचे उमेदवार २१ नोव्हेंबरपासूनच चिन्हासह जोमात प्रचार करत आहेत. त्यामुळे पक्षीय उमेदवारांना मिळालेल्या आघाडीच्या तुलनेत अपक्षांना मोठी कसरत करावी लागणार आहे. जिल्ह्यातील ११ नगरपरिषदांचे २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. तर निकाल ३ डिसेंबरला आहे.

अपक्षांमुळे निवडणुकीत अधिक चुरस निर्माण आहे. काही ठिकाणी स्थानिक आघाड्या निर्माण झाल्या आहेत. बार्शी नगराध्यक्षपदासाठी सहा तर नगरसेवक पदासाठी १२० उमेदवार, पंढरपूर नगराध्यक्षपदासाठी पाच तर नगरसेवक पदासाठी १३३ उमेदवार, अक्कलकोट नगराध्यक्षपदासाठी सहा तर नगरसेवक पदासाठी ७६ उमेदवार, अकलूज नगराध्यक्ष पदासाठी पाच तर नगरसेवक पदासाठी ९१ उमेदवार, सांगोला नगराध्यक्षपदासाठी ११ तर नगरसेवक पदासाठी १०३ उमेदवार, करमाळा नगराध्यक्षपदासाठी पाच तर नगरसेवक पदासाठी ७१ उमेदवार, कुर्डुवाडी नगराध्यक्षपदासाठी सहा तर नगरसेवकपदासाठी १०३ उमेदवार, मंगळवेढा नगराध्यक्षपदासाठी तीन तर नगरसेवक पदासाठी ५८ उमेदवार, मोहोळ नगराध्यक्षपदासाठी ११ तर नगरसेवक पदासाठी ७९ उमेदवार, दुधनी नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदासाठी ५ तर नगरसेवक पदासाठी ५३ उमेदवार, मैंदर्गी नगराध्यक्षपदासाठी २ तर नगरसेवक पदासाठी ४७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

# संविधान हा राष्ट्रीय अस्मिता आणि आदर्शांचा ग्रंथ : राष्ट्रपती मुर्मू



**◆ नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

भारतीय संविधान हे राष्ट्रीय अस्मिता आणि आमच्या आदर्शांचा ग्रंथ आहे, गेल्या अनेक दशकात संसदेने संविधानातील मूल्यांनुसार वाटचाल करत जनतेच्या आकांक्षांची अभिव्यक्ती करणारे अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले असल्याचे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्म यांनी आज येथे केले.

संविधान दिनानिमित्त संविधान सभेत म्हणजे जुन्या संसद भवनातील केंद्रीय कक्षात आयोजित कार्यक्रमात राष्ट्रपती मुर्मू बोलत होत्या. यावेळी उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन , पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला, सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, राज्यसभेतील सत्तापक्षनेते जेपी. नड्डा, विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. संविधान सभेने सांसदीय प्रणाली स्वीकारण्याबाबत जे अनेक तर्क दिले, ते आजही प्रासंगिक आहे, याकडे लक्ष वेधत मुर्मू म्हणाल्या की, जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या आपल्या देशातील संसद लोकभावनेची अभिव्यक्ती करण्यात जगातील अनेक देशांसाठी आदर्श आहे.

संविधानाच्या माध्यमातून सामूहिक आणि व्यक्तिगत स्वाभिमानाचे जतन झाले पाहिजे, अशी आमच्या संविधान निर्मात्याची इच्छा होती, असे स्पष्ट करत मुर्मू म्हणाल्या की, याची पूर्तता आपल्या संसदेच्या माध्यमातून झाली आहे, संसदेने लोकांच्या आकांक्षाची वेळावेळी पूर्तता केली, याबद्दल सर्व संसद सदस्यांचे मी अभिनंदन करते. *(तभा वृत्तसेवा)*

## राष्ट्रीय कर्तव्याला प्राधान्य द्या

### देशवासीयांना लिहिलेल्या पत्रात मोदींचे आवाहन

**◆ नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

आपल्या देशाची विकसित भारताच्या दिशेने वाटचाल सुरु झाली आहे, त्यामुळे देशातील नागरिकांनी आपल्या राष्ट्रीय कर्तव्याला प्राधान्य देण्याची गरज असल्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केले.



संविधान दिनानिमित्त देशवासीयांना उद्देशून लिहलेल्या पत्रात मोदी यांनी म्हटले आहे की, १९४९ मध्ये आपल्या देशाने ऐतिहासिक असे जे संविधान स्वीकारले, त्या संविधानाचे देशाच्या स्थायी प्रगतीत मोठे योगदान आहे. २०१५ मध्ये मोदी यांनी या पवित्र संविधानाचा सन्मान म्हणून दरवर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार आज हा कार्यक्रम झाला.

सर्वसामान्य परिस्थितीतील नागरिकांना संविधानाने देशाची सर्वोच्च पातळीवरील सेवा करण्यासाठी सशक्त केले, याकडे लक्ष वेधत मोदी यांनी या पत्रात म्हटले की, संविधानाने देशातील नागरिकांना स्वप्न पाहण्याची तसेच ते साकार करण्याची शक्ती दिली आहे.

संविधानाच्या अंतर्गत सरकारने आतापर्यंत हे निर्णय घेतले वा धोरण बनवली त्यामुळे येणाऱ्या पिढ्यांच्या जीवनाला आकार मिळणार आहे, यामुळे देशाची प्रगतिपथावर वाटचाल होणार आहे, असे पंतप्रधान म्हणाले. *(तभा वृत्तसेवा)*



## महत्त्वाचे

### एचपी कंपनीत मोठी कर्मचारी कपात

**न्यूयॉर्क** : अमेरिकन टेक कंपनी एचपी इंकने जागतिक स्तरावर ४,००० ते ६,००० कर्मचाऱ्यांची कपात करण्याची योजना आखली आहे. कंपनीची ही योजना २८ म्हणजेच आर्थिक वर्ष २०२८ च्या अखेरपर्यंत पूर्ण होईल. कंपनीचे म्हणणे आहे की, मेमरी चिपच्या किमती वाढल्यामुळे खर्च वाढत आहे, त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला. तसेच, एआय (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) वर लक्ष केंद्रित करण्यासाठी ऑपरेशन्स सुव्यवस्थित केली जात आहेत. यामुळे कंपनीला तीन वर्षांत १ अब्ज डॉलर म्हणजेच ८,९२७ कोटी रुपयांची एकूण बचत होईल. कंपनीकडे सध्या सुमारे ५८,००० कर्मचारी आहेत. या वर्षाच्या सुरुवातीलाही कंपनीने १,००० ते २,००० कर्मचाऱ्यांची कपात केली होती.

### यूपीएससीच्या तयारीसाठी घरातून पळून गेली मुलगी

**भोपाळ** : मध्यप्रदेश उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे भोपाळमधील एका मुलीचे आयएएस बनण्याचे स्वप्न साकार होणार आहे. न्यायालयाने बिहारमधील एका महिला आयएएस अधिकाऱ्याला तिचे मेंटॉर आणि मार्गदर्शक बनवले आहे, जेणेकरून ती नागरी सेवा परीक्षेची तयारी करू शकेल. तिच्या वडिलांनी जबरदस्तीने लग्नासाठी दबाव टाकल्यामुळे ती मुलगी घरातून पळून गेली होती. तिला शिक्षण सुरू ठेवायचे होते आणि नागरी सेवा परीक्षा द्यायची होती, तर वडील तिच्यावर लग्नासाठी दबाव टाकत होते. एका खाजगी कंपनीत काम करून ती आपला खर्च भागवत असे आणि त्यातच शिकवणीही करत असे. वडिलांच्या तक्रारीवरून पोलिसांनी तिला शोधून काढले. मात्र, तिला घरी परतण्यापेक्षा शिक्षण महत्त्वाचे वाटले. या प्रकरणी उच्च न्यायालयात तिला हजर केले असता संपूर्ण प्रकार ऐकून मुख्य न्यायमूर्ती संजीव सचदेवा आणि न्यायमूर्ती विनय सराफ यांच्या खंडपीठाने तिला एक हुशार मुलगी मानले आहे.

### विद्यार्थिनींना अश्लील संदेश पाठवणारा शिक्षक निलंबित

**दिंडोरी** : मध्यप्रदेशातील दिंडोरी येथे एका शिक्षकाला १२वीच्या विद्यार्थिनींशी आक्षेपार्ह वर्तन केल्याच्या आरोपावरून निलंबित करण्यात आले. तो मुलींना आक्षेपार्ह संदेश पाठवत असे. तो म्हणायचा की, मला एकट्यात भेट नाहीतर नापास करेन. ही घटना दिंडोरी जिल्ह्यातील अमरपूर येथील सांदिपनी शाळेतील आहे. तेथील शिक्षक प्रशांत साहू यांच्यावर आक्षेपार्ह वर्तन केल्याचा आरोप आहे. आरोपी शिक्षक प्रशांत साहू यांची नियुक्ती २०२३ साली दिंडोरी जिल्ह्यात झाली होती. शाळेतील विद्यार्थिनी उपसरपंच आणि एका महिला शिक्षिकेसह एसपी वाहिनी सिंह यांच्या कार्यालयात पोहोचल्या.

### बहुपत्नीत्वावर बंदीसाठी आसाम सरकारचे विधेयक

**गुवाहाटी** : आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी बहुपत्नीत्वावर बंदी घालण्यासाठी विधानसभेत एक विधेयक मांडले. सभापती विश्वजित दैमारी यांच्या परवानगीने, सरमा यांनी आसाम बहुपत्नीत्व प्रतिबंधक विधेयक, २०२५ सादर केले. विरोधी पक्ष काँग्रेस, सीपीआय(एम) आणि रायजोर दलाच्या आमदारांच्या अनुपस्थितीत हे विधेयक मांडण्यात आले. त्यांनी गायिका झुबीन गर्ग यांच्या मृत्यूवरील चर्चेनंतर सभात्याग केला. हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी हे विधेयक मांडण्यात आले आणि नंतर ते चर्चेसाठी आणि मंजूरीसाठी घेतले जाईल.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| **सेन्सेक्स** | ८५,६०९.५१ (+१,०२२.५०) |
| **निफ्टी** | २६,२०५.३० (+३२०.५०) |



### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टँडर्ड/१० ग्रॅम) | रु. १,२५,३०० |
| **चांदी** (प्रतिकिलो) | रु. १,५७,७०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३२.६ | १८.० |
| अमरावती | ३१.४ | १६.३ |
| भंडारा | ३०.० | १२.० |
| बुलडाणा | ३१.० | १८.५ |
| चंद्रपूर | ३०.२ | १८.२ |
| गडचिरोली | ३०.२ | १६.२ |
| गोंदिया | २९.२ | १६.२ |
| नागपूर | ३०.० | १७.६ |
| वर्धा | ३०.० | १८.० |
| वाशीम | ३३.६ | १४.० |
| यवतमाळ | ३२.० | १९.६ |

# दहशतवादी हल्ले सहन करणार नाही

## अमित शाह यांचे प्रतिपादन, २६/११ च्या हल्ल्यातील मृतकांना श्रद्धांजली


◆ **नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

वर्ष २००८ मध्ये २६/११ रोजी दहशतवाद्यांनी मुंबईवर केलेला भ्याड हल्ला घृणास्पद आणि अमानवीय कृत्य होते. दहशतवादी हल्ल्यांना धैर्याने तोंड देताना ज्या शूर सैनिकांनी आपले प्राण अर्पण केले त्यांना मी सलाम करतो आणि यावेळी मृत झालेल्या नागरिकांना मी श्रद्धांजली अर्पण करतो. दहशतवादाविरोधात भारताचे शून्य सहनशीलतचे धोरण असल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटले आहे.




मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या हुतात्म्यांच्या शहीद स्मारकाला अभिवादन करताना पोलिस अधिकारी

शाह यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, दहशतवाद हा कोणत्याही एका देशासाठी नव्हे, तर संपूर्ण मानवतेसाठी शाप आहे. सरकारचे दहशतवादाविरुद्ध शून्य सहनशीलतेचे धोरण स्पष्ट आहे आणि संपूर्ण जग त्याचे कौतुक करत आहे. भारताच्या दहशतवादविरोधी कारवायांना जगाचा व्यापक पाठिंबा मिळत आहे. कोणत्याही परिस्थितीत सीमापार दहशतवाद खपवून घेतला जाणार नाही. ऑपरेशन सिंदूर याचे उदाहरण आहे, आणि यापुढे दहशतवाद्यांनी चूक केल्यास, त्यांना किंमत चुकवावी लागेल. (वृत्तसंस्था)



> २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यावेळी देशातील लोकांचे रक्षण करण्यासाठी आपले प्राण अर्पण करणाऱ्या शूर सैनिकांना मी विनम्र श्रद्धांजली अर्पण करते. भारत सर्व प्रकारच्या दहशतवादाविरुद्ध लढण्यासाठी वचनबद्ध आहे.
>
> - **द्रौपदी मुर्मू,** राष्ट्रपती

> २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात प्राण गमावलेल्या सर्व निष्पाप नागरिकांना मी विनम्र श्रद्धांजली वाहतो. दहशतवाद्यांच्या भ्याड कृत्यांमुळे आपण अनेक प्रियजन गमावले, परंतु आपल्या शूर पुत्रांनी शौर्याने दहशतवाद्यांना उत्तर दिले.
>
> - **नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

> मुंबईत २६/११ रोजी झालेला दहशतवाद्यांचा भ्याड हल्ला मानवतेविरोधात होता. पोलिस, सुरक्षा दल आणि शूर वीरांनी जीवाची तमा न बाळगता निकराने लढा दिला. या हल्ल्यात प्राण गमावलेल्या नागरिकांना मी श्रद्धांजली अर्पण करतो.
>
> - **देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

> मुंबईवर झालेला हल्ला हा मुंबईच्या इतिहासातील काळा दिवस होता. मी शहिदांना अभिवादन करतो आणि ज्या निरपराध लोकांचा बळी गेला आहे त्यांना आदरांजली अर्पित करतो.
>
> - **एकनाथ शिंदे,** उपमुख्यमंत्री

# जगातील ८० टक्के लोकसंख्या आता शहरवासी

### संयुक्त राष्ट्राच्या अहवालातील निष्कर्ष

◆ **न्यूयॉर्क, २६ नोव्हेंबर**

जगातील ८० टक्के लोकसंख्या आता शहरात राहते. प्रत्येकाला गावांची आठवण येते आणि ते त्यांच्या जुन्या जीवनशैलीची आकांक्षा बाळगतात, परंतु शहरीकरणाचे आकर्षणदेखील आश्चर्यकारक आहे. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार, जगातील ८० टक्के लोकसंख्या आता शहरी भागात राहते. याचे कारण असे की, मोठ्या प्रमाणात स्थलांतरामुळे लोक शहरांकडे वळले आहेत. शिवाय, विकासाच्या शर्यतीत अशी अनेक गावे आहेत जी आता शहरांमध्ये रूपांतरित झाली आहेत.

संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार, वर्ल्ड अर्बनायझेशन प्रॉस्पेक्ट्स २०२५, जगातील जवळपास ८१ टक्के लोकसंख्या आता शहरात राहते. विशेष म्हणजे, २०१८ मध्ये हा आकडा फक्त ५५ टक्के होता. अहवालानुसार, ४५ टक्के लोक शहरांमध्ये राहतात, तर ३६ टक्के लोक शहरांमध्ये राहतात. हा अहवाल पॅट्रिक गेरलँड यांच्या नेतृत्वाखाली तयार करण्यात आला होता. शिवाय, असा अंदाज आहे की, २०५० पर्यंत जगातील ८३ टक्के लोकसंख्या शहरात राहील. हा अहवाल तयार करताना, वेगवेगळ्या देशांचे मापदंड विचारात घेण्यात आले. उदाहरणार्थ, जपानमध्ये ५० हजार लोकसंख्येला शहर मानले जाते. तथापि, डेन्मार्कमध्ये ही संख्या फक्त २०० लोकांची आहे.

**अहवालातील निकष**

या अहवालासाठी निकष ५० हजार लोकसंख्या आणि प्रति चौरस किलोमीटर किमान १५०० लोक होते. शिवाय, शहरांसाठी ही संख्या ५००० आणि प्रति चौरस किलोमीटर ३०० लोकांची लोकसंख्या होती. अशाप्रकारे जगातील लोकसंख्येच्या फक्त १९ टक्के लोक आता खेड्यांमध्ये राहतात. अहवालानुसार, जगातील सर्व भागात शहरीकरण वाढत आहे.

भारतासारख्या दक्षिण आशियाई देशांबद्दल अहवालात असे म्हटले आहे की, लोक प्रामुख्याने शिक्षण आणि रोजगारासाठी शहरांकडे स्थलांतरित होत आहेत. अहवालात असेही म्हटले आहे की, अनियोजित शहरीकरणामुळे काही समस्या निर्माण होत आहेत. उदाहरणार्थ, जर पुरेशा सार्वजनिक वाहतुकीशिवाय शहरे वाढली तर जगणे कठीण होते. खाजगी वाहनांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्यामुळे प्रदूषण वाढत आहे. (वृत्तसंस्था)

# टीजेएसबी आणि श्रीराम लाईफ इन्शुरन्समध्ये भागीदारी करार

◆ **ठाणे, २६ नोव्हेंबर**

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड आणि श्रीराम लाइफ इन्शुरन्स कंपनी यांच्यात व्यावसायिक करार झाला आहे. व्यावसायिक भागीदार म्हणून टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड आणि श्रीराम लाइफ इन्शुरन्स कंपनी महाराष्ट्र, मध्यप्रदेश, गुजरात, कर्नाटक आणि गोवा या राज्यांतील ग्राहकांना विमा सेवा उपलब्ध करून देणार आहेत.



या करारान्वये, आयआरडीएआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कॉर्पोरेट एजंट म्हणून टीजेएसबी सहकारी बँक श्रीराम लाइफच्या विमा उत्पादनाचे वितरण आपल्या एकशे बासष्ट शाखांच्या माध्यमातून करणार आहे. पहिल्यांदाच विमा घेणारे ग्राहक, अल्प आर्थिक उत्पन्नातील कुटुंबे यांना परवडणारी आणि सुलभ विमा उत्पादने उपलब्ध करून देणे हा या कराराचा उद्देश आहे. टीजेएसबीचा पाच राज्यात विस्तारलेला व्यवसाय, ग्राहकांसोबत असेलला आपुलकीचा व्यवहार आणि श्रीराम लाइफ इन्शुरन्स कंपनीची ग्राहकांना संरक्षण देणारी परवडणाऱ्या उत्पादनांवर आधारित रचना यांचा समन्वय निमशहरी आणि ग्रामीण भागात विमा प्रसार करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

या कराराविषयी बोलताना टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल आरेकर म्हणाले, टीजेएसबी बँकेचे उद्दिष्ट आमच्या ग्राहकांचे आर्थिक सक्षमीकरण हे आहे. श्रीराम लाइफ इन्शुरन्ससोबतच्या या कॉर्पोरेट एजन्सी भागीदारीद्वारे विशेषतः मध्यम व अल्प आर्थिक उत्पन्न गटातील कुटुंबांना विश्वासार्ह आणि परवडणारे संरक्षण उपाय उपलब्ध करून त्यांच्या दीर्घकालीन सुरक्षिततेला बळकटी देण्याचा आमचा प्रयत्न आहे.

श्रीराम लाइफ इन्शुरन्सचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी कॅस्पारस जे.एच. क्रॉमहोउट म्हणाले, या सहकार्याद्वारे आम्ही तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विमा सेवेचा अधिक विस्तार करू. '२०४७ पर्यंत सर्वांसाठी विमा' या भारत सरकारच्या उद्दिष्टपूर्तीत योगदान देऊ. आम्ही प्रत्येक घरपर्यंत सोपा, सुलभ आणि उपयुक्त विमा पोहोचवण्याचा प्रयत्न करणार आहोत, ज्यामुळे प्रत्येक कुटुंब निर्धास्तपणे आपले भविष्य सुरक्षित करू शकेल. वा

# तीन लाखांत विकणार होते 'टीईटी' ची प्रश्नपत्रिका

### मुख्य आरोपींच्या पोलिस कोठडीत चार दिवसांनी वाढ

### १६ जणांची कळंब कारागृहात रवानगी

### विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खेळखंडोबा, एकूण १८ जणांना

◆ **कोल्हापूर, २६ नोव्हेंबर**

शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्राला बदनाम करणाऱ्या घटना वारंवार घडत आहेत. कोल्हापूर येथे पैसे देऊन शिक्षक पात्रता चाचणीची प्रश्नपत्रिका फोडल्याचे प्रकरण उघडकीस आले असून याप्रकरणी आतापर्यंत १८ जणांना अटक करण्यात आली आहे. मुख्य आरोपी महेश गायकवाड आणि राहुल पाटील यांच्या पोलिस कोठडीत चार दिवसांची वाढ केली असून अन्य १६ जणांना न्यायालयीन कोठडी मिळाल्याने त्यांची कळंब येथील कारागृहात रवानगी केली आहे.

प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळांमध्ये शिक्षक भरतीसाठी शिक्षक पात्रता चाचणी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. राज्यात २३ नोव्हेंबरला टीईटी परीक्षा झाली. परीक्षेच्या तोंडावरच पैसे घेऊन पेपर विकल्याचे प्रकरण उघडकीस आले. काही जण प्रश्नपत्रिका एकमेकांना वितरीत करीत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी कारवाई सुरू केली. तब्बल तीन लाखाला प्रश्नपत्रिका विकल्या गेली. महेश गायकवाड हा प्रश्नपत्रिका विकणाऱ्या टोळीचा म्होरक्या असून त्याच्यासह आतापर्यंत १८ आरोपींना अटक केल्याचे पोलिसांनी सांगितले.

पेपरच्या एक दिवस अगोदर म्हणजे २२ नोव्हेंबरलाच प्रश्नपत्रिका बाहेर आली. पेपर फुटीची माहिती मिळताच मुरगूड पोलिस स्ठेशनचे पथक आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी कागल तालुक्यातील सोनगे गावातील एका फर्निचरच्या दुकानात धाड टाकली. यावेळी तेथे पाच 'गुरूजी' उपस्थित होते. ते सर्व प्रश्नपत्रिकेची वाट पाहत होते. पोलिसांनी चौकशी केली असता कुणी तरी राहुल पाटील नावाचा व्यक्ती प्रश्नपत्रिका घेऊन येणार असल्याचे या गुरूजींनी सांगितले. पोलिसांनी लगोलग राहुल पाटीलला अटक केली असता त्याने महेश गायकवाडचे नाव सांगितले. प्रश्नपत्रिका भेटताच राहुल तीन लाख रुपये महेश गायकवाडला देणार होता. यानंतर सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड येथून महेशलाही अटक करण्यात आली. (वृत्तसंस्था)

**आणखी काही जणांच्या अटकेची शक्यता**

प्रश्नपत्रिका फोडणारे ही टोळी मोठी असण्याची शक्यता आहे. आतापर्यंत १८ जणांना अटक करण्यात आली असता या प्रकरणाची चौकशी अद्यापही सुरूच आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात आरोपींची संख्या वाढू शकते. प्रश्नपत्रिका उपलब्ध करून देणारे आणि लाभधारक यांची चौकशी सुरू असून आर्थिक व्यवहाराचीही सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. राहुल पाटील आणि महेश गायकवाड यांची अकॅडमी असून त्यांनी यापूर्वीही असेच प्रकार केल्याची शक्यता आहे.

**आरोपी कळंब येथील कारागृहात**

या प्रकरणातील रणधीर तुकाराम शेवाळे, संदीप भगवान गायकवाड, अमोल पांडुरंग जरग, स्वप्निल शंकर पोवार, गुरूनाथ गणपती चव्हाण, तेजस दीपक मुळीक, प्रणय नवनाथ सुतार, श्रीकांत नथुराम चव्हाण, संदीप शिवाजी चव्हाण, दयानंद भैरू साळवी, किरण सातापा बरकाळे, दत्तात्रय आनंदा चव्हाण, नागेश दिलीप शेंडगे, अक्षय नामदेव कुंभार, रोहित पांडुरंग सावंत, अभिजित विष्णू पाटील यांना न्यायालयीन कोठडी मिळाली असून त्यांची कळंब येथील कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

# प्रॉपर्टी एक्स्पोमध्ये बँक ऑफ बडोदाची उल्लेखनीय उपस्थिती

### घर बांधणी क्षेत्रात दमदार कामगिरी

◆ **नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील आघाडीची बँक असणाऱ्या बँक ऑफ बडोदाने यशोभूमी येथे आयोजित प्रॉपर्टी एक्स्पो दिल्ली आवृत्तीत आपली उल्लेखनीय उपस्थिती नोंदवली. बँकेच्या नेतृत्वात विशेष रूपात आयोजित आणि संचालित या प्रदर्शनात घर खरेदी करण्यास इच्छुकांसाठी विविध पर्याय उपलब्ध करून देण्यात आले. एवढेच नाही तर घर खरेदीसाठी आर्थिक सहाय्य मिळवून देण्याकरिता एक अद्वितीय व्यासपीठही प्रदान केले.




या दोन दिवसीय आयोजनात दिल्ली, गुडगाव, नोएडा, ग्रेटर नोएडा, गाझियाबाद आणि फरीदाबाद येथील जवळपास २० प्रमुख विकासक एकत्र आले होते. त्यांच्या वतीने उच्च गुणवत्तेच्या निवासी प्रकल्पांची एक विस्तृत शृंखला सादर करण्यात आली. प्रदर्शनाच्या पहिल्या दिवशी घर खरेदी करणाऱ्यांची प्रचंड गर्दी झाली होती.

योग्य आर्थिक भागीदार मिळणे ही घर खरेदी प्रक्रियेतील एक महत्त्वाची बाब असते आणि बँक ऑफ बडोदाने व्यक्तिगत कर्जविषय सल्ला, ऑन द स्पॉट सैद्धांतिक अनुमोदन आणि महिला कर्जदारांसाठी विशेष सवलतीच्या व्याजदरांसह येणाऱ्यांना योग्य मार्गदर्शन केले.

प्रदर्शनाच्या ठिकाणी गृहकर्ज घेणाऱ्यांना व्याजदरात सूटही देण्यात आली. विशेष म्हणजे, या दोन दिवसात मंजूर झालेल्या सर्व कर्जांसाठी कोणतेही प्रक्रिया शुल्क घेण्यात आले नाही. वा

# एसयूव्ही-ट्रकच्या धडकेत पाच जण ठार

◆ **जंजगीर, २६ नोव्हेंबर**

छत्तीसगडच्या जांजगीर-चंपा जिल्ह्यात एका एसयूव्ही आणि ट्रकमध्ये झालेल्या धडकेत पाच जणांचा मृत्यू झाला तर तीन जण जखमी झाले.

बुधवारी मध्यरात्री जांजगीर हद्दीतील सुकली गावाजवळ हा अपघात झाला. मृतांमध्ये सर्वजण नवागडमधील एका परिसरातील रहिवासी होते. लग्न समारंभाला उपस्थित राहून परत येत असताना ही घटना घडली. एसयूव्ही कारमधील पाच जणांचा जागीच मृत्यू झाला तर तीन जण जखमी आहेत. जखमी झालेल्या तिघांनाही जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती गंभीर आहे. मृतांची ओळख विश्वनाथ देवांगन, राजेंद्र कश्यप, पोमेश्वर जलतारे, भूपेंद्र साहू आणि कमलनयन साहू अशी झाली आहे, (वृत्तसंस्था)

# भारत, जपान तयार करीत आहेत 'थर्टी मीटर टेलिस्कोप'

### पृथ्वीच्या पलीकडे जीवनाची चिन्हे शोधणार

### कृष्णविवर, आकाशगंगांचा करता येणार अभ्यास

◆ **बंगळुरू, २६ नोव्हेंबर**

भारत आणि जपान जगातील सर्वात महत्त्वाकांक्षी खगोलशास्त्रीय उपकरणांपैकी एक असलेला थर्टी मीटर टेलिस्कोप तयार करण्यासाठी एकत्र येत आहेत. ही अत्याधुनिक ऑप्टिकल-इन्फ्रारेड दूर्बिण आहे. यामध्ये एक भव्य ३० मीटर प्रायमरी मिरर आहे.

थर्टी मीटर टेलिस्कोप हा भारत, जपान आणि अमेरिकेतील दोन आघाडीच्या विद्यापीठांचा समावेश असलेला एक आंतरराष्ट्रीय भागीदारीचा प्रकल्प आहे. विश्वात पूर्वीपेक्षा जास्त खोलवर डोकावणे, कृष्णविवरे, दूरच्या आकाशगंगांचा अभ्यास करणे आणि सर्वात मनोरंजक म्हणजे पृथ्वीच्या पलीकडे जीवनाची चिन्हे शोधणे हे या प्रकल्पाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. खगोलशास्त्रज्ञांना दूरच्या विश्वातून अधिक प्रकाश गोळा करण्यासाठी मोठा आरसा आवश्यक आहे, असे जपानच्या टोकियो येथील कॅबिनेट ऑफिसमधील राष्ट्रीय अंतराळ धोरण समितीचे उपाध्यक्ष डॉ. साकू त्सुनेता यांनी स्पष्ट केले. आरसा जितका मोठा असेल तितके जास्त दूरच्या वस्तूंबद्दल अधिक चांगला शोध लावणे शक्य होते, असे ते म्हणाले.

सध्या जगात असलेल्या सर्व दूर्बिणींपेक्षा या थर्टी मीटर टेलिस्कोपचा आरसा सर्वात लहान आहे. यामुळे निरीक्षणांमध्ये अभूतपूर्व स्पष्टता आणि बारकावे दिसतील. एकाच मोठ्या आरशासह पारंपारिक दुर्बिणींपेक्षा वेगळे, थर्टी मीटर टेलिस्कोपसाठी महाकाय प्रायमरी मिरर तयार करण्यासाठी ५०० लहान आरशांचा वापर केला आहे. या जटिल अभियांत्रिकी कामगिरीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाची आवश्यकता आहे.

या गोष्टींसाठीच भारताची भूमिका महत्त्वाची आहे. हा टेलिस्कोप थर्टी मीटर टेलिस्कोप हा २०३० च्या मध्यापर्यंत कार्यान्वित होण्याची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)

# 'दृश्य-अदृश्य'ची 'इफ्फी'मध्ये जादू

### वरोड्याचे अनिल वरखडे निर्मित मराठी चित्रपट

◆ **वरोडा, २६ नोव्हेंबर**

५६ व्या आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट महोत्सव म्हणजेच 'इफ्फी' सध्या गोव्यात मोठ्या दिमाखात सुरू आहे. भारतीय सिनेसृष्टीतील दिग्गज कलाकार-तंत्रज्ञांच्या उपस्थितीमुळे 'इफ्फी'ने सर्वांचे लक्ष वेधले आहे. देश-विदेशांतील विविध भाषांमधील चित्रपटांसोबत महाराष्ट्राच्या लाल मातीतील मराठी चित्रपटही जगभरातील सिनेप्रेमी आणि समीक्षकांवर मोहिनी घालत आहेत. यामध्ये वरोडा येथील अनिल वरखडे निर्मित 'दृश्य-अदृश्य' या आगळ्या विषयावर आधारलेल्या मराठी चित्रपटाने प्रेक्षकांवर जादू केली आहे.




नुकतेच 'इफ्फी'मध्ये झालेल्या 'दृश्य-अदृश्य' चित्रपटाला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कौतुक केले. आरएसटी कॅनव्हास निर्मित आणि मिलिंद लेले दिग्दर्शित 'दृश्य-अदृश्य' या सस्पेन्स थ्रिलर चित्रपटाची निवड प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी झाल्यापासून या चित्रपटाची चर्चा सर्वत्र रंगू लागली आहे. प्रद्योत पेंढारकर, वरोड्याचे अनिल वरखडे, दत्ताजी थोरात, धनंजय थोरात, पृथ्वीराज खेडकर, युवराज खेडकर आणि अश्विनी खेडकर यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे.

मिलिंद लेले यांनी चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. 'इफ्फी'मध्ये 'दृश्य-अदृश्य'ची निवड होण्याचा क्षण मराठी सिनेसृष्टी, कलाकार आणि तंत्रज्ञांसाठी अभिमानाचा ठरला आहे. मराठीपासून हिंदीपर्यंत अभिनयाचा यशस्वी प्रवास करणारी अभिनेत्री पूजा सावंतने या चित्रपटात मुख्य भूमिका साकारली आहे. पूजाने साकारलेल्या व्यक्तिरेखेचे इफ्फीमध्ये खूप कौतुक झाले. चित्रपटाचा शो संपल्यानंतर प्रेक्षकांनी उभे राहून चित्रपटाच्या संपूर्ण टिमचे अभिनंदन केले आणि चित्रपट आवडल्याची पोचपावती दिली.

इफ्फीमधील इंडियन पॅनोरमा या विभागात हा चित्रपट दाखविण्यात आला. इफ्फीमध्ये 'दृश्य-अदृश्य' चित्रपटाचे चार वेळा स्क्रिनिंग करण्यात आले आणि प्रत्येक वेळी रसिकांनी भरभरून दाद दिली. आशयघन पटकथा, प्रसंगानुरूप सादरीकरण, अर्थपूर्ण संवाद, कथानकाला पोषक वातावरणनिर्मिती, कलाकारांचा सहजसुंदर अभिनय आणि मिलिंद लेले यांचे संवेदनशील दिग्दर्शन प्रेक्षकांना शेवटच्या क्षणापर्यंत खुर्चीला खिळवून ठेवणारे ठरले. 'दृश्य-अदृश्य' हा मानवी मनाच्या गूढ गाभ्यापर्यंत नेणारा एक रहस्य आणि भावनांच्या संगमातून जन्मलेला चित्रपट आहे.

आपल्या डोळ्यांना दिसणारे आणि सत्य यांच्या संभ्रमात गुरफटवून ठेवणारी पटकथा क्षणाक्षणाला उत्कंठा वाढविणारी आहे. वास्तव आणि भ्रम याच्यातील सीमारेषा धूसर होत गेल्या की, सत्याचे 'दृश्य' किती 'अदृश्य' होते, हे या चित्रपटात प्रभावीपणे दाखविण्यात आले आहे. पूजा सावंतच्या जोडीला या चित्रपटात अशोक समर्थ, हार्दिक जोशी आणि अक्षया गुरव आदी लोकप्रिय कलाकार मुख्य भूमिकेत आहेत. (तभा वृत्तसेवा)

# पान मसाला व्यापाऱ्याच्या सुनेची आत्महत्या

### डायरीमध्ये सापडला भांडणाचा उल्लेख

◆ **नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

देशातील प्रसिद्ध पान मसाला कंपनी 'कमला पसंद' आणि 'राजश्री'चे मालक कमल किशोर चौरसिया यांची सून दीप्ती चौरसिया (४०) यांनी दिल्लीतील वसंत विहार येथील त्यांच्या घरी मंगळवारी संध्याकाळी आत्महत्या केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीप्तीचा मृतदेह पंख्याला लटकलेल्या अवस्थेत आढळला.

पोलिसांना एक डायरी मिळाली आहे, ज्यात दीप्तीने तिचा पती हरप्रीत चौरसियासोबतच्या वादाचा उल्लेख केला आहे. डायरीत लिहिले आहे की, जर एखाद्या नात्यात प्रेम आणि विश्वास नसेल, तर त्या नात्यात राहण्याचे आणि जगण्याचे कारण काय?

दीप्तीचे २०१० मध्ये कमल किशोर यांचा मुलगा हरप्रीत चौरसियासोबत लग्न झाले होते. त्यांना १४ वर्षांचा एक मुलगा आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हरप्रीतने दोन विवाह केले आहेत. दुसरी पत्नी दक्षिण भारतीय चित्रपटांमधील अभिनेत्री आहे. (वृत्तसंस्था)



संसदेच्या मध्यवर्ती दालनात बुधवारी संविधान दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी घटनेच्या प्रास्ताविकेचे वाचन करताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला, केंद्रीय मंत्री जेपी नड्डा, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायणसिंह

# राजकीय पक्ष भीती निर्माण करताहेत



## एसआयआयवर सुप्रीम कोर्टात सुनावणी

**नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

बिहार, केरळ, तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये मतदार याद्यांच्या सुरू असलेल्या विशेष सघन पुनरावृत्ती (एसआयआर) बाबत राजकीय पक्ष अनावश्यक भीती आणि गोंधळ पसरवण्याचा प्रयत्न करीत आहेत, असे निवडणूक आयोगाने बुधवारी सर्वोच्च न्यायालयात सांगितले.

सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जयमाल्य बागची यांच्या न्यायासनासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. या याचिकांमध्ये एसआयआरच्या वैधतेला आव्हान देण्यात आले आहे आणि काही पक्षांनी ते स्थगित करण्याची मागणी केली आहे. केरळ सरकारने दाखल केलेल्या याचिकेत म्हटले आहे की, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसोबत एसआयआर केल्याने प्रशासनावर जास्त भार पडेल आणि निवडणूक प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो. सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयोगाला १ डिसेंबरपर्यंत त्यांचे उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले. या प्रकरणाची पुढील सुनावणी २ डिसेंबर रोजी होईल.

केरळ सरकारव्यतिरिक्त सीपीआय(एम), सीपीआय आणि आययूएमएल नेते पी. के. कुन्हालिकुट्टी यांनीही एसआयआरच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या स्वतंत्र याचिका दाखल केल्या आहेत. न्यायालयाने २१ नोव्हेंबर रोजी यावर नोटीस बजावली.

सर्वोच्च न्यायालयाने इतर राज्यांमध्ये एसआयआरला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणीसाठी तारखा निश्चित केल्या आहेत. तामिळनाडूसंदर्भातील सुनावणी ४ डिसेंबर रोजी तर पश्चिम बंगालची सुनावणी ९ डिसेंबर रोजी होणार आहे.

निवडणूक आयोगाने प्रथम जून २०२५ मध्ये बिहारमध्ये लागू करण्याचे आदेश दिले. याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल करण्यात आल्या, परंतु न्यायालयाने प्रक्रियेला स्थगिती दिली नाही. असे असूनही, २७ ऑक्टोबर रोजी निवडणूक आयोगाने एसआयआरची व्याप्ती वाढवली आणि तामिळनाडू, पश्चिम बंगाल आणि केरळसह अनेक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये ती लागू केली. त्यानंतर तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये एसआयआरला कायदेशीर आव्हाने दाखल करण्यात आली, ज्यावर सर्वोच्च न्यायालयाने ११ नोव्हेंबर रोजी नोटीस बजावली. (वृत्तसंस्था)

### तत्काळ धोका नाही

सर्वोच्च न्यायालयात निवडणूक आयोगाने म्हटले की, एसआयआर ही मतदार यादी अधिक अचूक बनवण्याच्या उद्देशाने एक नियमित आणि आवश्यक प्रक्रिया आहे. आयोगाने असाही युक्तिवाद केला की, राजकीय पक्ष तथ्ये अतिशयोक्तीपूर्ण करत आहेत आणि मतदारांमध्ये अनावश्यक भीती निर्माण करत आहेत.

## बद्रीनाथ मंदिराचे दरवाजे झाले बंद

**चामोली, २६ नोव्हेंबर**

चार धाम यात्रेतील सर्वात महत्त्वाचे तीर्थस्थळ मानले जाणारे बद्रीनाथ धामचे दरवाजे बंद झाले आहेत. दरवाजे बंद होण्यापूर्वी, पंचपूजेच्या चौथ्या दिवशी माँ लक्ष्मी मंदिरात विशेष पूजा करण्यात आली. यानंतर, देवी लक्ष्मीला बद्रीनाथच्या गर्भगृहात राहण्यासाठी आमंत्रित करण्यात आले.



बद्रीनाथ धाम बंद होण्याच्या चार दिवस आधी, २१ नोव्हेंबरला पंच पूजा (पाच दिवसांची धार्मिक पूजा) सुरू झाली. गणेश मंदिर, आदि केदारेश्वर आणि आदि गुरु शंकराचार्य गादी स्थळ यांचे दरवाजे देखील विधीपूर्वक बंद करण्यात आले. मंदिरात वैदिक स्तोत्रांचे पठण देखील झाले. सोमवारी, देवी लक्ष्मी मंदिरात विशेष पूजा करण्यात आली. उन्हाळ्याच्या सहा महिन्यांत, देवी लक्ष्मी तिच्या निवासस्थानी वास करते, परंतु हिवाळ्यात, ती मुख्य मंदिराच्या गर्भगृहात राहते. परिणामी, मंदिराचे दरवाजे बंद असतात. या ऐतिहासिक आणि भावनिक समारोप समारंभाचे साक्षीदार होण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. (वृत्तसंस्था)

# शांतता करार अमान्य केल्यास अमेरिकेकडून मदत नाही

## ट्रम्प यांनी झेलेन्स्कींना सुनावले, युद्ध थांबविण्यासाठी २८ कलमी योजना स्वीकारावीच लागणार

**वॉशिंग्टन, २६ नोव्हेंबर**

युक्रेनला अमेरिकेची मदत हवी असल्यास त्यांनी प्रस्तावित २८ कलमी योजना स्वीकारून शांतता करार मान्य करावा. राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी शांतता कराराला मान्यता दिल्यावरच मी त्यांना भेटणार असल्याचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे.

पत्रकारांशी बोलताना ट्रम्प म्हणाले, झेलेन्स्की हवे असल्यास मला भेटू शकतात, परंतु त्यांना आधी शांतता करार मान्य करावा लागेल. २८ कलमी योजनेसंदर्भात आमच्यात चांगली चर्चा सुरू आहे. या करारामुळेच युक्रेन-रशिया संघर्ष थांबवणे शक्य होणार आहे. युक्रेनसमोर आता कुठलाही पर्याय उरलेला नाही, त्यांनी विषयाला अधिक ताणू नये. मी त्यांनी करार मान्य करण्यासाठी २८ नोव्हेंबरपर्यंतचा वेळ दिला आहे, त्यांनी निर्णय घेण्यास विलंब केल्यास मी काहीही करू शकणार नाही. शांतता करार दोन्ही बाजूंसाठी सर्वोत्तम आहे आणि यामुळे युद्ध थांबेल. पुतिन आणि युक्रेनियन अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी अमेरिकन राजदूत पाठवण्यात आले आहेत. युरोपियन देशही चर्चेत सहभागी आहेत. मला कोणत्याही परिस्थितीत युद्ध संपवायचे आहे, दोन्ही देशातील नागरिकांचे बळी जात आहेत. शेकडो सैनिक मारले जात आहेत. (वृत्तसंस्था)



### युरोपीय नेत्यांकडून चिंता

युक्रेन-रशिया युद्ध थांबविण्यासाठी ट्रम्प यांनी सादर केलेल्या योजनेवर फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन म्हणाले, शांतता चर्चा एका महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचली आहेत आणि ती पुढे नेण्याची वेळ आली आहे. मात्र यातील काही अटींवर आम्ही सहमत नाही. ब्रिटिनचे पंतप्रधान केयर स्टारमर यांनी म्हटले, की झेलेन्स्की बहुतांश मुद्द्यांवर सकारात्मक असले तरी, त्यांनी युक्रेनचा प्रदेश रशियाला देण्यास असहमती दर्शवली आहे.

### सहमती मिळविण्याचे प्रयत्न

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी ट्रम्प यांच्या २८कलमी शांतता योजनेला पाठिंबा दिला आणि म्हटले, की ही योजना युद्धबंदीचा आधार म्हणून काम करू शकते. तथापि, युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की हा करार स्वीकारण्यास तयार नाही, कारण, या करारानुसार, युक्रेनला त्यांच्या भूभागाचा मोठा भाग रशियाला द्यावा लागेल आणि नाटोमध्ये सामील होण्याचा त्यांचा हेतूही सोडून द्यावा लागेल.

# निवडणूक अधिकाऱ्यांना धोका

## आयोगाचे बंगाल पोलिसांना पत्र

**नवी दिल्ली, २६ नोव्हेंबर**

पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या एसआयआर दरम्यान निवडणूक आयोगाने कोलकाता पोलिसांना पत्र लिहून निवडणूक अधिकाऱ्यांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली आहे. निवडणूक आयोगाने कोलकाता पोलिस आयुक्तांना पत्र लिहून ड्युटीवर तैनात असलेल्या निवडणूक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची सुरक्षा सुनिश्चित करण्यास सांगितले आहे.

२४ नोव्हेंबर रोजी मुख्य निवडणूक आयुक्तांच्या कार्यालयाच्या सुरक्षेत भंग झाल्याचे समोर आले आहे. याशिवाय मुख्य निवडणूक आयुक्त, अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी, संयुक्त मुख्य निवडणूक अधिकारी आणि उपमुख्य निवडणूक अधिकारी यांच्या सुरक्षेतही तडजोड करण्यात आली आहे, असेही पत्रात म्हटले आहे.

निवडणूक आयोगाने या घटनेची आधीच दखल घेतली आहे. मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची सुरक्षा देणे आवश्यक आहे. त्यांच्या कार्यालय आणि निवासस्थानावर सुरक्षा मजबूत केली पाहिजे. एसआयआर प्रक्रिया आणि डेटा संरक्षित करण्यासाठी पुरेसे सुरक्षा उपाय केले पाहिजेत. निर्देशानंतर उचललेल्या पावलांची माहिती ४८ तासांच्या आत द्यावी, अशी विनंती निवडणूक आयोगाने केली आहे.

सोमवारी बीएलओ हक्क संरक्षण समितीच्या शेकडो सदस्यांनी कॉलेज चौकापासून सीईओ कार्यालयापर्यंत मोर्चा काढला आणि धरणे आंदोलन केले. पोलिस मानवी अडथळ्याप्रमाणे पहारा देत असतानाही, काहींनी गेट तोडण्याचा प्रयत्न केला. (वृत्तसंस्था)

# नकली तूप विकणाऱ्या टोळीचे सूत्रधार पकडले

**बंगळुरू, २६ नोव्हेंबर**

बंगळुरू पोलिसांनी एक मोठे यश मिळविले आहे. बनावट नंदिनी तूप रॅकेटचा पर्दाफाश केल्यानंतर काही दिवसांतच त्यांनी त्याचा सूत्रधार अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवकुमार आणि त्यांची पत्नी रम्या यांना बुधवारी ताब्यात घेण्यात आले. याआधी या रॅकेटमध्ये सहभागी असलेल्या इतर चार आरोपींनाही अटक करण्यात आली होती.

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, शिवकुमार दाम्पत्य कर्नाटक मिल्क फेडरेशनच्या लोकप्रिय नंदिनी ब्रँडचा वापर करून बनावट तुपाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन करणारे एक उत्पादन युनिट चालवत होते.

अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, माहिती मिळाल्यावर, केंद्रीय गुन्हे शाखेच्या पथकाने या सुविधेवर छापा टाकला आणि त्यांना उच्च तंत्रज्ञानाच्या यंत्रसामग्रीचा संपूर्ण संच आढळला. आरोपी मूळसारखे दिसणारे बनावट नंदिनी तुपाचे पॅकेट तयार करण्यासाठी उच्च तंत्रज्ञानाच्या औद्योगिक उपकरणांचा वापर करीत होते. घटनास्थळावरून सर्व यंत्रसामग्री आणि उपकरणे जप्त करण्यात आली आहेत.

त्यानुसार, १४ नोव्हेंबर रोजी सीसीबीच्या विशेष पथकाने आणि केएमएफ दक्षता शाखेच्या संयुक्य पथकाने एका गुप्त माहितीच्या आधारे पाळत ठेवण्यास सुरुवात केली. चामराजपेटच्या नानजांबा अग्रहारा परिसरातील कृष्णा एंटरप्रायझेसच्या गोदामांवर आणि दुकानांवर एकाच वेळी छापे टाकण्यात आले. तामिळनाडूहून भेसळयुक्त पॅकेज्ड तूप घेऊन जाणाऱ्या एका वाहनावरही एकाच वेळी छापे टाकण्यात आले. एकूण १.२६ कोटींची मालमत्ता जप्त करण्यात आली. त्यात ८१३६ लिटर भेसळयुक्त तूप (अंदाजे ५६.९५ लाख किमतीचे), बनावट तूप तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सर्व मशीन, भेसळ करण्यासाठी वापरले जाणारे नारळ तेल आणि पाम तेल, ५ मोबाईल फोन, १.१९ लाख रोख आणि चार बोलेरो पिकअप ट्रक आदींचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

# धर्मध्वजारोहणाने पाकिस्तानचा जळफळाट

**इस्लामाबाद, २६ नोव्हेंबर**

अयोध्येतील राम मंदिरावली धर्मध्वजारोहणामुळे पाकिस्तानचा जळफळाट झाला असून त्यांनी संयुक्त राष्ट्रांत यावर आक्षेप घेतला. भारतात अल्पसंख्यकांच्या अधिकारांना दडपले जात आहे आणि अयोध्येत मंदिर उभारणे हा मुस्लिम वारसा मिटवण्याच्या प्रयत्नाचा भाग असल्याचा आरोप केला आहे.

संयुक्त राष्ट्रांतील पाकिस्तानच्या राजदूताने ज्या ठिकाणी पूर्वी बाबरी मशीद होती, तिथे आता राम मंदिर बांधण्यात आले आहे. बाबरी मशीद अनेक शतके जुने धार्मिक स्थळ होते. ६ डिसेंबर १९९२ रोजी जमावाने ते पाडले. भारताच्या न्यायालयांनी या प्रकरणात ज्या लोकांवर आरोप होते, त्यांना निर्दोष मुक्त केले आणि त्याच जमिनीवर मंदिर बांधण्याची परवानगी दिली. हे अल्पसंख्याकांसोबतच्या भेदभावाचे मोठे उदाहरण आहे. भारतात धार्मिक अल्पसंख्याक, विशेषतः मुस्लिमांवर दबाव वाढत आहे. भारतातील अनेक ऐतिहासिक मशिदी धोक्यात आहेत आणि मुस्लिमांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या बाजूला सारले जात आहे. जगाने भारतात वाढत्या मुस्लिमांवरील हल्ल्यांकडे लक्ष द्यावे आणि संयुक्त राष्ट्रे आणि आंतरराष्ट्रीय संघटनांना अल्पसंख्याकांच्या धार्मिक स्थळांच्या आणि त्यांच्या अधिकारांच्या संरक्षणासाठी पावले उचलावीत. (वृत्तसंस्था)



# कोठडीतील मृत्यू स्वीकारार्ह नाहीत : सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली, २५ नोव्हेंबर**

पोलिस कोठडीत होणारे मृत्यू हे व्यवस्थेवर डाग आहेत आणि आता देश ते सहन करणार नाही, असे म्हणत सर्वोच्च न्यायालयाने अशा घटनांवर तीव्र आक्षेप नोंदवला. तसेच सर्व राज्ये आणि केंद्राकडून पोलिस ठाण्यांमध्ये सीसीटीव्हीबाबत मागवलेला अहवाल सादर न केल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.

न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या न्यायासनाने सांगितले की, जर १६ डिसेंबरपर्यंत अहवाल आला नाही, तर संबंधित राज्यांचे मुख्य सचिव आणि केंद्रीय संस्थांच्या संचालकांना न्यायालयात स्वतः हजर राहावे लागेल आणि विलंबाचे कारण सांगावे लागेल.

सप्टेंबर २०२५ मधील एका अहवालात असे म्हटले होते की, राजस्थानमधील पोलिस ठाण्यांमध्ये आठ महिन्यांत ११ कोठडीतील मृत्यू झाले होते. यानंतर सर्वोच्च न्यायालयाने सप्टेंबरमध्ये या प्रकरणाची स्वतःहून दखल घेतली होती आणि १४ ऑक्टोबर रोजी सर्व राज्यांकडून पोलिस ठाण्यांमध्ये सीसीटीव्हीबाबत अहवाल मागवला होता.

राजस्थानमधील पोलिस कोठडीशी संबंधित अहवालावर ४ सप्टेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतली होती. (वृत्तसंस्था)

## चुराचंदपूरमध्ये शस्त्रे जप्त

**इम्फाळ** : मणिपूरच्या चुराचंदपूर जिल्ह्यातील वनक्षेत्रात सुरक्षा दलांनी शस्त्रास्त्रे आणि दारूगोळ्यांचा साठा जप्त केला आहे. एका गोपनिय माहितीच्या आधारे, पोलिस, बीएसएफ, सीआरपीएफ आणि लष्कर जवानांच्या संयुक्त पथकाने बोल्नेओ वनक्षेत्रात शोध मोहीम राबवली आणि शस्त्रे जप्त केली, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. जप्त केलेल्या वस्तूंमध्ये सात सुधारित प्रोजेक्टाइल लाँचर, सात देशी बनावटीच्या सिंगल-बॅरल रायफल, दोन देशी बनावटीच्या पिस्तूल आदींचा समावेश आहे.

## चित्रपट वार्ता

### कॅटरिनाची कंपनी फायद्यात तर दीपिकाची तोट्यात

**मुंबई** : आजकाल बहुतांश कलाकार अभिनयासोबतच एखाद्या व्यवसायात उतरतात. पुढील काळाच्या दृष्टीने सावध पाऊल म्हणून हा निर्णय अतिशय स्तुत्य आहे. काही कलाकारांनी हॉटेल सुरू केले तर काहींनी स्वत:चे काही ब्रॅण्ड तयार केले. कॅटरिना कैफने मेकअप ब्रॅण्ड सुरू केला होता. अवघ्या तीन वर्षातच या ब्रॅण्डने चांगली कमाई सुरू केली आहे. तिचा ब्रॅण्ड नायकासोबत भागीदारीत सुरू आहेत. या कंपनीचा महसूल ८८ कोटी झाला असून त्याचा नफा ११ कोटींहून अधिक आहे. याउलट, दीपिकाच्या सौंदर्य प्रसाधन कंपनीला तोटा सहन करावा लागत आहे. वर्षभरात कंपनीच्या कमाईत ३० टक्क्यांहून अधिकची घट झाली आहे.





### धर्मेंद्रच्या वाढदिवशी पाहा ‘ओरिजनल शोले’




**मुंबई** : नुकतेच अभिनेता धर्मेंद्र यांचे निधन झाले. त्यांचे चाहते अतिशय दु:खी असतानाच त्यांना काहीसा दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. यंदा ‘शोले’ चित्रपटाला ५० वर्षे पूर्ण होताहेत. या निमित्ताने धर्मेंद्र यांच्या वाढदिवशी म्हणजे १२ डिसेंबर रोजी कोणतेही बदल न केलेला ‘ओरिजनल शोले’ चित्रपट देशभरात प्रदर्शित होणार आहे. देशातील १५०० हून अधिक ठिकाणी शोले फायनल कट दाखवला जाणार आहे. म्हणजेच कोणताही बदल न करता ‘शोले’ नव्याने प्रदर्शित केला जाईल. मुळात, १९७५ मध्ये आणिबाणी लागू झाल्याने सेन्सॉरशिप होती. त्या कारणाने चित्रपटाचा शेवट बदलण्यात आला होता. म्हणजे आता जो ‘शोले’ प्रदर्शित होईल तो अस्सल स्वरूपातील राहणार आहे.

# इथियोपियात १२ वाजता होतो सूर्योदय!

## तीन हजार वर्षांची परंपरा, स्वत:ची दिनदर्शिका

**अदिस अबाबा, २६ नोव्हेंबर**

इथिओपियाच्या अफार प्रदेशातील एक ज्वालामुखी १२ हजार वर्षांनंतर सक्रिय झाल्याने आशिया आणि आफ्रिकेतील अनेक देशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ज्वालामुखीच्या उद्रेका दरम्यान १४ किलोमीटर उंच राख आणि धुराचे दाट ढग उठले. या देशाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे दुपारी १२ वाजता सूर्योदय होतो, असे मानले जाते.

इथिओपिया हा पूर्व आफ्रिकेच्या हॉर्न क्षेत्रामध्ये स्थित एक प्राचीन देश आहे. तो लाल समुद्राच्या नैऋत्येस, इरिट्रिया, जिबूती, सोमालिया, केनिया आणि दक्षिण सूदानने वेढलेला आहे. हा आफ्रिकेतील एकमेव असा देश आहे जिथे कधीही युरोपीय सत्तेखाली नव्हता. विशेष म्हणजे इथिओपिया या देशाला तीन हजार वर्षांची परंपरा, स्वत:ची दिनदर्शिका, स्वत:ची भाषा आणि स्वतंत्र संस्कृती आहे. इथिओपियन समाज अत्यंत वैविध्यपूर्ण आहे. येथे ८० हून अधिक वांशिक गट राहतात. प्रत्येकाची स्वत:ची भाषा आणि संस्कृती आहे. ६० टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या ख्रिश्चन आहे. ते जगातील सर्वात जुन्या ख्रिश्चन समुदायांपैकी एक आहे. या संस्कृतीचे एक वैशिष्ट्य म्हणजे वर्षात १३ महिने असतात. यामध्ये १३ वा महिना हा पाच दिवसांचा असतो. लीप इयरमध्ये हा महिना ६ दिवसांचा होतो.

इथिओपियामध्ये, प्रत्येक महिना अगदी ३० दिवसांचा असतो. म्हणजे १२ महिने गुणिले ३० दिवस = ३६० दिवस. उर्वरित पाच दिवस एका वेगळ्या लहान महिन्यात जोडले जातात. याला पॅगुमेन म्हणतात. लीप वर्षात, इथिओपियामध्ये १३ वा महिना सहा दिवसांचा असतो. यामुळे एकूण महिन्यांची संख्या १३ होते. हे कॅलेंडर पूर्णपणे सौर-आधारित आहे. इथिओपियातील घड्याळ मोजणी जगभरातील पद्धतीपेक्षा पूर्ण वेगळी आहे. ते वेळेची गणना सूर्योदयापासून करतात. सूर्योदय साधारण ६ वाजता होत असला तरी इथिओपियन वेळेनुसार तो १२:०० वाजता मानला जातो. म्हणूनच इथिओपियन वेळ आणि जगातील वेळ यात मोठा फरक पडतो. (वृत्तसंस्था)



### देशात वेळ आहे स्थिर

**इथिओपिया हा आधुनिक जगात एक असा देश आहे जिथे वेळ स्थिर आहे. संस्कृती प्राचीन आहेत आणि जीवन जगाच्या इतर भागांपेक्षा वर्षानुवर्षे मागे आहे. इथिओपियाने जाणीवपूर्वक आपली प्राचीन ओळख, वेळेचे नियोजन, दिनदर्शिका आणि जीवनशैली जपली आहे. हा जगातील एकमेव देश आहे, जो अजूनही स्वत:ची दिनदर्शिका पाळतो. ते येशू ख्रिस्ताच्या जन्मापासून ७ ते ८ वर्षे मागे आहे. त्याला गीझ कॅलेंडर म्हणतात. येथे, सध्या २०१८ आहे.**

# काँग्रेसच्या सात नेत्यांची हकालपट्टी

## बिहारचा पराभव जिव्हारी

**पाटणा, २६ नोव्हेंबर**

बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीएने शानदार विजय मिळवला आहे. काँग्रेस आणि आरजेडीचा दारूण पराभव झाला आहे. या पराभवामुळे दोन्ही पक्षांतील अंतर्गत वाद आता समोर आला आहे. अशातच आता काँग्रेस पक्षाने मोठी कारवाई करत सात नेत्यांची सहा वर्षांसाठी हकालपट्टी केली आहे.

पक्षाचे मुख्य प्रवक्ते राजेश राठोड यांनी एक निवेदन जारी करत ही माहिती दिली आहे. बिहार प्रदेश काँग्रेस शिस्तपालन समितीने सात नेत्यांवर कठोर कारवाई केली आहे. पक्षाच्या मुख्य तत्त्वांबद्दल, शिस्त आणि संघटनात्मक शिष्टाचाराबद्दलच्या हलगर्जीपणाबद्दल आणि पक्षाच्या व्यासपीठाबाहेर वारंवार दिशाभूल करणारी विधाने केल्याबद्दल त्यांना सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबित करण्यात आले आहे.

शिस्तपालन समितीने निलंबनाची कारवाई करताना असं म्हटलं की, या सर्व नेत्यांनी सातत्याने पक्ष व्यासपीठाबाहेर काँग्रेसच्या निर्णयांविरुद्ध भाष्य केले होते. तसेच प्रिंट आणि सोशल मीडियावर तिकीट खरेदी केल्याचे आरोप करत पक्षाच्या प्रतिष्ठेला गंभीर नुकसान पोहोचवले होते, त्यामुळे त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. तसेच समितीने हेही सांगितले की, पक्षाने पूर्णपणे पारदर्शकरित्या निरीक्षकांची नियुक्ती, अधिकृत उमेदवारांची घोषणा केली होती. मात्र, या नेत्यांनी त्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. (वृत्तसंस्था)

### आदेश बांदेकरांची सून होणार पूजा बिरारी



**मुंबई** : सध्या मराठी मनोरंजन जगतात कलाकारांच्या लग्नाचा धूमधडाका सुरू आहे. नुकतीच अभिनेता मेघन जाधव आणि अनुष्का पिंपुटकर यांनी लगीनगाठ बांधली तर २९ नोव्हेंबर रोजी सूरज चव्हाण लग्न करणार आहे. अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड २ डिसेंबर रोजी लग्न करणार आहे. सोबतच सर्वांचे लाडके भावोजी आदेश बांदेकरांच्या घरीही सनईचे सूर निनादणार आहेत. आदेश बांदेकरांचा मुलगा सोहम याचे लग्न अभिनेत्री पूजा बिरारी हिच्यासोबत होणार आहे. ती सध्या ‘येड लागलं प्रेमाचं’ या मालिकेत काम करत असून मालिकेच्या सेटवरच तिचे केळवण पार पडले. आदेश बांदेकरांच्या कुटुंबाचेही त्यांच्या मित्रमंडळींनी नुकतेच केळवण केले. आदेश बांदेकरांचा मुलगा सोहम सध्या निर्मिती क्षेत्रात असून बांदेकर प्रॉडक्शनचे काम पाहत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# पाच शतकांच्या संघर्षाची अलौकिक फलश्रुती

''शिखरं यस्य देवस्य ध्वजेन विराजिते ।
तत्र देवाः तिष्ठन्ति सर्वकामप्रदायकाः ॥''

मंगळवार, २५ नोव्हेंबर २०२५, मार्गशीर्ष शुक्ल पंचमीचा दुर्मिळ असा संयोग साधत, अभिजित मुहूर्तावर अयोध्येच्या श्रीराम मंदिरावर धर्मध्वजा फडकली. ही तिथी त्रेतायुगातील श्री राम-सीतेच्या विवाहाशी संबंधित आहे. मंगळ हा पृथ्वीचा पुत्र म्हणून भावाने करावयाच्या विधीसाठी सीतेच्या विवाहात पुढे सरसावला होता, अशी आख्यायिका आहे. श्रीराम मंदिराची धर्मध्वजा गगनी विराजमान झाली तोही दिवस मंगळवारच. या अर्थाने हा दुग्धशर्करा योग आहे, जो पवित्र कार्याची सिद्धी दर्शवितो. अयोध्या नगरीत ही जी पावन स्मृती अंकित झाली आहे, ती केवळ एका मंदिराच्या शिखरावरील ध्वजारोहण सोहळ्याची नव्हे. तब्बल ५०० वर्षांच्या प्रदीर्घ 'यज्ञा'ची ती पूर्णाहुती व फलश्रुतीही. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या शुभ हस्ते शरयूच्या तीरावर, श्रीराम मंदिराच्या १९१ फूट उंच शिखरावर 'धर्मध्वज' मोठ्या दिमाखाने फडकला तेव्हा कोट्यवधी रामभक्तांच्या नेत्रांतून केवळ कृतार्थता आणि कृतज्ञतेचे अश्रू ओघळले. हे प्रतीक दगड-मातीचे बांधकाम पूर्ण झाल्याचे नाही. भारताच्या सुप्त सांस्कृतिक स्मृतीचा, आत्मसन्मानाचा, अस्मितेचा आणि 'धर्मो रक्षति रक्षितः' या तत्त्वज्ञानाच्या विजयाचा हा शंखनाद आहे.

हा धर्मध्वज ज्या शिखरावर विराजमान झाला आहे, त्याच्या पायथ्याशी सुमारे ५०० वर्षांचा धगधगता संघर्ष दडला आहे. १५२८ मध्ये मोगल शासक बाबरचा सेनापती मीर बाकी याने, प्रभू श्रीरामचंद्रांच्या जन्मस्थानाचे पवित्र मंदिर उद्ध्वस्त करून त्यावर बाबरी मशीद बांधली. या संघर्षाची बीजे रोवली गेली ती तेव्हापासूनच. तो संघर्ष केवळ जमिनीच्या तुकड्यासाठी नव्हता, तर 'आस्था' आणि 'अनास्था' यांच्यातला होता. भारताच्या आत्म्यावरचे ते आक्रमण होते. श्री रामभक्तांनी तेव्हापासूनच रामजन्मभूमी मुक्त करण्यासाठी अविरत संघर्ष केला, प्रसंगी बलिदानही दिले. इतिहासातील नोंदीनुसार, या संपूर्ण काळात तब्बल ७६ मोठे संघर्ष झालेत आणि असंख्य कारसेवकांचे, साधू-संतांचे रक्त सांडले. १८५३ मध्ये हिंदू आणि मुस्लिम समाजात पहिला मोठा वाद झाला. त्यानंतर १८८५ मध्ये महंत रघुबर दास यांनी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. ९० च्या दशकात विश्व हिंदू परिषदेच्या नेतृत्वात श्री रामजन्मभूमी आंदोलन उभे राहिले. 'श्री रामलला हम आयेंगे, मंदिर भव्य बनायेंगे' ही घोषणा देशव्यापी झाली. मग ६ डिसेंबर १९९२ ची घटना असो वा त्यानंतरचा न्यायालयीन लढा, प्रत्येक टप्पा हा या यज्ञातील एका आहुतीसारखाच होता. ५०० वर्षांच्या संघर्षाचा निर्णायक क्षण आला तो ९ नोव्हेंबर २०१९ रोजी. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक आणि एकमताने निर्णय देत, वादग्रस्त जमीन श्रीराम मंदिराला देण्याचा स्पष्ट आदेश दिला. त्यानंतर ५ ऑगस्ट २०२० रोजी पंतप्रधान मोदींच्या हस्ते या भव्य मंदिराचे भूमिपूजन झाले आणि बांधकाम सुरू झाले.

येथे एक गोष्ट आवर्जून सांगितली पाहिजे. ती अशी की, प्राप्त भूमी श्रीरामाच्या पुरातन मंदिराचीच आहे का, असा जो प्रश्न इरफान हबीबसारख्या कट्टर मुस्लिम व्यक्तीने आणि समाजवाद्यांनी विचारला होता, त्यास तत्कालीन भारतीय पुरातत्त्व विभागाचे विभागीय संचालक पद्मश्री के. के. मुहम्मद यांनी दिलेले समर्पक उत्तर ही चपराकच होय. ज्यांनी अयोध्येत केलेल्या उत्खननाला आधार माणून सर्वोच्च न्यायालयाने हा ऐतिहासिक निकाल दिला, त्या चमूत महत्त्वाची भूमिका बजावणारे के. के. मुहम्मद यांनी २०२० मधील 'तरुण भारत'च्या दिवाळी विशेषांकाला मुलाखत देताना सांगितले होते की, ''अयोध्या प्रकरणात मुस्लिम समुदायातील एक वर्ग माझा प्रचंड तिरस्कार करीत होता. त्यात विशेषतः जेएनयु, अलीगड येथील साम्यवादी इतिहासकार होते. ज्यांत इरफान हबीब अग्रणी होते. खरे तर, मुस्लिम समाजातील मोठ्या वर्गाला रामजन्मभूमीची ती जागा हिंदूंसाठी सोडावी असेच वाटत होते. परंतु, इरफान हबीबसारखे लोक त्याला सातत्याने विरोध करीत होते. हिंदूंच्या आराध्यासाठी ती जागा सोडून आपल्या दातृत्वाचा परिचय देण्याची संधी मुस्लिमांनी गमावली असेच मी म्हणेन. तसे घडले असते तर हिंदू-मुस्लिम संबंधाचा एक नवा अध्याय या देशात लिहिला गेला असता.'' त्या मुलाखतीत मुहम्मद असेही म्हणाले होते की, १९७८-८० चा तो काळ होता जेव्हा आम्ही बाबरी मशिदीत प्रवेश केला. तेव्हा आम्हाला असे दिसले की मशीद ज्या स्तंभांवर उभी आहे, ते स्तंभ तर हिंदू मंदिराचेच आहेत. कोणत्याही प्राचीन हिंदू मंदिराची ओळख म्हणजे मंदिराच्या खाली आठ कलश ठेवले असतात. त्याला अष्ट मंगल चिन्ह असे म्हणतात. अयोध्येत हे कलश सापडले होते. तेथील उत्खननात मंदिराचे असे अनेक खांब सापडले, ज्यांची संख्या पन्नासावर होती आणि ते सतरा रांगांमध्ये होते. याचाच अर्थ, तिथे मशिदीपूर्वी एक विशाल मंदिर होते. विशेष म्हणजे, साधारण २६३ मूर्ती त्यात आढळून आल्या. त्या ठिकाणी मशीद आधीपासून असती, तर मूर्ती मिळणे केवळ अशक्य होते. याशिवाय सर्वांत महत्त्वाचा पुरावा म्हणजे या उत्खननात सापडलेला शिलालेख. मध्ययुगीन काळात अशा अनेक चुका मुस्लिम आक्रमकांकडून घडल्या आणि त्या चुका आम्ही मान्य केल्या पाहिजेत. पण त्याचवेळी त्या आक्रमकांच्या चुकांसाठी वर्तमानातील मुस्लिमांना दोषी धरू नये. परंतु, काही अतिवादी मुस्लिम त्या चुकांची माफी मागण्याऐवजी त्याचे समर्थन करतात हे चुकीचे आहे.

२२ जानेवारी २०२४! भारतीय संस्कृती व अध्यात्माच्या दृष्टीने सुवर्ण दिवस अखेर उजाडला. याच दिवशी, अभिजित मुहूर्तावर सावळ्या बालस्वरूपातील श्री रामललाची 'प्राणप्रतिष्ठा' झाली. प्राणप्रतिष्ठा हा केवळ मूर्ती स्थापनेचा विधी नसतो, तर तो त्या मूर्तीच्या चैतन्याचा विधी असतो. या विधीने मंदिराच्या गर्भगृहाला आध्यात्मिक सामर्थ्य प्राप्त झाले. श्री रामभक्तांच्या ४९६ वर्षांच्या तपश्चर्येची ती पहिली मोठी फलश्रुती ठरली. या सोहळ्यामुळे जगभरातील रामभक्तांच्या हृदयमंदिरात 'रामराज्य' स्थापनेची एक नवी आस जागली. त्यानंतरच्या अवघ्या २२ महिन्यांत, २५ नोव्हेंबर रोजी 'धर्मध्वजारोहण' झाले. हे ध्वजारोहण मंदिराच्या बांधकामाची 'औपचारिक समाप्ती' दर्शविणारे नाही. ते या संपूर्ण मंदिर परिसंस्थेचे 'आध्यात्मिक सक्रियण' दर्शविणारे आहे. २२ फूट लांब आणि ११ फूट रुंद आणि ४२ फूट उंचीच्या दंडातल्या या धर्मध्वजावर अंकित 'सूर्य' हे तेज, शौर्य आणि अविरत ऊर्जेचे, 'ॐ' हे वैश्विक नाद आणि आध्यात्मिक शक्तीचे आणि 'कोविदार वृक्ष' हे शाश्वत नीती, ज्ञान आणि परोपकाराच्या आदर्श 'रामराज्या'चे प्रतीक आहे.

डॉ. मोहनजी भागवत यांनी, या क्षणाला 'दीर्घकाळ जपलेले स्वप्न' असे म्हटले, तर पंतप्रधान मोदींनी 'शेकडो वर्षांच्या वेदनांवरील उपचार' असे या धर्मध्वजारोहण सोहळ्याचे वर्णन केले. हे ध्वजारोहण श्रीराम मंदिराच्या 'सार्वभौमत्वाचा' सार्वजनिक उद्घोष आहे. हा 'धर्मध्वज' आता भारताच्या सांस्कृतिक अवकाशातील एक तेजस्वी ध्रुवतारा असेल. हे ऐतिहासिक यश केवळ हिंदू समाजाचे नाही, तर हे भारताच्या न्यायप्रणालीचे, लोकशाहीच्या संयमाचे आणि 'वसुधैव कुटुंबकम्' या आदर्शावर विश्वास ठेवणाऱ्या समस्त राष्ट्र-पुरुषांच्या धैर्याचे आहे. ज्यांनी आपला वेळ, श्रम आणि आयुष्याचा होम केला अशा कोट्यवधी कारसेवकांच्या त्यागाची ही फलश्रुती आहे. अयोध्या आता केवळ एक धार्मिक नगरी नव्हे, तर ती जागतिक स्तरावर भारताच्या सांस्कृतिक सभ्यतेच्या परंपरेची राजधानी म्हणून उदयास आली आहे. ५०० वर्षांचा संघर्षमय अध्याय पूर्ण करून, विकसित बनण्याच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या भारताला या ध्वजारोहणाने नवी ऊर्जा दिली आहे. प्रभू रामचंद्रांच्या आदर्श नीतीनुसार जगाला मार्गदर्शन करण्याची भारताची क्षमता दर्शविणारा हा धर्मध्वज अनेक शतके अवकाशात दिमाखाने फडकत राहील, यात तिळमात्र शंका नाही. जय श्रीराम!

## तंत्रवेध

# वनस्पती आणि संगीताचे भावविश्व

**डॉ. दीपक शिकारपूर**

'वृक्षवल्ली आम्हा सोयरी' हा ज्ञानोबा माउलींचा विचार. सर जगदीशचंद्र बोस यांचा ठाम विश्वास होता की, वनस्पतींमध्ये संवेदनशील मज्जासंस्था असते, ती प्राण्यांपेक्षा वेगळी नाही तसेच बाह्य उत्तेजनांवरील त्यांच्या प्रतिक्रिया मोजल्या जाऊ शकतात आणि त्या रेकॉर्ड केल्या जाऊ शकतात. जगातील प्रत्येक गोष्ट काही ना काही आवृत्तीच्या कंपाने बनलेली आहे. हिंदू तत्त्वज्ञानात 'ॐ' हा नाद सृष्टीचा मूलाधार मानला जातो. वनस्पती, प्राणी, मानव, पाणी, हवा सर्व एकाच नादात्मक ऊर्जेच्या स्वरूपातून निर्माण झाले आहेत. संगीत वातावरणात गुंजते, तेव्हा ही ऊर्जा जिवंत पदार्थाशी जोडली जाते. म्हणूनच संगीत वनस्पतींना 'जिवंत' वाटते; त्यातून परस्परसंवाद निर्माण होतो. मानवप्राण्याप्रमाणे वनस्पतींनाही आपल्या आयुष्यात अनेक सूक्ष्म संवेदना अनुभवता येतात, हे वैज्ञानिक संशोधनातून स्पष्ट झाले आहे. प्रकाश, पाणी, तापमान, वायू यासारख्या भौतिक गोष्टींसोबतच ध्वनीलहरींचाही वनस्पतींच्या वाढीवर आणि विकासावर परिणाम होतो. ध्वनी म्हणजे कंपन; आणि कंपन हा निसर्गाचा मूलभूत घटक आहे. संगीत हे अशा सुव्यवस्थित ध्वनिकंपनांचे सूक्ष्म रूप आहे. म्हणूनच 'वनस्पती आणि संगीत यांचा परस्पर संबंध' हा अभ्यास अनेकांना आकर्षक वाटतो. जगतातील प्रत्येक सजीव घटक काही ना काही प्रमाणात वातावरणातील कंपने अनुभवत असतो. वनस्पतींमध्ये चेतासंस्था नसली तरी त्या सभोवतालच्या परिस्थितीला प्रत्युत्तर देतात. सूर्यप्रकाशाकडे झुकणे, पाण्याच्या दिशेने मुळे वाढवणे, स्पर्शाने पाने आकुंचन पावणे ही याची काही उदाहरणे. यावरून वनस्पतींची संवेदनाक्षमता लक्षात येते.

ध्वनीलहरी हाही एक पर्यावरणीय घटक असल्यामुळे संगीतामुळे वनस्पतींच्या वाढीवर परिणाम होतो का, याविषयी अनेक प्रयोग झाले असून त्यातून रोचक निष्कर्ष समोर आले आहेत. ध्वनी हा कंपनांद्वारे प्रसारित होणारा ऊर्जा-स्वरूप आहे. संगीत वाजते तेव्हा हवेमध्ये सूक्ष्म कंपने निर्माण होतात. काही संशोधकांच्या मते हे कंपन वनस्पतींच्या पेशींच्या भिंतींवर परिणाम करतात. कंपनांमुळे पेशींची उत्तेजना वाढते. ध्वनीलहरींमुळे वनस्पतींच्या पेशींमध्ये सूक्ष्म हालचाली निर्माण होतात. त्यामुळे वाढीसाठी आवश्यक असलेल्या एंझाइम्सची कार्यक्षमता वाढू शकते. यामुळे फोटोसिंथेसिस प्रक्रिया सुधारू शकते. काही प्रयोगांमध्ये संगीत सुरू असताना क्लोरोफिलचे प्रमाण अधिक वाढल्याचे निरीक्षण आढळले आहे. यातून ऑक्सिजन आणि गिबरेलिनसारख्या वनस्पती हार्मोन्सच्या क्रियाशीलतेत फरक पडतो. त्यामुळे मुळांची आणि खोडांची वाढ बदलू शकते. वनस्पतींवर विभिन्न प्रकारच्या संगीताचा परिणाम होतो. संगीत अनेक प्रकारचे



असते. शास्त्रीय, लोकसंगीत, रॉक, पॉप, वाद्यसंगीत इत्यादी. आश्चर्याची गोष्ट म्हणजे वनस्पती प्रत्येक प्रकारच्या संगीताला समान प्रतिसाद देत नाहीत. अनेक प्रयोगांमध्ये आढळले की शांत, सुरेल आणि नादमय संगीतामुळे वनस्पतींची तुलनेने चांगली वाढ होते. स्वरांच्या मृदू कंपनांमुळे पेशींची रचना स्थिर राहते आणि सकारात्मक वाढ होते. रॉक किंवा मोठ्या आवाजातील तालवाद्यांचे संगीत वनस्पतींना ताण देऊ शकते. अशा कंपनांची तीव्रता जास्त असल्याने मुळांची वाढ मंदावणे, पानांची सुकणारी स्थिती किंवा नाजूक वनस्पतींची हानीही दिसून आली आहे.

दरम्यान, पाण्याचा आवाज, वारा हे ध्वनी वनस्पतींसाठी तुलनेने नैसर्गिक असतात आणि त्यांचा परिणाम सौम्य आणि संतुलित असतो, असे लक्षात आले आहे. भारतीय संस्कृतीमध्ये नादाचा, विशेषतः 'नादब्रह्म' या संकल्पनेचा महत्त्वपूर्ण विचार आहे. वेदांमध्ये, पुराणांमध्ये आणि आयुर्वेदात निसर्गाशी एकरूप होण्याचा उल्लेख आढळतो. अनेक शेतकरी आपल्या शेतात सकाळच्या वेळेस भजन किंवा शास्त्रीय संगीत लावतात. त्याचा वैज्ञानिक पुरावा मर्यादित असला तरी अनुभवजन्यदृष्ट्या त्यांना उत्पादनात सकारात्मक बदल आढळल्याचे अनेकदा ऐकायला मिळाले जाते. माणसांप्रमाणेच वनस्पतीही पर्यावरणाला प्रतिसाद देतात. आपण त्यांना सुखदायक संगीत ऐकवल्यास आश्चर्यकारक परिणाम मिळवू शकतो. त्यातून पानांची, फुलांची संख्या वाढते. फुलांची वेळ लवकर येते (किमान एक आठवडा). बिया लवकर फुटतात. हे थोतांड नसून त्यावर अनेक देशांमध्ये दीर्घ संशोधन (विकसितही) झाले आहे. या विषयावरील शोधनिबंध सर्वत्र उपलब्ध आहेत. वनस्पतींना शास्त्रीय संगीत, स्तोत्रे, बासरी, वैदिक चँट्स आवडतात पण कानठळ्या बसवणारे रॉक संगीत आवडत नाही, हेही शोधनिबंधामध्ये नमूद केले आहे. ऐकायला मधुर वाटणाऱ्या शांत ध्वनीमुळे मनाची एकाग्रता आणि प्रसन्नता वाढते, मधुर संगीत श्रवणामुळे गायी जास्त दूध देतात. पक्षी, प्राणी यांची उत्पादनक्षमता वाढते. कुक्कुटपालन केंद्रांमध्ये अंड्यांचे उत्पादन वाढल्याचेही प्रयोगात आढळले आहे. मधुर ध्वनी-संगीतामुळे वनस्पती आणि पिकांची वाढ चांगली होते. डॉल्फीन या सागरी माशांना (बहामा बेटाजवळ) संगीत आवडते. गुरांना पाणी पाजताना शीळ घालतात. गुरांची तहान समाधानाने शांत होते. वृक्षामध्ये प्राण असतो, त्यांना भावना असतात आणि ते मुके जीव नसून ध्वनीही निर्माण करतात, अशी ठाम धारणा असणारे अनेक निसर्गप्रेमी आहेत. १९७० मध्ये पीटर टॉम्पकिन्स आणि क्रिस्टोफर बर्ड यांच्या 'द सीक्रेट लाईफ ऑफ प्लांट्स' या पुस्तकाने न्यू यॉर्क टाईम्सच्या बेस्टसेलर यादीत स्थान मिळवले होते. या जोडगोळीने या विषयावर सुमारे पन्नास वर्षांपूर्वी सखोल अभ्यास केला होता. वनस्पती संगीताचा मानवाच्या आरोग्यावर होणारा विशेष प्रभाव पाहून अनेक डॉक्टर आनंदाने आश्चर्यचकित झाले. प्रभातफेरी वृक्षवल्लीच्या सहवासात केल्यास मन प्रसन्न होते, याचा अनुभव अनेकांनी घेतला आहे. शास्त्रज्ञांना आढळून आले की वनस्पती विद्युत आवेग आणि कंपने निर्माण करू शकतात. उदाहरणार्थ, पान त्याच्या पृष्ठभागावर विद्युत प्रभार गोळा करू शकते आणि ते वनस्पतीच्या आतील उतींमधून प्रवाहित करू शकते. वनस्पतीच्या उती नंतर ते वनस्पतीच्या इतर भागांमध्ये प्रसारित करतात. तुम्ही रोपाच्या खोडाला प्लग जोडून त्याची शक्ती मोजू शकता. प्लँटवेव्ह हा उद्योग या क्षेत्रात भरीव कार्य करत आहे. त्याने अनेक उपकरणे विकसित केली आहेत, जी तुम्हाला वनस्पतींच्या संगीताचा आस्वाद देते. 'प्लँटवेव्ह' नावाचे उपकरण तुम्हाला निसर्गाशी अक्षरशः संपर्क साधू देते. ते तुम्हाला झाडे, फुले, बोन्सायपासून मशरूमपर्यंत वनस्पतींनी निर्माण केलेले आवाज ऐकू देतात. हे उपकरण पानांवर दोन इलेक्ट्रोड लावून वनस्पतींमधील विद्युतीय फरक ओळखू शकते. ही तफावत नंतर लाटांच्या रूपात रेखाटली जाते. तयार झालेले उत्पादन म्हणजे आनंददायी संगीताचा अखंड प्रवाह. संगीतामुळे वनस्पतींमध्ये होणारी प्रतिक्रिया ही जैविक पातळीवरील असली तरी तिचा प्रभाव मानवाला सौंदर्य, संतुलन आणि शांततेचा अनुभव देतो. संगीत निसर्गासाठीही उपकारक ठरू शकते. म्हणूनच शेतात, बागेत किंवा घरातील रोपट्यांसाठी हलके, सुरेल संगीत वाजवणे हा निसर्गाशी संवाद साधण्याचा सुंदर मार्ग आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नीलेश जोशी**

# कुष्ठरोग निवारणासाठी पुढाकार घ्या

कोरोना काळातील भयावहता अद्याप सर्वांच्या स्मरणात असेलच. सख्ख्या नात्यातील परकेपण या कालावधीत सर्वांनीच अनुभवले. समाजातील मानवी मूल्ये आणि संवेदना जणू नष्ट झाल्या होत्या. अजूनही मागे वळून पाहिल्यानंतर अंगावर शहारे यावे इतक्या कटू आठवणी तेव्हाच्या आहेत. पण यावरही वैद्यकशास्त्राने तोडगा काढून मात केली. वास्तविक इतिहासातील हा काही पहिला प्रसंग नव्हता. यापूर्वीही असाध्य आजारांनी थैमान घातल्याचे दिसून येते. पण काही आजार समाजात संवेदनाशून्य परिस्थिती निर्माण करतात. मग ती केवळ आरोग्याची समस्या न राहता सामाजिक अभिशाप ठरतो. गत शतकात महारोग अर्थात कुष्ठरोग हा असाच आजार होता. त्याकाळी असाध्य असणाऱ्या या आजारावर आता उपचार शक्य आहेत. त्यावर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळविण्यात देखील यश मिळाले आहे. नव्हे गत काही दशकांत तर त्याचे निर्मूलन झाले असे देखील म्हटले जात होते. पण नुकत्याच राज्यात सुरू असलेल्या कुष्ठरोग शोध मोहिमेंतर्गत अकोला जिल्ह्यात ११ नवीन रुग्ण आढळून आले. तर तब्बल ३,९९६ संशयित रुग्णांची नोंद करण्यात आली. एका जिल्ह्यातील संशयित रुग्णांची ही आकडेवारी धक्कादायक आहे. या आजाराबाबत आता गांभीर्याने उपाययोजना झाल्या नाहीत तर समाजवीण उद्ध्वस्त करणारे भविष्यातील मोठे संकट येऊ शकते.

कुष्ठरोग हा मायकोबॅक्टीरियम लेप्रे या जीवाणूमुळे होतो. या आजारात सुरुवातीला शरीरावर संवेदनाहीन चट्टा आढळतो. हळूहळू संसर्ग वाढून काही ठिकाणच्या संवेदना कमी व्हायला लागतात. हात-पाय विकृत होणे अशी लक्षणेही आढळतात आणि नंतर रुग्णामध्ये न्यूनगंड वाढण्यास सुरुवात होते. सख्खे नातलग देखील अज्ञान आणि गैरसमजामुळे आजारी व्यक्तीला दूर ठेवतात. गत शतकात या आजाराने ग्रस्त असणाऱ्या रुग्णांची अतिशय दैना होती. हा आजार झालेला रुग्ण महारोगी म्हणून ओळखला जाई. त्याच्या स्पर्शाने इतरांना हा रोग होईल म्हणून त्याला गावाबाहेर निर्वासित करण्यात येत होते. विविध सण, समारंभ आणि सार्वजनिक उत्सवात त्यांना स्थान नसे. सर्वांत भयंकर म्हणजे अशा रुग्णांना बहिष्कृत केल्यानंतर उपजीविकेसाठी साधन उपलब्ध नसत. एकीकडे आजाराने ग्रस्त तर दुसरीकडे कुटुंब, सख्ख्या नातलगांचा बहिष्कार यामुळे रुग्ण मानसिकरीत्या खचून जात असत. अशा काळातही कुष्ठरुग्णांच्या मदतीसाठी अनेक महनीय व्यक्तींनी पुढाकार घेतला. यापैकीच एक म्हणजे सदाशिव गोविंद कात्रे. सदाशिव कात्रे हे स्वतः कुष्ठरोगी होते. या आजारामुळे त्यांचे हात-पाय बाधित झाले. पण स्वतःच्या वाटेला आलेले दुःख बाजूला सारत त्यांनी कुष्ठरोग्यांसाठी काम करण्याचा संकल्प केला. अनंत अडचणींवर मात करीत त्यांनी छत्तीसगड राज्यातील चंपा जिल्ह्यात जांजगिर येथे भारतीय कुष्ठ निवारक संघाची स्थापना केली. त्यांच्या प्रयत्नातून अनेक रुग्णांना आधारासह निवारा, औषधोपचार, पुनर्वसन, कौशल्य प्रशिक्षण त्यांनी दिले. अनेक रुग्ण बरे होऊन पुन्हा स्वाभिमानाने जीवन जगायला लागले. महात्मा गांधी, विनोबा भावे, बाबा आमटे यांनी देखील त्यावेळी कुष्ठरोग्यांना मोठा आधार दिला. अमरावती येथील डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांनी देखील विदर्भ महारोगी सेवा मंडळाची स्थापना करून अमरावती येथे तपोवन परिसरात कुष्ठरोग्यांच्या उपचार आणि पुनर्वसनासाठी जीवन समर्पित केले. पश्चिम विदर्भातील कुष्ठरोग्यांसाठी तपोवन हे मोठे आधार केंद्र होते. खरं म्हणजे आता कुष्ठरोग हा काही असाध्य श्रेणीत मोडणारा आजार नाही. वैद्यकशास्त्राने केलेल्या प्रगतीमुळे सुरुवातीलाच आजाराचे निदान होते. तर अगदी काही महिन्यांच्या उपचारानंतर रुग्ण बरा होतो. हे खरे असले तरी गैरसमज, अज्ञानातून रुग्णाने याकडे दुर्लक्ष करणे सोयीचे नाही. शासनस्तरावर कुष्ठरोग निर्मूलन, नियंत्रणासाठी प्रयत्न सुरू आहेतच. त्यासाठी तपासणी आणि सर्वेक्षण देखील करण्यात येते. पण याच प्रकारच्या तपासणीत आढळलेली ही संशयित रुग्णसंख्या धक्कादायक आहे. त्यामुळे या आजाराचा धोका, व्याप्ती वेळीच ओळखली पाहिजे. सदाशिव कात्रे, डॉ. पटवर्धन यांनी यासाठी जीवन समर्पित केले. आताची आकडेवारी पाहता पुन्हा अशाच समर्पणासाठी समाजातील स्वयंसेवी संघटनांसह सामाजिक भान असणाऱ्यांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

# शिवकुमारांमुळे सिद्धरामय्या अडचणीत

**श्यामकांत जहागीरदार**

बिहार विधानसभा निवडणुकीत महाआघाडीचा दारुण पराभव झाल्यानंतर येत्या काही दिवसांत काँग्रेसमध्ये फूट पडली तर मला आश्चर्य वाटणार नाही, असे महत्त्वपूर्ण विधान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. मोदी यांचे हे विधान खरे करून दाखवण्यासाठी काँग्रेसजनांनी कंबर कसली असल्याचे दिसते. त्यात सध्या तरी कर्नाटकातील काँग्रेसनेते आघाडीवर आहेत, असे म्हणायला हरकत नाही. कर्नाटकातील सत्तेवरून मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यात जुंपली आहे. दोघांनी अजून एकदुसऱ्याचे कपडे फाडायला सुरुवात केली नसली तरी तो दिवसही फारसा दूर नाही. या दोघांनी एकमेकांचे कपडे फाडायला सुरुवात केल्यानंतर खऱ्या अर्थाने काँग्रेसचे वस्त्रहरण होणार आहे. मुळात आज देशातील इनमीनतीन राज्यात काँग्रेसची सत्ता आहे, यातील कर्नाटक हे एक राज्य आहे. तेलंगणा आणि हिमाचल प्रदेश ही अन्य दोन राज्ये आहेत. अडीच वर्षांपूर्वी कर्नाटकात झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला सत्ता मिळाली. राज्यात काँग्रेसला सत्तेवर आणण्यात त्यावेळी प्रदेश काँग्रेस अध्यक्ष असलेले डी. के. शिवकुमार यांचे मोठे योगदान होते. त्यामुळे निवडणुकीनंतर शिवकुमारच मुख्यमंत्री होतील, असे वाटत असतांना अचानक सिद्धरामय्या यांच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ पडली. माळ पडली असे म्हणण्यापेक्षा काँग्रेस नेतृत्वाला आपल्या बाजूला वळवत ती माळ त्यांनी आपल्या गळ्यात पाडून घेतली. त्यावेळी मुख्यमंत्रिपद अडीच-अडीच वर्षे वाटून घेण्याचा करार काँग्रेसच्या राज्यातील या दोन बड्या नेत्यांमध्ये झाला होता, असे म्हणतात. म्हणजे फक्त शिवकुमारच तसा दावा करतात. मुख्यमंत्री सिद्धरामय्या वा काँग्रेसचे नेतृत्व याबाबत काहीही बोलायला तयार नाही. म्हणजे या दोन नेत्यांमध्ये असा करार झाला होता असेही काँग्रेसचे नेतृत्व सांगत नाही आणि झाला नव्हता, असाही दावा करत नाही. उपमुख्यमंत्री शिवकुमारच असा दावा वारंवार करत असल्यामुळे त्यावेळी असा करार झाला होता, असे म्हणता येईल. कारण या मुद्यावर शिवकुमार खोटे बोलतात, असेही आतापर्यंत काँग्रेसच्या नेतृत्वाने म्हटले नाही.

सिद्धरामय्या यांच्या मुख्यमंत्रिपदाची अडीच वर्षे पूर्ण झाल्यामुळे ठरल्याप्रमाणे मुख्यमंत्रिपद मला मिळावे, अशी मागणी शिवकुमार करत आहे. एवढेच नाही तर या मागणीसाठी पक्षनेतृत्वावर दबाव आणण्यासाठी त्यांनी आपल्या समर्थक आमदारांना दिल्लीत पाठवायला सुरुवात केली आहे. अजून तरी त्यांच्या समर्थक आमदारांना भेटायची वेळ काँग्रेसच्या नेतृत्वाने दिली नाही.



मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी मंत्रिमंडळ विस्ताराची परवानगी पक्षश्रेष्ठींकडे मागितली आहे. पक्षश्रेष्ठी जो निर्णय घेतील, तो आपल्याला मान्य राहील, असेही ते सांगतात. याचाच अर्थ मुख्यमंत्रिपदाबाबत अडीच-अडीच वर्षाचा करार झाला होता, हे ते अप्रत्यक्षरीत्या मान्य करतात. पक्षनेतृत्वाने सिद्धरामय्या यांना मंत्रिमंडळ विस्ताराची परवानगी दिली तर पक्षनेतृत्वाने त्यांना मुदतवाढ दिली, मुख्यमंत्रिपदाचा शिवकुमार यांचा दावा फेटाळला, असे मानले जाईल. मात्र यावेळी शिवकुमार यांचा दावा फेटाळणे काँग्रेसच्या नेतृत्वाला परवडणारे नाही.

त्यामुळे राज्यातील नेतृत्वबदलाच्या मुद्यावर पक्षश्रेष्ठींना निर्णय घ्यायचा आहे. कर्नाटकातील या गुंत्यावर लवकरात लवकर तोडगा काँग्रेसच्या नेतृत्वाला काढावा लागणार आहे. अन्यथा हातातील आणखी एक राज्य गमावण्याची वेळ त्यांच्यावर आल्याशिवाय राहणार नाही. शिवकुमार आता माघार घेण्याच्या स्थितीत नाहीत. आर वा पारची लढाई लढण्याच्या मानसिकतेत ते आले आहे. आतापर्यंत शिवकुमार समर्थक १५ ते २० आमदार दिल्लीत पोहोचले असले तरी १४० आमदार आपल्या पाठीशी असल्याचा दावा ते करत आहे. असा दावा करत ते एकप्रकारे पक्षनेतृत्वाला इशाराही देत आहे. मुळात कर्नाटक हे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांचे राज्य आहे. सिद्धरामय्या यांच्या मंत्रिमंडळात खडगे यांचा मुलगाही मंत्री आहे. त्यामुळे या मुद्यावर कोणताही निर्णय घेण्याची खडगे यांची तयारी नाही. काँग्रेसचे खरे नेतृत्व म्हणजे गांधी परिवार कर्नाटकातील नेतृत्वबदलाच्या मुद्यावर निर्णय घेईल, असे म्हणत खडगे यांनी एकप्रकारे हात वर केले आहे. याचा अर्थ खडगे मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री शिवकुमार या दोघांनाही दुखवू इच्छित नाही. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असले तरी कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार आपल्याला नाही, अशी कबुली ते देत आहेत, असे म्हणायला हरकत नाही. काँग्रेसचे नेतृत्व असलेले राहुल गांधी नेहमीप्रमाणे परदेशात आहेत. ते परदेशातून आल्यावर काँग्रेसच्या नेतृत्वाला कर्नाटकातील पेचप्रसंगावर तोडगा काढावा लागेल. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यातील वादात काँग्रेसने याआधी राजस्थान हे राज्य गमावले आहे. त्या राज्यातही काँग्रेसचे सरकार असताना मुख्यमंत्री अशोक गहलोत आणि उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांच्यात वाद होता. शिवकुमार यांच्याप्रमाणे सचिन पायलट यांनी राजस्थानमध्ये काँग्रेसला सत्तेवर आणले होते. पायलट मुख्यमंत्री होतील, असे वाटत असताना अचानक गहलोत यांनी बाजी मारली आणि मुख्यमंत्रिपद बळकावले. पायलट यांना उपमुख्यमंत्रिपदावर समाधान मानावे लागले. आज कर्नाटकात तेच सुरू आहे. तसाच संघर्ष तेव्हा राजस्थानात गहलोत आणि पायलट यांच्यात होता. त्याची परिणती विधानसभा निवडणुकीत राज्यातील काँग्रेसची सत्ता गमावण्यात झाली. तरीसुद्धा काँग्रेसला शहाणपण येत नाही. काँग्रेसला हरवण्यासाठी भाजपाची गरजच नाही. काँग्रेसचे नेते काँग्रेसला पराभूत करण्यासाठी पुरेसे आहेत. यातून जी थोडीफार कसर राहात असेल ती भरून काढण्यासाठी राहुल गांधी समर्थ आहेत. काँग्रेसला राज्याराज्यात हरवण्यासाठी जिथे काँग्रेसचे कार्यकर्ते कमी पडत असतील, तिथे मी आहे, हे राहुल गांधी यांनी वारंवार सिद्ध करून दाखवले आहे. कर्नाटकातील या पेचप्रसंगावर काँग्रेसच्या नेतृत्वाला यशस्वी तोडगा काढता आला नाही तर कर्नाटक हे राज्य काँग्रेसला गमवावे लागेल, यात शंका नाही. आणि तोडगा म्हणजे शिवकुमार यांची मुख्यमंत्रिपदाची मागणी मान्य करणे हा आहे. काँग्रेसने त्यांना मुख्यमंत्रिपद दिले नाही तर ते बंड करू शकतात, आपला गट घेऊ बाहेर पडू शकतात. शिवकुमार काँग्रेसमधून बाहेर पडून भाजपात जातील का, याची शक्यता आज अतिशय कमी असली तरी ते भाजपाच्या पाठिंब्याने राज्यात सरकार स्थापन करण्याची शक्यता नाकारता येत नाही. राजकारणात कधी काय होईल, हे कोणी सांगू शकत नाही. मुख्यमंत्रिपदाच्या मुद्यावरून अडीच वर्षांपूर्वी काँग्रेसच्या नेतृत्वाने आपल्यावर अन्याय केला, ही त्यांची भावना आहे, जी चुकीची म्हणता येणार नाही. त्यामुळे आपल्यावरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी शिवकुमार कोणत्याही थराला जाऊ शकतात, काँग्रेसच्या नेतृत्वाला धडा शिकवू शकतात. शिवकुमार याच्या नावातच शिव आहे. त्यामुळे त्यांनी तांडवनृत्य केले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### सरन्यायाधीशांचे विधान स्वागतार्ह

देशाचे नवनियुक्त सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी 'भारतात दीर्घविलंबित न्यायदानाविषयी' व्यक्त केलेले विधान खूप महत्त्वाचे आहे. माजी सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी सुद्धा सध्या प्रचलित असलेल्या 'तारीख पे तारीख' या न्यायदानाच्या प्रचलित अनिष्ट प्रथेबद्दल चिंता व्यक्त केली होती. या प्रथेमुळे वकील व त्यांचे सहकारी यांचा आर्थिक फायदा होतो, हे सर्वश्रुत आहे. पण न्यायदानाची प्रतीक्षा करत असलेल्या सामान्य जनतेचे व गोरगरिबांचे अतोनात नुकसान होते. अर्ध्या तासात निपटारा होऊ शकणारी प्रकरणे, जुनाट कार्यपद्धतीमुळे वर्षानुवर्षे भारतात प्रलंबित राहतात. याचा दुरुपयोग करून घेत काही मंडळी फायदा घेतात. 'न्यायदेवता आंधळी असते', 'हजारो गुन्हेगार सुटले तरी चालतील, पण एका निर्दोष व्यक्तीवर अन्याय होऊ नये' अशा विलंबाला खतपाणी घालणाऱ्या भ्रामक कल्पना मुद्दाम पसरविण्यात आल्या की काय, अशी शंका घ्यायला बराच वाव आहे. आजच्या आधुनिक कृत्रिम बुद्धिमतेच्या युगात साध्या खटल्यांना वर्षानुवर्षे विलंब होणे व ९०,००० च्या वर नुसत्या सर्वोच्च न्यायालयात वाढत जाणे, ही बाब चांगली नाही. सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी याबद्दल खंत व्यक्त केली व वाद सोडवण्यासाठी मध्यस्थीला प्रोत्साहन देण्याची नवीन कल्पना सुचविली, हे निश्चितच स्वागतार्ह आहे. सूर्य कांत यांच्या पुढाकाराने, या प्रलंबित खटल्यांमुळे कोट्यवधी लोकांचा व्यर्थ होणारा वेळ वाचेल व भारत देश विकासाच्या दिशेने आणखी वेगाने वाटचाल करेल अशी आशा करूया.

**गणेश ज. हजारे**/८६९८८१५५५९

●● ●●

### शहरी नक्षल समर्थकांना ठेचून काढा

देशाच्या राजधानीत अत्यंत धक्कादायक प्रकार नुकताच घडला. दिल्लीतील इंडिया गेटवर वायुप्रदूषणाविरुद्ध निदर्शने करणाऱ्या आंदोलनकर्त्यांनी नक्षल विरोधी चकमकीत खात्मा झालेला देशातील मोस्ट वॉन्टेड नक्षलवादी कमांडर माडवी हिडमाचे पोस्टर झळकावले. पोस्टरमध्ये हिडमाची तुलना आदिवासी स्वातंत्र्यसैनिक बिरसा मुंडा यांच्याशी करण्यात आली. त्याचे जल, जंगल आणि जमिनीचे रक्षक म्हणून वर्णन करण्यात आले. त्याच्या समर्थनार्थ ''जितने हिडमा मारोगे, हर घर से हिडमा निकलेगा'' असे नारे लावून देशाच्या सुरक्षेला-शांततेला व एकात्मतेला धमकी देण्याची हिंमत करण्यात आली. ''हेच ते लपलेले नक्षल समर्थक'' असा आरोप संपूर्ण देशात होऊ लागला. सोशल मीडियावर या आंदोलनकर्त्यांच्या विरोधात लाट उसळली. नुकत्याच घडलेल्या बॉम्बस्फोटाच्या धक्क्यातून दिली सावरत असतानाच असा धक्कादायक प्रकार घडल्याने चिंता वाढली.अर्बन नक्षलिझम आणि अर्बन समर्थक ही बाब पुन्हा स्पष्टपणे अधोरेखित झालेली दिसते. नक्षलवाद ही कीड कुठून कुठपर्यंत लागलेली आहे हे आता पुन्हा एकदा या घटनेने समोरे आले आहे. देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी, ३१ मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद हद्दपार होणार असे घोषित केल्यापासून व प्रत्यक्षात यावर आक्रमकपणे कृती योजना सुरू असतानाच अनेक नक्षलवादी शरणागती पत्करताना दिसत आहेत. ज्यांनी आत्मसमर्पणाचा मार्ग स्वीकारला नाही त्यांना थेट गोळीनेच उत्तर मिळत आहे. हे सर्व सुरू असताना कधी नव्हे तर युद्धबंदी करण्याचा व सरकारसोबत शांती वार्ता करण्याचा प्रस्ताव नक्षलवाद्यांकडून ठेवण्यात आलेला होता. परंतु गृहमंत्री अमित शाह यांनी ''शस्त्र हातात असणाऱ्यांसोबत चर्चा बिलकूल होणार नाही जे आत्मसमर्पण करतील त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यास मदत केली जाईल अन्यथा सुरक्षा दलांच्या कारवाईला सामोरे जावे लागेल'' असे ठणकावून सांगत प्रस्ताव नाकारत कठोर इशारा दिला होता. नक्षलवाद्यांच्या समर्थनार्थ दिल्लीमध्ये घोषणा देणे म्हणजेच प्रदूषणविरोधी आंदोलनाच्या आडून देशविरोधी अजेंडा चालवणे हा स्पष्ट उद्देश दिसून येतो आहे, अशांना ठेचूनच काढायला हवे.

**वैभव बावनकर**/९५४५७४५५८०

## आजचे संघगीत-९९

गुरुवार, २७ नोव्हेंबर २०२५

### अविरत पुढे पुढे जाऊ

अविरत पुढे पुढे जाऊ
अम्हि ना विश्रांति आता घेऊ ॥धृ.॥

उद्धाराया पूर्वज शापित घोर आचरुनि तप हे अविरत
मुक्ति मिळवुनी देइ भगीरथ सातत्याने भगीरथाच्या
पुढे पुढे जाऊ ॥१॥

शांत सागरी सेतू बांधून नष्ट कराया संकट दारुण
जाई वानरासह रघुनंदन त्या धैर्याने रघुरायाच्या
पुढे पुढे जाऊ ॥२॥

स्वर्गी तो देवेन्द्र कोपला गारायुत पर्जन्य वर्षला
गोवर्धन गोपांनि उचलला चातुर्याने श्रीकृष्णाच्या
पुढे पुढे जाऊ ॥३॥

धुमाकूळ यवनांचा चाले आवर घाली शिवराय बळे
घेउनि संगे मित्र मावळे त्या शिवराया साक्ष ठेवुनी
पुढे पुढे जाऊ ॥४॥

सातत्याच्या अन् धैर्याच्या चातुर्याच्या संघटनेच्या
मातृभूमिच्या उद्धाराच्या महाजनांच्या त्याच पथाने
पुढे पुढे जाऊ ॥५॥

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९३७३४३८३५२ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

## संविधान दिन साजरा...



### कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळा

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

कै. वि. मो. मेहता प्राथमिक शाळेत संविधान दिन साजरा करण्यात आला. प्रथमता मा. मुख्यायापिका सीमा कोरवलीकर यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी श्रुती कुलकर्णी यांनी संविधानाविषयी गीत सादर केले. राघव हेंबाडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले व मयुरी दुरुकर यांनी संविधान प्रस्ताविक विषयी माहिती सांगितली. संविधान सप्ताहाच्या निमित्ताने शाळेत इयत्ता तिसरी विद्यार्थ्यांची रॅली इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी भारत माता व आंबेडकरांची वेशभूषा केली इयत्ता चौथी विद्यार्थ्यांची चित्रकला स्पर्धा, विद्यार्थ्यांची मानवी साखळी, सेफ्टी पॉईंट असे विविध उपक्रम राबविण्यात आले. या कार्यक्रमासाठी शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन व आभार मयुरी दुरूगकर यांनी केले.



### हरिभाई देवकरण प्रशाला

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

येथील हरिभाई देवकरण प्रशाला कनिष्ठ महाविद्यालय येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. प्रशालेच्या मुख्याध्यापिका दीपा फाटक पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड, पर्यवेक्षक महेंद्र रणधीर, पर्यवेक्षक गणेश नेवरे, राघवेंद्र पिल्ले यांच्या हस्ते भारतरत्न, विश्वभूषण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा व भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून प्रशालेचे सहशिक्षक राघवेंद्र पिल्ले यांनी भारतीय संविधानातील विविध कलम, परिशिष्टे यांच्या संदर्भात विध्यार्थ्यांना अभ्यासपूर्ण माहिती सांगितली. यावेळी संविधान उद्देशिका वाचन व विद्यार्थ्यांची भाषणे झाली, भारतीय संविधानाबद्दल घोषणा देण्यात आल्या. प्रास्ताविक सूत्रसंचालन मंजिरी हरहरे यांनी केले तर आभार मल्लिकार्जुन घवाळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल महारुद्र कत्ते, सेवक प्रशांत गायकवाड, मारुती माळी, विनय वाघमारे, ब्रह्मदेव ननवरे आदींनी परिश्रम घेतले.




### श्री मल्लिकार्जुन हायस्कूल

**सोलापूर, दि.२६ नोव्हेंबर-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालय,हत्तुरे नगर येथे संविधान दिन साजरा झाला. मार्गदर्शक धरेप्पा हत्तुरे, प्रभारी मुख्याध्यापक रमेश दिंडोरे, अनिलकुमार गावडे, जिल्हा कौशल्य विकास रोजगारचे जिल्हा समन्वयक सिद्धप्पा बनसोडे व लिपिक वर्ग तृष्णा गायकवाड, रेश्मा विद्याधर, रोहिदास डोईफोडे यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व संविधानाचे पूजन करण्यात आले.यावेळी संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. २६/११ हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी सुनीता गंगोंडा यांनी संविधानातील हक्क,कर्तव्य,मूल्ये यांचे महत्त्व सांगत संविधानाविषयी माहिती सांगितली. या संविधान दिनानिमित्त निबंध, चित्रकला, रांगोळी, प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आल्या व प्रशालेतील विद्यार्थ्यांनी नगरातून संविधान जागृतीविषयी घरोघरी संविधान, हर घर संविधान अशा घोषणा देत रॅली काढली. यावेळी शिक्षक आनंद काकडे, दत्तात्रय आगरखेड, सुकेशनी गंगोडा, अमरनाथ कदारे, गणेश कोरे, संतोष स्वामी उपस्थित होते. सूत्रसंचालन रमेश आगवणे यांनी केले. प्रतीक्षा बिडवे यांनी आभार मानले.

# ऊसाला पहिली उचल ३४०० रुपये देण्याची मागणी

## शेतकरी संघटना तेरा मैल येथे उद्या करणार आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

यावर्षीचा ऊस गाळप हंगाम सुरू होऊन एक महिना होत आला. ऊस कायदा १९६६ नुसार ऊस गाळप झाल्यापासून १४ दिवसाच्या आत ऊस बिले जमा करणे बंधनकारक असताना एक महिना झाला तरीही साखर कारखान्यांनी ऊस बिले जमा केली नाहीत आणि ऊस दर जाहीर केले नाहीत.

सोलापूर जिल्ह्याच्या शेजारी असणाऱ्या सर्व जिल्ह्यांमध्ये ऊसाला पहिली उचल म्हणून ३२०० ते ३६०० पर्यंत ऊस दर जाहीर केले आहेत. त्याचप्रमाणे सोलापूर जिल्ह्यामध्ये सुद्धा यावर्षी गाळप होणाऱ्या उसाला पहिली उचल ३४०० रुपये मिळावेत, या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने शुक्रवार दिनांक २८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता.



सोलापूर -विजापूर महामार्गावर होनमुर्गी फाटा (तेरामैल) या ठिकाणी रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. या मागणीचे निवेदन मंद्रूप अप्पर तहसरलदारांना देण्यात आले. यावेळी शेतकरी संघटना जिल्हा अध्यक्ष विजय रणदिवे, युवा जिल्हा अध्यक्ष मोहसीन पटेल, अखिल भारतीय किसान सभेचे तालुकाध्यक्ष जावेद आवटे, तालुकाध्यक्ष बिळेणी सुंटे, यासीन मकानदार, चाँदसाब यादगिरी, तुकाराम शेतसंदी, सिकंदर इनामदार आदी उपस्थित होते.

# आयआयटी बॉम्बेचे नाव मुंबई करण्यासाठी पंतप्रधानांना पत्र लिहिणार : फडणवीस

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि. २६ नोव्हेंबर-**

भाजपचे केंद्रीय राज्यमंत्री जिंतेंद्र सिंह यांच्या वक्तव्यानंतर निर्माण झालेल्या वादाबाबत मुख्यमंत्री यांनी आता प्रतिक्रिया दिली आहे. आमच्यासाठी हे मुंबईच असून आयआयटी बॉम्बेचं नाव आयआयटी मुंबई असे करण्याची विनंती आपण पंतप्रधानांना पत्र पाठवणार आहे, असे त्यांनी सांगितले.

केंद्रीय राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी आयआयटी मुंबईतील एका कार्यक्रमात आयआयटी बॉम्बेचे नाव मुंबई केलं नाही यामुळे मला बरं वाटले,असे विधान केल्याने वाद ओढावून घेतला होता. त्यावर मनसे व काँग्रेसने आक्रमक भूमिका घेत त्यांना उत्तर दिले होते. राज ठाकरे यांनी केलेल्या टीकेवर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ''बॉम्बेचे नाव मुंबई करण्यामागे सर्वात मोठा वाटा हा भारतीय जनता पक्षाचे नेते रामभाऊ नाईकांचा आहे. आमच्याकरता बॉम्बे नाही तर ते मुंबईच आहे.

बॉम्बेच्या खुणा या मिटल्या पाहिजेत आणि सगळीकडे मुंबईच असलं पाहिजे. आयआयटी बॉम्बेचं नाव आयआयटी मुंबई असं करण्याची विनंती करणारे पत्र मी स्वतः देशाचे पंतप्रधान आणि मानव संसाधन मंत्र्यांना लिहिणार आहे.''

काही लोक सोईस्करपणे, आपल्या मुलांना ज्या शाळेत शिकवतात त्या शाळेचं नाव बदलावे, अशी विनंती करत नाहीत असा टोलाही फडणवीसांनी ठाकरे यांना लगावला.

# जिल्ह्यात ई-केवायसी न केलेल्या २० टक्के युनिटचे धान्य होणार बंद!

### जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

रेशनकार्डची ई-केवायसी करणे आवश्यक असल्याचे सरकारने स्पष्ट केले होते; त्यासाठी ३-४ महिने मोहीमही राबविली. ज्यांच्या रेशन कार्डची ई-केवायसी होणार नाही; त्यांना सरकारी रेशन मिळणार नाही. यामुळे येत्या काळात तुमची शिधापत्रिका बंद होण्याची शक्यता



आहे असा इशारा देवूनही जिल्ह्यातील ८० टक्केच ई-केवायसी झाली आणि २० टक्के स्थलांतरीत, लग्न झालेल्या मुली आणि इतर काहीजणांची ई-केवायसी झाली नाही; यामुळे या २० टक्के युनिटचे राशन कुठल्याही क्षणी शासनस्तरावरुन बंद होवू शकते, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी आज (दि. २६) दिली.रेशनकार्डच्या ई-केवायसीची मुदत जवळपास ३ ते ४ महिने शासन स्तरावरून वाढविल्याने जिल्ह्यातील ई-केवायसीचा टक्का वाढला.

सोलापूर जिल्ह्यातील आजतागायतची तालुकानिहाय आकडेवारी पाहिल्यास सांगोला ८५.४६ टक्के, पंढरपूर ८०.७८, माळशिरस ८०.६७, करमाळा ८०.४०, माढा ८०.२७, बार्शी ७७.९५, मोहोळ ७७.७४, उत्तर सोलापूर ७७.७१, दक्षिण सोलापूर ७७.६२, अक्कलकोट ७६.५९ तर मंगळवेढा ७६.१४ टक्के इतकी झाली आहे. तर जिल्ह्यातून सरासरी ७९.५६ टक्के ई-केवायसी झाली असून, उर्वरित शिधापत्रिका धारकांची ई-केवायसी झाली नसल्याने कुठल्याही क्षणी त्यांचे धान्य शासन स्तरावरून बंद होण्याची शक्यता जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे यांनी व्यक्त केली.

आजतागायत ९ लाख ९६ हजार ४६६ युनिटची ई-केवायसी झाली आहे. तर ४ लाख ७० हजार ८९२ जणांची ई-केवायसी पेंडिंग आहे.

**CHANGE IN NAME**

I HAVE DECLRAE THAT MY OLD NAME IS **Sushant Rajdatta Salunkhe** HAS BEEN CHANGED TO **Sushant Rajadatta Salunke**

Resi. - 165, Jaymahalaxmi Nagar, Near Girija Mangal Karyalaya, Majrewadi, Solapur

**KINDLY NOTE**

THE SAME. (53388 Dtd.10.11.2025)



# 'सिंहगड'मध्ये संविधान दिनानिमित्त सामूहिक उद्देशिका वाचन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने संचालित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले.यावेळी सीआरटीडी संशोधन विभागाचे संचालक डॉ. एस. एच. पवार यांनी संविधानाचे महत्त्व अधोरेखित करताना विद्यार्थ्यांनी नागरिक म्हणून आपली कर्तव्ये ओळखावीत, असे आवाहन केले.

प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना संविधानाची निर्मिती, त्यामागील ऐतिहासिक भूमिका व लोकशाही मूल्यांची सविस्तर माहिती दिली. तसेच २६ नोव्हेंबर रोजी घडलेल्या मुंबई दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध व्यक्त करत हुतात्म्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून शहीद जवानांना अभिवादन केले.

### जन्मदिवस श्री सद्गुरूंचा, जल्लोष शिष्यांचा

**सोलापूर, दि.२६ नोव्हेंबर-**

परमपूज्य गुरुवर्य श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या ६७ व्या वाढदिवसानिमित्त येथील सर्व शिष्य बांधवांकडून सद्गुरूंना अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी प्रथम महाराजांचे औक्षण तेजल व वासंती जवंजाळ यांनी केले. तदनंतर अनिकेत जवंजाळ परिवार व सागर कुरापाटी परिवार यांच्याकडून श्री सद्गुरु गहिनीनाथ महाराज औसेकर यांचा सत्कार करण्यात आला. तसेच याप्रसंगी येथील सर्व शिष्य बांधवांनी सद्गुरूंचा सत्कार करून आशीर्वाद घेतला. यावेळी शिवराज नगरकर, गुरुनाथ पतंगे, नितीन चव्हाण, सदाशिव चौगुले, लिंगप्पा जवळकोटे, विजय मोरे, सोमनाथ परिवार, प्रदीप पडगे, नक्का, शिवानंद सावळगी, कदम परिवार, राजेश झिंगाडे,अतुल भडांगे, अक्षय भडंगे, स्वप्निल मालकुस्कर, प्रकाश केकडे,मनोज सरवदे, आदिनाथ उपरे, नितीन निकते, नागेश कमटम आदी शिष्य परिवार उपस्थित होता.



**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः बार्शी शहर व आसपासचे लोकांना सदर जाहिर नोटीसीने कळिवण्यात येते की,

१) डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी बार्शी म्यु.पल हद्दतील गट नं. २६०/८/२८ बिनशेती प्लॉट नं. २८ याचे क्षेत्रफळ १४९.९९ चौ.मी. चे चौ. फुट १६१३.८९ आहे. याचा बिनशेती आकार २२६.०० पैसे आहे. याची मोजमापे पूर्व बाजु मीटर १५.३९, दक्षिण बाजु मीटर ९.७५, पश्चिम बाजु मीटर १५.३८ व उत्तर बाजु मीटर ९.७५ आहे. यासी चतुसिमा पुर्वेस-सदर गट नंबर पैकी बिनशेती प्लॉट नं. २७, दक्षिणेस ९.०० मीटर रुंदीचा रस्ता, पश्चिमेस-सदर गट नंबर पैकी बिनशेती प्लॉट नं. २९ व उत्तरेस गट नंबर २६० पैकी मिळकत आहे. सदर प्लॉटची पाणी व वागणुक दक्षिण बाजूच्या रस्त्याने जाते व आहे.

येणेप्रमाणे चतुसिमापुर्वक खुला बिनशेती प्लॉट आतिल दगड, माती वगैरे सर्व तदंगभुत वस्तुसह.

२) सदर प्लॉट शितल भागवत क्षिरसागर, यांच्या खरेदी मालकीचा व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीचा आहे. त्यांनी त्यांचे कायदेशीर गरजेपोटी सदरचा प्लॉट विक्रीस काढला आहे. त्याची माहिती आमचे पक्षकारास झाल्याने उभयंतामध्ये खरेदी विक्रीचा व्यवहार झालेला आहे. इसारापोटी रक्कमही दिलेली आहे. सदरचा प्लॉट हा निर्वेध, निजोखमी व बिनबोजाचा आहे. असा विश्वास व भरोसा दिलेला आहे. परंतु सदर प्लॉट संबंधाने कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी आमचे पक्षकार अथवा खालील नमुद पत्त्यावर लेखी हरकत १५ (पंधरा) दिवसांच्या आत नोंदवावी. अन्यथा आमचे पक्षकार सदर मुदतीनंतर कोणाची काही हरकत तक्रार नाही असे समजुन खरेदीखताचा दस्त नोंदवतील. कोणाची फसवणूक होऊ नये म्हणून हि जाहिर नोटीस दिली असे दि. २६/११/२०२५

श्री. संजयकुमार श्रीराम गुंड
खरेदी घेणार

सही/-
खरेदी घेणारतर्फे
**ॲड अनिल विठ्ठल शिंदे**
दिवाणी व फौजदारी न्यायालय, बार्शी
ता. बार्शी, जि. सोलापूर
मो. ९९२१०७७५५१

**जाहिर प्रसिध्दीकरण**

दि. कि. अर्ज नं.९८/२०२५
नि. नं. ०६

**बार्शी येथील मे. अति. जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे कोर्टात**

**कु. आर्या रोहित बाशिंगे,** वय- ०९ वर्षे, (अज्ञान)
धंदा- शिक्षण, रा.९२८/२, परांडा रोड, बाशिंगे प्लॉट, बार्शी
ता. बार्शी जि. सोलापुर --अर्जदार
**सदर अर्जदाराचे अ.पा.क. जनक आई**
**सौ. स्वप्नाली रोहित बाशिंगे,** वय-३२ वर्षे,
धंदा- घरकाम रा९२८/२, परांडा रोड, बाशिंगे प्लॉट, बार्शी
ता. बार्शी जि. सोलापुर
विरुध्द
महाराष्ट्र शासन (यांचे समन्स / नोटीस --सामनेवाला
सहाय्यक सरकारी अभियोक्ता --
बार्शी यांना बजावण्यात यावे)

ज्याअर्थी, यातील अर्जदार यांनी डि सोलापुर सब डि बार्शी व ता. बार्शी पैकी मौजे बार्शी नगरपालीका हद्दीतील मिळकत गट नं. ९२८/२ पैकी प्लॉट नं. ७८ + ७९ मधील बहुमजली निवासी बिल्डींग मेट्रो टॉवर्स या बिल्डींगमधील पहिल्या मजल्यावरिल फ्लॅट नं. २०२ क्षेत्रफळ ४९.०७ चौ.मी. ही अज्ञानाची मिळकत विकणेकामी परवानगी मिळणेसाठीचा अर्ज CMA 98/2025 मे. कोर्टात आणलेला असुन सदर मिळकत विक्री करणेकामी कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असेल तर किंवा सदर मिळकतीसंबंधी कोणताही खरेदी, विक्री, गहाण, दान, बोजा, लिज, चोळी, बांगडी, पोटगी, अथवा इतर कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध व हरकत असेल तर सदर प्रकरणाची पुढील नेमलेली तारीख दि. १८/१२/ २०२५ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहुन कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी. त्याअर्थी, कोणाचेही काही म्हणणे / हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना सदर मिळकत विक्री करणेबाबत परवानगी देण्यात येईल. कळावे. हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले ता. २४/११/२०२५

क. लिपीक

कोर्टाचा शिक्का

सही/-
**सहाय्यक अधीक्षक**
**जिल्हा व सत्र न्यायालय बार्शी**

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**

सार्वजनिक बांधकाम विभाग

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे करणे (महानगरपालिका) योजना - सन २०२४-२५ अंतर्गत

ई- निविदा सूचना क्र. :- ४४५/सन.२०२५-२६

ई-निविदा आय.डी.क्र. १२५१९१७-१.

**नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे करणे (महानगरपालिका) या योजना** सन २०२४-२५ अंतर्गत १ कामाची ई-निविदा सुचना क्र. ४४५ सन २०२५-२६ ई-टेंडर पध्दतीने ऑनलाईन मागविणेसाठी शासनाच्या http://mahaetenders.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आले आहे. तरी याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

(मा.आयुक्त, यांचे मान्यतेने)

सही/-
**शहर अभियंता**
**अहिल्यानगर महानगरपालिका**



### मार्केट यार्ड येथून चोरट्याने दुचाकी पळवली

**सोलापूर, दि.२६ नोव्हेंबर-**

मार्केट यार्ड येथील गेट क्रमांक दोन येथून १५ ते २२ नोव्हेंबर दरम्यान हँडल लॉक करून लावलेली दुचाकी (क्रमांक एम एच १३ ई एच ८७१९) ही चोरून नेल्याची घटना घडली. याप्रकरणी उर्मिला विकास बनसोडे (रा. न्यू बुधवार पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

**महाळुंग श्रीपूर नगरपंचायत**

**जाहीर निविदा सूचना**

नगरपंचायतच्या आरोग्य विभागाच्या सन २०२५-२६ या वर्षाकरिता महाळुंग श्रीपूर नगरपंचायत हद्दीतील एनिमल वेलफेअर नियमावली प्रमाणे मोकाट कुत्र्यांचे निर्बीजकरण, नसबंदी व लसीकर करणे कामासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| विभागाचे नाव | कामाचा पत्ता | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाना रक्कम | कामाचे वर्णन | निविदा फॉर्म किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| आरोग्य विभाग | भटकी कुत्री पकडून त्यांचे निर्बीजकरण नसबंदी व लसीकरण करणे. | ३,००,०००/- | ३,०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ३००/- |

निविदा अर्ज दिनांक: २७/११/२०२५ ते दिनांकः ०३/१२/२०२५ अखेर सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयीन वेळेत सायंकाळी ०५:०० वाजे पर्यंत निविदा शक्यतो त्याच दिवशी सायंकाळी ०५:०० वाजता उपस्थित निविदा धारका समोर किंवा प्रतिनिधी समोर उघडणेत येतील, तसेच कोणत्याही कारणामुळे त्याच दिवशी निविदा उघडणे शक्य न झालेस त्याबाबतची निविदा उघडण्याचे पुढील तारीख व वेळ नगरपंचायत सूचना फलकावर लावण्यात येईल. याबाबत कोणत्याही व कोणासही स्वतंत्र सूचना देण्यात येणार नाही.

निविदेतील अटी व शर्तीचे इत्यादीची अधिक माहिती कार्यालयीन वेळेत व कार्यालयामध्ये पहावयास मिळेल. सादर करण्यात आलेल्या निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क मुख्याधिकारी यांनी राखून ठेवला आहे.

अटी:- दरपत्रक हे प्रती एक कुत्रे प्रमाणे असावे.

**(डॉ. श्री. योगेश डोके)**
मुख्याधिकारी
महाळुंग, श्रीपुर नगरपंचायत

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**बांधकाम कामे**

ई-निविदा सूचना क्रमांक:-१६-२०२५-SrDENCo डीआरएम (डब्ल्यू), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवत आहे. ०१. कामाचे नाव: १-एडीईएन/डब्ल्यू/एसयूआर उपविभागांतर्गत एसयूआर (प्रकार-III ०८ युनिट्स आणि प्रकार IV ०६ युनिट्स) येथे जुन्या क्वार्टरच्या जागी क्वार्टरचे बांधकाम. २-एडीईएन/केएलबीजी आणि एडीईएन/डब्ल्यू/एसयूआर उपविभागांतर्गत डब्ल्यूडी (प्रकार-III ०४ युनिट्स), एसडीबी (आरबी-II ४ युनिट्स आणि प्रकार-III ०२ युनिट), एमआर (प्रकार-II ०४ युनिट्स) आणि एनजीएस (प्रकार-II ०४ युनिट्स) येथे जुन्या क्वार्टरच्या जागी क्वार्टरचे बांधकाम. ३- ADEN/W/SUR अंतर्गत SUR (प्रकार-III ०८ युनिट्स), WDS (प्रकार-II ०४ युनिट्स), MA (प्रकार-II ०४ युनिट्स) आणि MVE (प्रकार-II ०४ युनिट्स) येथे नवीन क्वार्टरचे बांधकाम. ४- ADEN/W/SUR अंतर्गत HG (प्रकार-II ८ युनिट्स आणि प्रकार-III २ युनिट्स), DUD (प्रकार-II ४ युनिट्स) आणि AKOR (प्रकार-II ४ युनिट्स) येथे नवीन क्वार्टरचे बांधकाम. ०२. कामाची अंदाजे किंमत: रु. १४,९८,५२,१२९.९९ ०३. बयाणा रक्कम रु. ८,९९,३००.०० ०४. काम पूर्ण करण्याचा कालावधी: १२ (बारा) महिने ०५. देखभाल कालावधी: २४ (चोवीस) महिने ०६. निविदा फॉर्मची किंमत: शून्य ०७. www.ireps.gov.in वेबसाइटवर निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ: १६.१२.२०२५ ते १५.०० वाजेपर्यंत. ०८. www.ireps.gov.in वर १६.१२.२०२५ रोजी १५.३० वाजेनंतर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ. ०९. वेबसाइट तपशील: www.ires.gov.in 10. टीप: संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइट वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येतो जेणेकरून या निविदा वेबसाइट: www.ireps.gov.in साठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. ANJ-67

परवानगीशिवाय रेल्वे रूळ ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-टेंडर सूचना**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम), भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने मध्य रेल्वे, सोलापूर, खालील कामांसाठी नामांकित कंपन्या / कंत्राटदारांकडून ई-टेंडर आमंत्रित करत आहे. निविदा सूचना क्रमांक: १७-२०२५-SrDENCo कामाचे नाव: १-पीएफ-१ चा विस्तार, पीएफ पृष्ठभाग सुधारणे, जेईयूआर स्टेशनवरील गर्दी व्यवस्थापनासाठी पाण्याचा वापर वाढवणे. २-पीएफ पृष्ठभाग सुधारणे (पीएफ १ आणि २ आणि पीएफ ३ आणि ४), निवृत्ती कक्षांची तरतूद, पीएफ १ आणि २ येथे सीओपीची तरतूद, पीएफ-१ येथे आरपीएफ पोस्ट, पीएफ १ आणि २ येथे शौचालय ब्लॉक, केडब्ल्यूव्ही स्टेशनवर एसएस बेंच. ३-गर्दी व्यवस्थापनपीएफ-२ (एमएल ते एचएल) वाढवणे, पीएफ-०१ येथे शौचालय ब्लॉक, यूएमडी स्टेशनवर बुकिंग ऑफिस वाढवणे. कामाची अंदाजे किंमत: रु. १८६२३९७७८.२५ बयाणा रक्कम: रु. १०८१२००.०० काम पूर्ण करण्याचा कालावधी: १२ महिने देखभाल कालावधी: २४ महिने निविदा सूचना क्रमांक: १८-२०२५-SrDENCo कामाचे नाव: १-सोलापूर स्थानकावर गर्दी व्यवस्थापनासाठी उत्सव काळात योग्य कुंपण, पिण्याच्या पाण्याची सुविधा आणि इतर सुविधांसह कव्हर शेडची तरतूद. २- केएलबीजी स्थानकावर गर्दी व्यवस्थापनासाठी कॅरेज वॉटरिंग सुविधा आणि सर्व प्रवाशांच्या सुविधांसह होल्डिंग एरियाची तरतूद. कामाची अंदाजे किंमत: रु. १५१४३२१५६.६१ बयाणा रक्कम: रु. ९०७२००.०० काम पूर्ण करण्याचा कालावधी: १२ महिने देखभाल कालावधी: २४ महिने www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ १६/१२/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ १६/१२/२०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी या निविदेत जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात घेण्यासाठी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. वेबसाइट: www.ireps.gov.in ANJ-68

परवानगीशिवाय रेल्वे रूळ ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे.

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

प्रस्तुत शाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेय विशेषतः मौजे साकत, तालुका बार्शी व जिल्हा सोलापूर येथील व आरापाराचे सालग्न तालुक्यातील य परिसरातील तमाम लोकांना कळविण्यात येते की, तालुका बार्शी पैकी मौजे साकत येथील शेतजमीन याचा गट नं. ८८ पैकी दक्षिणेकडील बाजूचे क्षेत्र ० हे ४९ आर, आकार १ रु ४३ पैसे हि मिळवत उत्तम अंबादास मोरे याचे नावे असून मालकीचे व कब्जे वहिवाटाची जमीन असुन याची चतुःसिमा पुर्वेस पिंपरी शिव, दक्षिणेस गट नं. ८९, पश्चिमेश- गट नं. ७४ उत्तरेस गट नं. ८८ पैकी उर्वरित क्षेत्र येणेप्रमाणे चतुःसिमा पुर्वक शेतजमीन आतील सर्व झाडझुडुप, दगड, माती, तरंगभुत वस्तु हक्कासह.

वर नमुद शेतजमीन हि उत्तम अंबादास मोरे यांचे पोकळ स्वरुपी नावे असुन सदर मिळकत आमचे अशिल बापु सोपान मोरे यांनी त्यांना दिनांक २२/०६/१९८९ रोजी पोकळ खरेदी दिलेली होती. सदर मिळकतीच्या बदल्यात आमचे अशिल यांना उत्तम अंबादास मोरे यांनी त्यांचे नावे असलेली दुसरी मिळकत खरेदी देण्याचे ठरवलेले होते. परंतु त्यावेळी यातील उत्तम अंबादास मोरे यांनी त्यांच्या नावे असलेली मिळकत आमचे अशिलांना फसवुन त्रयस्त व्यक्तीस विक्री केल्यामुळे आमचे अशिलांनी शेतजमीन गट नं. ८८ मधील त्यांचे वडील सोपान उध्दव मोरे यांचे असणारे कुळ कमी करून कब्जा दिलेला नाही. आमचे अशिल यांचेकडुन उत्तम अंबादास मोरे यांनी गट नं. ८८ मधील क्षेत्राचे पोकळ खरेदी घेतलेली आहे. सदर मिळकत आमचे अशिलांचे प्रत्यक्ष कब्जात असून सदर मिळकतीवर आमचे अशिलांचे कुळ आहे. त्यामुळे सदर मिळकत आमचे अशिलांना प्रथम खरेदी करण्याचा हक्क व अधिकार आहे.

सदरची मिळकत उत्तम अंबादास मोरे हे ७/१२ हक्कपत्रकी असलेल्या पोकळ नोंदीचा गैर आधार घेऊन त्रयस्त व्यक्तीस विक्री करण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे सदर मिळकत हि सरकारी मुल्यांकनाप्रमाणे आमचे अशिलांना खरेदी करण्याचा हक्क व अधिकार आहे. आमचे अशिल बापु सोपान मोरे यांचे कब्जे वहिवाटीत कुळ म्हणून पुर्वहक्कदारापासून गट नं. ८८ ताब्यात आहे. तशा वहिवाट सदरी नोंदी आमच्या अशिलाच्या वडीलांपासुन आहेत. परंतु उत्तम अंबादास मोरे यांनी त्यांची ७/१२ पत्रकी पोकळ नोंद मालक सदरात असल्याचा गैरफायदा घेवून वर नमुद मिळकत विक्रीस काढली आहे. तरी या नोटीसीने कळविण्यात येते की, कुळ म्हणून पुर्वापारपासून गट नं. ८८ आमचे अशिलाचे ताब्यात असल्याने कोणीही कसल्याही प्रकारचा गट नं. ८८ बाबत व्यवहार उत्तम अंबादास मोरे यांच्याशी करू नये केल्यास तो व्यवहार मुलतः रद्दबातल ठरेल व आमचे अशिलाचे हक्कावर व कब्जावर बंधनकारक राहणार नाही. कळावे हि जाहीर नोटीस दिली. ता. २१/११/२०२५

सही/-
**ॲड राहुल अंकुश पाटील**
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी
मो. ९५२७०२३११८
अशिलातर्फे ॲडव्होकेट

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### टेबल टेनिस स्पर्धेत भारताला दोन पदके

**नवी दिल्ली** : रोमानिया येथे झालेल्या आयटीटीएफ जागतिक युवा टेबल टेनिस स्पर्धेत भारताने चमकदार कामगिरी केली. पदार्पणाच्या वर्षातच एक रौप्य आणि एक कांस्य अशी पदके जिंकली. १९ वर्षांखालील मुलांच्या संघाने दमदार कामगिरी दाखवत अंतिम फेरीत प्रवेश केला. तथापि, विजेतेपदाच्या सामन्यात त्यांना बलाढ्य जपानकडून ०-३ असा पराभव पत्करावा लागला आणि रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. अंकुर भट्टाचार्य, अभिनंदन आणि प्रणुज यांनी अंतिम फेरीत जोरदार लढत दिली, परंतु जपानी खेळाडू युंसेई कावाकामी, काझुकी योशियामा आणि तमितो वातानाबे यांनी निर्णायक विजय मिळवला. १५ वर्षांखालील मुलींच्या संघानेही उत्कृष्ट कामगिरी करत जर्मनीला ३-१ असा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. त्यांना दक्षिण कोरियाकडून ०-३ असा पराभव पत्करावा लागला. त्यांनी कांस्य पदक जिंकले. १९ वर्षांखालील मुलींच्या स्पर्धेत भारताने उपांत्यपूर्व फेरी गाठली, जिथे चायनीज तैपेईने भारतीय खेळाडूंचे आव्हान ३-२ असे रोखले. या अजिंक्यपद स्पर्धेत भारताने पदकतालिकेत एक मजबूत उपस्थिती दर्शविली.

### महाराष्ट्राची वेटलिफ्टिंग, जलतरणात पदकांची लयलूट

**बिकानेर** : खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेतील पाचव्या पर्वात सलग दुसऱ्या दिवशी महाराष्ट्राच्या खेळाडूंनी पदकांची लयलूट केली. वेटलिफ्टिंगमधील ६५ किलो वजन गटात पुणे विद्यापीठाच्या संजय लोखंडेने सुवर्णपदकाचा करिश्मा घडविला. जलतरणात दीपक पाटील, साहिल पवार यांनी रुपेरी यशाला गवसणी घातली. अहिल्यानगरमधील पाथर्डी तालुक्यातील शेतकरी कुटुंबातील संजय लोखंडे याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करताना ६५ किलो वजन गटात १०७ किलो स्नॅच व १३७ किलो क्लीन अॅण्ड जर्क असे एकूण २४४ किलो वजन उचलून सुवर्ण पदक पटकावले. त्याला महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. डॉ. विजय देशमुख, प्रा. सचिन शिरसाट यांचे मार्गदर्शन लाभले. जयपूरमध्ये सुरू असलेल्या जलतरण स्पर्धेत पुरुषांच्या २०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक शर्यतीत मुंबई विद्यापीठाच्या दीपक बाजीराव पाटील यांनी अचूक तंत्र, दमदार वेग आणि उत्कृष्ट तयारीच्या जोरावर रौप्य पदक पटकावले. जैन विद्यापीठाच्या मणिकांत एल यांनी २:२४.८७ वेळ नोंदवत सुवर्णपदकावर नाव कोरले. पाटीलने २:२८.८६ वेळेत शर्यत पूर्ण करीत रूपेरी यशाची कमाई केली. पंजाब विद्यापीठाच्या केशव कौशिक यांनी २:२९.५५ वेळ नोंदवत कांस्य पदक मिळवले. पुरुषांच्या ५०मी फ्रीस्टाईल प्रकारात पुणे विद्यापीठाच्या साहिल पवारने रौप्य पदकाची कमाई केली. २४.३५ सेकंदात शर्यत पूर्ण करीत खेलो इंडिया स्पर्धेत पदकावर नाव कोरले. जैन विद्यापीठाच्या श्रीहरी नटराजने २३.७९ सेकंदाची अव्वल कामगिरी करीत सुवर्णपदक तर ज़ेवियर डीसूज़ाने कांस्यपदक पटकावले.

### सिंदारोव्ह फिडे विश्वचषक जिंकणारा सर्वात तरुण खेळाडू

**पणजी** : उझबेकिस्तानच्या जावोखिर सिंदारोव्हने बुधवारी येथे चीनच्या वेई यीचा पराभव करून फिडे विश्वचषक जिंकला. यामुळे तो १९ व्या वर्षी ही कामगिरी करणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला. वेई यीने पांढऱ्या सोंगट्यांसह आणखी एक सोपा ड्रॉ खेळला. परंतु सिंदारोव्हने पांढऱ्या सोंगट्यांसह दुसरा गेम जिंकला. सिंदारोव्ह आणि वेई दोघेही कँडिडेट्समध्ये खेळतील. वेईला ८५,००० डॉलर्स इतकी बक्षीस रक्कम मिळाली. सिंदारोव्ह, वेई यी आणि रशियाचा आंद्रे एसिपेंको या विश्वचषकातून पात्र ठरले.

# द. आफ्रिकेचा सामन्यासह मालिका विजय

### भारताचा ४०८ धावांनी पराभव ● सामनावीर मार्को यान्सन, मालिकावीर सायमन हार्मर

◆ **गुवाहाटी, २६ नोव्हेंबर**

भारताला घरच्या मैदानावर आणखी एका दारुण पराभवाचा सामना करावा लागला. दक्षिण आफ्रिकेने गुवाहाटी कसोटी ४०८ धावांनी जिंकली. दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारताला २-० ने पराभवाचे तोंड पाहावे लागले. दक्षिण आफ्रिकेने कोलकाता कसोटी ३० धावांनी जिंकली. दक्षिण आफ्रिकेने ५४९ धावांचे लक्ष्य ठेवले होते. जागतिक कसोटी विजेता द. आफ्रिकेने दुसऱ्या डावात भारताला १४० धावांत गुंडाळले आणि ४०८ धावांनी विजय मिळवला. हा भारताचा एकूण आणि घरच्या मैदानाच्या फरकाने सर्वात मोठा कसोटी पराभव आहे. यापूर्वी २००४ मध्ये नागपूरमध्ये भारताचा ऑस्ट्रेलियाने ३४२ धावांनी पराभव केला होता. सामनावीर मार्को यान्सन तर मालिकावीर सायमन हार्मर ठरला.

पाहुण्या संघाने पहिल्या डावात ४८९ धावा केल्या आणि दुसऱ्या डावात ५/२६० धावांवर डाव घोषित केला. भारतासमोर ५४९ धावांचे मोठे लक्ष्य होते.




भारताविरुद्ध २-० ने कसोटी मालिका जिंकल्यानंतर चषकासह आनंद साजरा करताना दक्षिण आफ्रिकेचे खेळाडू

भारतीय संघ दबावाखाली खेळला. पहिल्या डावात फक्त २०१ धावा आणि दुसऱ्या डावात १४० धावाच करता आल्या. दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी दोन्ही डावात भारतीय फलंदाजांना बांधून ठेवले. दक्षिण आफ्रिकेकडून सायमन हार्मरने दुसऱ्या डावात ६ बळी आणि सामन्यात ९ बळी घेतले.

भारताच्या दुसऱ्या डावाची सुरुवात खराब झाली. यशस्वी जयस्वाल (१३) स्वस्तात बाद झाला, मार्को यान्सनच्या गोलंदाजीवर यष्टीरक्षक काइल व्हेरेनने त्याला टिपले. त्यानंतर लगेच केएल राहुल (६) देखील सायमन हार्मरचा बळी ठरला. पाचव्या दिवशी, भारताने २७/२ च्या धावसंख्येसह फलंदाजी सुरू केली. तथापि, कुलदीप यादवला सायमन हार्मरने ५ धावांवर बाद केले तेव्हा एकूण धावसंख्येत आणखी १३ धावा जोडल्या गेल्या. त्याच षटकात ध्रुव जुरेल देखील बाद झाला. त्यानंतर भारतीय कर्णधार पंतने आक्रमकता दाखवत एक चौकार आणि एक षटकार मारून संघाची धावसंख्या ५८ धावांवर नेली, परंतु तोही हार्मरच्या बाउन्सवर १३ धावांवर एडेन मार्करामकरवी बाद झाला. चहापानानंतर, साई सुदर्शनचाही संयम सुटला आणि त्याला सेनुरन मुथुस्वामीने १४ धावांवर बाद केले. वॉशिंग्टन सुंदर (४४ चेंडूत १६) देखील फारशी प्रभावी कामगिरी करू शकला नाही. हार्मरने त्याला बाद केले.

नितीश रेड्डी शून्य धावांवर बाद झाला. भारताकडून केवळ रवींद्र जडेजा प्रभावी ठरला. त्याने द. आफ्रिकेच्या गोलंदाजांचा सामना करीत ८७ चेंडूत ५४ धावा केल्या. मोहम्मद सिराज बाद होणारा शेवटचा फलंदाज होता. जसप्रीत बुमराह १ धाव काढून नाबाद होता. ◀(*वृत्तसंस्था*)

## ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पराभवाचे दु:ख अजूनही कायम



**सूर्यकुमारचे मत**

◆ **मुंबई, २६ नोव्हेंबर**

कर्णधार सूर्यकुमार यादव हा रोहित शर्माच्या त्या शानदार संघाचा भाग होता ज्याने २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकात सलग १० सामने जिंकले होते आणि त्यानंतर अहमदाबादमध्ये झालेल्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून पराभव पत्करावा लागला होता आणि आता पुढच्या वर्षी त्याच ठिकाणी टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात त्यांना खेळवायचे आहे.

मंगळवारी, २०२६ च्या टी-२० विश्वचषकासाठी गतविजेत्या भारताला पाकिस्तान, अमेरिका, नेदरलँड्स आणि नामिबियासह गट अ मध्ये स्थान देण्यात आले होते, तर ऑस्ट्रेलियाला श्रीलंका, आयर्लंड, झिम्बाब्वे आणि ओमानसह गट ब मध्ये स्थान देण्यात आले होते.

१९ नोव्हेंबर २०२३ च्या झालेल्या अंतिम सामन्यानंतर भारताने ऑस्ट्रेलियाला दोन सामन्यांमध्ये पराभूत केले आहे, परंतु त्यानंतर दोन आयसीसी स्पर्धा जिंकणाऱ्या खेळाडूंमध्ये अंतिम फेरीत त्यांना पराभूत करण्याची इच्छा कायम आहे. गेल्या टी-२० विश्वचषकाच्या सुपर एट सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा २४ धावांनी पराभव केला आणि या वर्षीच्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या उपांत्य फेरीतही त्यांना चार गडी राखून पराभव केला.

पुढील वर्षी होणाऱ्या टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात कोणत्या संघाचा सामना करायचा आहे असे विचारले असता, सूर्यकुमारने म्हणाला, अहमदाबादचे नरेंद्र मोदी स्टेडियम, ऑस्ट्रेलिया.

भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरच्या संघाने उपांत्य सामन्यात ऑस्ट्रेलियाला हरवून अलिकडेच विवचषक जिंकला होता, तिनेही तेच मत मांडले. ◀(*वृत्तसंस्था*)



## श्री साई औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये क्रीडा सप्ताह उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग दि २६ नोव्हेंबर-**

श्री साई औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये क्रीडा सप्ताह उत्साहात झाला. या क्रीडा महोत्सवामध्ये विविध ट्रेडमधून ७२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सर्व निदेशकांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धा उत्साहात पार पडल्या. बुधवारी संविधान दिनाचे औचित्य साधून या स्पर्धांच्या विजेत्यांना श्री साई चॅरिटेबल संस्थेच्या अध्यक्षा डॉ. मीरा सूर्यवंशी आणि प्राचार्य श्याम गोवर्धन यांच्या हस्ते प्रमाणपत्र व ट्रॉफीचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संघराज गायकवाड यांनी केले. अहवाल वाचन प्रसाद पोळ यांनी केले. संभाजी जाधव यांनी सूत्रसंचालन केले.

## राज्य बास्केटबॉल स्पर्धेत सोलापूर व जळगाव विजेते

### डॉ. आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ आंतरविभागीय स्पर्धा

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ लोणेरे रायगड अंतर्गत झालेल्या आंतरविभागीय बास्केटबॉल स्पर्धेत पुरुष गटात सोलापूरने व महिला गटात जळगावने विजेतेपद पटकाविले. सोलापूर विभागामध्ये धाराशिव, लातूर, परभणी, हिंगोली व सोलापूर या जिल्ह्यातील खेळाडूंचा समावेश होता .

एन. के. ऑर्किड महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत छत्रपती संभाजी नगर, कोल्हापूर, पुणे, सोलापूर, नागपूर, जळगाव सहा विभागातील अभियांत्रिकी व फार्मसी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी भाग घेतला होता. या स्पर्धा दिवसा, सायंकाळी व विद्युतझोतातही घेण्यात आल्या. पुरुष गटातील अंतिम सामन्यात सोलापूरने कोल्हापूरवर तर मुलींमध्ये जळगावने



कोल्हापूर वर मात केली. सोलापूरच्या महिला संघास तृतीय स्थानावर समाधान मानावे लागले. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सिनेट व व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा सचिन गायकवाड, ग्रामीण टेक्निकल इन्स्टिट्यूट नांदेडचे प्रा सलीम सय्यद, बास्केटबॉलचे पंच राजेंद्र नारायणकर यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी आयोजन व पात्रता समितीचे सदस्य ए. एस जामदार, प्रा अमित वाडवेराव हे उपस्थित होते. यशस्वी खेळाडूंचे प्राचार्य डॉ बी के सोनगे, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास मेतन, डॉ व्ही. के. पत्की आदींनी अभिनंदन केले. या स्पर्धा पार पाडण्यासाठी आयोजन समिती सदस्य प्रा शिवशरण कोरे, प्रा गणेश बागल, प्रा ऋचा श्रीराम, आयटी सेलचे आर. आर. पाटील, लॅब असिस्टंट श्री पाटील, वामन पवार, इक्बाल शेख, प्रमोद लिगाडे, दादा पांगळे, खेळाडू समन्वयक प्रतीक राय, विद्यार्थी क्रीडा सचिव प्रवीण गुंजाळ यांच्यासह शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.




## शिंदे बीपीएड महाविद्यालयाच्या आकांक्षा गावडेला दोन सुवर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेत सुशीलकुमार शिंदे बीपीएड महाविद्यालयाच्या आकांक्षा गावडे हिने दोन सुवर्णपदके पटकाविली. दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत आकांक्षाने २०० व ४०० मीटर धावण्याच्या शर्यतीत ही कामगिरी केली. तसेच महाविद्यालयाने विद्यापीठाचा महिला गटात पांडुरंग मस्करने फिरता करंडक पटकाविला. आकांक्षाचे संस्थेचे अध्यक्ष सुभाष चव्हाण, उपाध्यक्ष विवेक चव्हाण, प्राचार्या डॉ.कलाश्री देशपांडे, प्रा.नागनाथ पुदे. प्रा.विजय तरंगे, सुनील राठोड, अनिल राठोड यांनी अभिनंदन केले.

## उमाबाई श्राविका विद्यालयास विजेतेपद

### शालेय शहर आट्यापाट्या : दोन गटात उपविजेते, दोन गटात तृतीय स्थान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

शासकीय मैदान नेहरूनगर येथे झालेल्या शालेय शहर आट्यापाट्या स्पर्धेत उमाबाई श्राविका विद्यालयाने १४ वर्षांखालील मुलींच्या गटात विजेतेपद पटकाविले. या संघाची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. १७ वर्षांखालील मुले व मुलींनी उपविजेतेपद तर १९ वर्षांखालील मुले व १४ वर्षांखालील मुलींना तृतीय क्रमांकावर समाधान मानावे लागले.

संघास क्रीडाशिक्षक सुहास छंचुरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, वरिष्ठ दिप्ती शहा, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांनी अभिनंदन केले.



**यशस्वी संघातील खेळाडू : विजेते** : १४ वर्षे मुली : जोया शेख, साक्षी सुरडे, तुलसी माने, तनिष्का माने, कृष्णाली सोनटक्के, वैष्णवी जव्हेरी, अमृता जाधव, अनुजा कांबळे, कल्याणी जाधव, देवयानी रोमन, उपासना गुंड, अंजली गरड, भाग्यश्री गरड.

**उपविजेते:** १७ वर्षे मुली : अनुष्का केत, समृद्धी जगताप, ईश्वरी शिंदे, सुमेधा ढावरे, वैष्णवी शेरखाने, अंबिका गुंड, अपूर्वा शिंदे, सृष्टी रणदिवे, श्रावणी बहिरमल, सुजाता ढोकळे. मुले : श्रेयस चट्टे, शरद कादे, कृष्णा काकडे, यश बेळ्ळे, ओम पवार, हर्ष कोकरे, श्रेयस भोसले, आरोष घोडके, प्रथमेश आगलावे, धीरज बरडे,विश्वतेज हचडे.

**तृतीय** : १९ वर्षे मुले : अथर्व साठे, राजवर्धन घोडके, हर्षवर्धन घोडके, अर्चित बनसोडे, समर्थ चुंगे, आरुष घोडके, राजू कबाडे, तन्म हिप्परकर, संकेत बोराडे, रुद्र होनराव, सोहम शिंदे, रोहित मठे, शुभम पौळ.

१४ वर्षे मुले : अथर्व होळकर नैतिक गायकवाड हर्षल चौगुले प्रणव भांगे सुरज बरडे, मयूर यमगर, यश भोज, हट्टीवाले, लोक बर्डे, वेदांत ढोकळे, शिवराज कोरे.

# सोलापूर विद्यापीठातील विविध खेळांच्या सराव शिबीरास सुरुवात

● महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव
● ८ खेळ, १६ संघ, १८७ जणांचा चमू सहभागी होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर -**

महामहिम राज्यपाल कार्यालय आयोजित महाराष्ट्र राज्याच्या क्रीडा जगतातील एक महत्त्वपूर्ण असलेल्या २७ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आठ खेळातील सोळा संघाच्या सराव शिबिरास सुरुवात झाली.

यावर्षी या स्पर्धेचे आयोजन स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे ४ ते ८ डिसेंबर या कालावधीत करण्यात आले आहे. सोलापूर विद्यापीठाकडून या महोत्सवासाठी खेळाडू, प्रशिक्षक आणि व्यवस्थापकांचा असा एकुण १८७ जणांचा मोठा चमू नांदेडकडे कूच करणार आहे. यात १६२ खेळाडू (पुरुष व महिला), २४ संघ प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक आणि १ स्पर्धा समन्वयक यांचा समावेश आहे. या स्पर्धेत अॅथलेटिक्स, बास्केटबॉल, कबड्डी, व्हॉलीबॉल, खो-खो, टेबल टेनिस, बॅडमिंटन व बुद्धिबळ या आठ क्रीडा प्रकारांचा समावेश आहे.





या स्पर्धेच्या अनुषंगाने सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर, प्र. कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, आणि संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग डॉ. अतुल लकडे यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंच्या स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिरांसाठी व तयारीसाठी विशेष नियोजन करण्यात आले.

बास्केटबॉल, कबड्डी, व्हॉलिबॉल, खो-खो, आणि बुद्धिबळ या खेळांच्या पुरुष व महिला संघांचे १० दिवसांचे स्पर्धा पूर्व सराव शिबीर विद्यापीठ परिसरात २२ नोव्हेंबरपासून सुरू झाले आहे. १ डिसेंबरपर्यंत हे शिबिर होणार आहे. या शिबिरामध्ये ११२ खेळाडू तसेच त्यांचे प्रशिक्षक व व्यवस्थापक यांच्या निवासाची व भोजनाची उत्तम व्यवस्था विद्यापीठ परिसरात करण्यात आली आहे. सरावासाठी व्हॉलिबॉल मैदान (फ्लड लाईटसह), बास्केटबॉल सिंथेटिक ग्राऊंड (फ्लड लाईटसह), कबड्डी मैदान (मॅटसह), आणि खो-खो मैदान यांसारख्या अद्ययावत सुविधा तयार करण्यात आल्या होत्या.

विद्यापीठ परिसराबाहेरील इतर ठिकाणी देखील खेळाडूंसाठी सराव शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. अॅथलेटिक्सचे शिबीर येथील डीबीएफ दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्सच्या मैदानावर व टेबल टेनिसचे पार्क मैदानावरील मुळे पॅव्हिलियन हॉल मध्ये तर बॅडमिंटनचे कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी येथे सुरू आहे. या संपूर्ण तयारी आणि स्पर्धेसाठी बाळासाहेब वाघचवरे यांची क्रीडा समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

### विद्यापीठाचे खेळाडू चांगली कामगिरी करतील

सोलापूर विद्यापीठाच्या या मोठ्या चमूची विद्यापीठ परिसरात व अन्य ठिकाणी विविध मैदानावर कसून तयारी सुरू आहे. या क्रीडा महोत्सवात सोलापूर विद्यापीठाचे खेळाडू निश्चितच चांगली कामगिरी करतील, अशी अपेक्षा आहे.

**-बाळासाहेब वाघचवरे, स्पर्धा समन्वयक**

### हे आहेत विविध खेळाचे प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक

- **अॅथलेटिक्स : डॉ. अशोक पाटील, डॉ. किरण चोकाककर,धनंजय देशमुख.**
- **बास्केटबॉल : डॉ. स्मिता सुरवसे, डॉ. महेश ढेंबरे, डॉ. प्रशांत तांबिले.**
- **व्हॉलिबॉल : नंदकिशोर देशपांडे, खंडू चव्हाण, डॉ. सुरेश लांडगे.**
- **कबड्डी : सुवर्णा कांबळे, विजय पवार, डॉ. रविंद्र कुनाळे.**
- **खो-खो :डॉ. सुभाष मारकड, डॉ. शिवानंद तोरवी, विशाल होनमाने.**
- **बॅडमिंटन : मकरंद भुजबळ, महादेव वाघमारे,. डॉ. समर्थ मनुकर.**
- **टेबल टेनिस : गुलनार हरकारे,अनिल परमार प्रा. संतोष गवळी.**
- **बुद्धिबळ :दिपक भोसले, जगदिश चेडे, डॉ. सुरेश भोसले.**

## महत्वाचे...



### सोनंद येथील जय काशीद यांची सैन्यदलात अग्नीवीरसाठी निवड

**सांगोला, दि.२६ नोव्हेंबर-**

सांगोला तालुक्यातील सोनंद गावचे सुपुत्र जय सर्जेराव काशीद यांची भारतीय सेनेमध्ये अग्नीवीर साठी निवड झाली आहे. या निवडीबद्दल सोनंद येथील आजी माजी सैनिक कल्याण संघ यांचे वतीने माजी सैनिक उत्तम चौगुले यांचे हस्ते जय काशीद यांचा सत्कार करण्यात आला. असेच कार्य संघटनेच्या वतीने पुढे चालू ठेवावे, जेणेकरून समाजाला एक चांगली शिस्त लागेल. तसेच देश सेवेसाठी नवीन पिढी तयार झाली पाहिजे. यासाठी सर्व माजी सैनिकांनी असे विचार आपल्या परिसरात मांडले पाहिजेत असे मनोगत उत्तम चौगुले यांनी यावेळी व्यक्त केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोनंद संघटनेचे अध्यक्ष ऑनरी सुभेदार मेजर रामचंद्र काशीद, सचिव ठोकळे व संघटनेचे सदस्य यांनी विशेष परिश्रम घेतले.



### कुसमोड येथे शालेय साहित्याचे वाटप; संविधान दिनानिमित्त आयोजन

**पिलीव, दि. २६ नोव्हेंबर-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जिल्ह्य परिषद लक्ष्मीनगर शाळेत आज संविधान दिनानिमित्त शाळेचे मुख्याध्यापक सुनिल डुरे सर यांच्या हस्ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना संविधान दिनाचे महत्व सांगीतले. आज संविधान दिनाचे औचित्य साधून या शाळेचे माजी मुख्याध्यापक स्व. शंकरराव लेंगरे गुरूजी यांच्या द्वितीय पुणयसमरणानिमीत शैक्षणिक साहित्याचे व खाऊचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.यावेळी अंगणवाडी सेविका सत्यभामा मदने, मदतनीस सरगर उपस्थित होते.

### करे महाराज दत्त मंदिरात आज होणार मूर्ती प्राणप्रतिष्ठापना

**मंगळवेढा दि. २६ नोव्हेंबर-**



दामाजीनगर, जुना ढवळस रोड, त्रिमूर्ती नगर येथे आज गुरुवार दि. २७ नोव्हेंबर रोजी नूतन श्री गुरुदेव दत्त मंदिर व मूर्ती प्राणप्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. यावेळी सकाळी नऊ वाजता मिरवणूक सोहळा, सकाळी दहा वाजता होम हवन, दुपारी १२.१५ वाजता आरती आणि दुपारी एक वाजता महाप्रसादाचे आयोजन केले आहे. गुरुवारी दि. ४ डिसेंबर रोजी श्री दत्त जयंती निमित्त फुलांचा कार्यक्रम दुपारी बारा वाजता आयोजित केला आहे. तरी सर्व भाविक भक्तांनी निर्गुण मठ श्रीक्षेत्र मंगळवेढा येथे सकाळी आठ वाजता उपस्थित राहण्याचे आवाहन तायप्पा करे महाराज यांनी केले आहे.

## निधन वार्ता...

### विजया कलढोणे



**करकंब, दि. २६ नोव्हेंबर-**

करकंब (ता.पंढरपूर) येथील विजया गोरखनाथ कलढोणे वय ७९ यांचे बुधवार, दि.२६ नोव्हेंबर रोजी विटा येथे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर विटा (सांगली) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, मुले, जावई, सुना नातवंडे असा परिवार आहे. त्या जि. प. प्राथमिक शाळेच्या सेवानिवृत्त मुख्याध्यापिका होत. गायक दीपक कलढोणे व एलआयसीचे विकास अधिकारी किरण कलढोणे तसेच एलआयसी सातारा विभागाच्या असिस्टंट डिव्हिजनल मॅनेजर ज्योती चोथे यांच्या त्या मातोश्री होत.

### दत्तात्रय वग्गु



**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

गोदूताई विडी घरकुल, कुंभारी रोड येथील दत्तात्रय परभय्या वग्गु (वय ८५) यांचे बुधवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे

### सुमन भोसले



**टेंभुर्णी, दि. २६ नोव्हेंबर-**

चव्हाणवाडी भोसले वस्ती येथील सुमन रामदास भोसले यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या सोलापूर डीसीसी बँकेचे कॅशियर औदुंबर भोसले यांच्या आई होत. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### रुद्रांबिका कंठीमठ



**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

येथील एलआयसी एजंट सोमशंकर कंठीमठ यांच्या मातोश्री रुद्रांबिका कंठीमठ (वय ७५) यांचे बुधवारी २६ नोव्हेंबर रोजी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दुपारी वीरशैव लिंगायत स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात ४ मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

# बार्शी बाजार समिती निवडणूक : सोपलांची परिवर्तन आघाडी अन् राऊतांची बळीराजा आघाडी यांच्यात जोरदार फाईट

### १६ जागांसाठी ३६ उमेदवार मैदानात; ७९ जणांची माघार दोन जागा यापूर्वीच बिनविरोध

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२६ नोव्हेंबर**



बार्शी उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी विविध मतदार संघातील ७९ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने १६ जागांसाठी ३६ उमेदवार रिंगणात राहिले आहेत. या निवडणुकीसाठी आमदार दिलीप सोपल यांच्या नेतृत्वाखालील बाजार समिती परिवर्तन आघाडी विरुद्ध माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या नेतृत्वाखालील बळीराजा विकास आघाडीत दुरंगी लढत होणार आहे. या निवडणुकीत व्यापारी मतदारसंघातील दोन जागी राऊत गटाचे उमेदवार यापूर्वीच बिनविरोध झाले आहेत.

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीसाठी सहकारी संस्था, ग्रामपंचायत, हमाल तोलार व व्यापारी मतदारसंघात ११७ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. अर्ज माघारी घेण्याच्या कालावधीत यापूर्वीच व्यापारी मतदारसंघातील तीन उमेदवाराने अर्ज माघारी घेतल्याने या मतदारसंघातील माजी आमदार राजेंद्र राऊत गटाचे भरतेश गांधी व प्रवीण गायकवाड यांची बिनविरोध निवड झाली होती. तर उर्वरित १६ जागांसाठी दाखल केलेले अर्जामध्ये ७९ जणांनी माघार घेतल्याने ३६ उमेदवार निवडणुकीच्या आखाड्यात शिल्लक राहिले आहेत.

बार्शी तालुक्यात १३५ विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसाट्यातील १६४३ संचालक ग्रामपंचायतीचे १०३९ सदस्य, आणि हमाल तोलार मतदारसंघातील १०२५ मतदारांना मतदानाचा अधिकार आहे. उमेदवारी अर्ज माघार घेतल्यानंतर दिलीप सोपल आणि राजेंद्र राऊत या दोघांनी आपल्या आघाडीची घोषणा करत उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे या दोघांमध्ये चुरशीची लढत या निवडणुकीसाठी होणार आहे.

#### दोन गटात सरळसरळ लढत

सोसायटी मतदारसंघात १ तर हमाल तोलार मतदारसंघात २, ग्रामपंचायत मतदारसंघात १ असे चार उमेदवार सोपल-राऊत यांचे पॅनल सोडून अपक्ष उभे राहिले आहेत. एकंदरीत या निवडणुकीसाठी दोन गटात सरळसरळ लढत होत आहे.

#### ७ डिसेंबरला मतदान

आज दि.२६ रोजी अंतिम उमेदवाराची यादी जाहीर केली जाणार आहे तर ७ डिसेंबर रोजी मतदान तर ८ डिसेंबर रोजी निकाल जाहीर केला जाणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी आबासाहेब गावडे यांनी सांगितले.

#### बळीराजा विकास आघाडीचे उमेदवार

- सहकारी संस्था सर्वसाधारण : सुरेश गुंड, बाबा गायकवाड, विजय गरड, अभिजीत कापसे, प्रभाकर डमरे, रविकांत साळुंखे, आणि यशवंत माने.
- सहकारी संस्था महिला राखीव : मनीषा ताकभाते, सुमन पाटील
- सहकारी संस्था इतर मागासवर्गीय : संजयकुमार माळी.
- सहकारी संस्था विमुक्त जाती भटक्या जमाती : रामेश्वर पाटील.
- ग्रामपंचायत सर्वसाधारण : नेताजी घायतिडक, अजित बारंगुळे.
- ग्रामपंचायत अनुसूचित जाती जमाती : सतीश हनुमंते.
- ग्रामपंचायत आर्थिक दुर्बल घटक : सचिन बुरगुटे
- हमाल तोलार प्रतिनिधी : गजेंद्र मुकटे

#### परिवर्तन आघाडीचे उमेदवार

- सहकारी संस्था सर्वसाधारण : युवराज काटे, संपतराव चव्हाण, नंदकुमार काशीद, राजकुमार पुजारी, धर्मराज गाडे, संपत अंधारे, अशोक काशीद.
- सहकारी संस्था महिला राखीव : सुषमा पाटील, ज्योती पवार.
- सहकारी संस्था इतर मागासवर्गीय : भास्कर काशीद
- सहकारी संस्था विमुक्त जाती भटक्या जमाती : सुभाष शेळके.
- ग्रामपंचायत सर्वसाधारण : आबासाहेब जगताप, सौदागर संकपाळ.
- ग्रामपंचायत आर्थिक दुर्बल : बाळासाहेब पिसाळ
- ग्रामपंचायत अनुसूचित जाती जमाती : विनोद वाघमारे.
- हमाल तोलार प्रतिनिधी : प्रेम बगाडे

## लाच घेताना तालुका कृषी अधिकारी एसीबीच्या जाळ्यात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**



महाडीबीटी पोर्टलवर शेतीसाठी मिळणाऱ्या अनुदानाच्या अर्जाला पूर्व मंजुरी देण्यासाठी १० हजारांची लाच मागितल्याप्रकरणी तालुका कृषी अधिकारी धनंजय सुभाष शेटे (वय ३१) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) सोलापूर युनिटने रंगेहात पकडले. तडजोडीअंती ८ हजार रुपयांची लाच स्वीकारताना ही कारवाई करण्यात आली.

तक्रारदार यांचे वडील यांनी कृषी विभागाकडून मिळणाऱ्या शेती अवजारांसाठी 'आपले सरकार' पोर्टलमार्फत ऑनलाईन अर्ज केला होता. या अर्जाला महाडीबीटी पोर्टलवर पूर्व मंजुरी देण्यासाठी आरोपी शेटे यांनी २५ नोव्हेंबर रोजी १० हजारांची मागणी केली होती. तडजोड झाल्यानंतर ८ हजार रुपये घेण्याचे ठरले. बुधवारी (दि. २६) रोजी उत्तर सोलापूर तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील कक्षात आरोपी शेटे समोरील टेबलवरील कागदांमध्ये ठेवलेली ८ हजारांची रक्कम स्वीकारताना एसीबी पथकाने त्यांना सापळा रचून रंगेहात पकडले. आरोपीविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा कलम ७ अंतर्गत गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ही कारवाई एसीबी पुणे शिरीष सरदेशपांडे, एसीबी पुणे अपर पोलीस अधीक्षक अजित पाटील, पर्यवेक्षण अधिकारी एसीबी सोलापूरचे पोलीस उपाधीक्षक प्रशांत चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शैलेश पवार, रविंद्र लांभाते, पोह. सलीम मुल्ला, पोह. श्रीराम घुगे, पोह. स्वामीराव जाधव, पोशि. राजू पवार, चापोशि. अक्षय श्रीराम यांनी केली. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर यांनी आवाहन केले आहे की, लाच मागणाऱ्या कोणत्याही लोकसेवकाबद्दल माहिती असल्यास नागरिकांनी त्वरित एसीबीशी संपर्क साधावा.

## वरिष्ठांच्या त्रासाला कंटाळून ग्रामसेवकाची आत्महत्या

### अधिकाऱ्यांनी पैशाची मागणी केल्याची तक्रार; सात दिवस मृत्यूशी झुंज

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२६ नोव्हेंबर-**

ग्रामसेवक प्रकाश बाविस्कर आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी अखेर मृताची मुलगी दिव्या बाविस्कर (वय-२४) यांनी बार्शी शहर पोलिसांत अधिकृत फिर्याद दाखल केली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सतत पैसे मागितले जात असल्यामुळे व वारंवार नोकरीवरुन काढून टाकण्याच्या धमक्या दिल्यामुळे वडिलांनी हा टोकाचा निर्णय घेतल्याचा गंभीर आरोप त्यांनी आपल्या जबाबात केला आहे. ही घटना १९ नोव्हेंबर रोजी घडली होती. सात दिवस उपचार सुरु असताना २५ नोव्हेंबर रोजी रात्री ११.३० वाजता हॉस्पिटलमध्ये प्रकाश बाविस्कर यांचा मृत्यू झाला.

**पैशाची मागणी, अफरातफरीत अडकविण्याची धमकी : दिव्या बाविस्कर यांचा गंभीर आरोप**

फिर्यादीनुसार, दिव्या बाविस्कर व तिचे आई-वडील व भाऊ संबरतनगर, बार्शी येथे भाड्याने राहतात. प्रकाश बाविस्कर हे अंबड (ता. माढा) येथील ग्रामपंचायत कार्यालयात सहा महिन्यांपासून ग्रामसेवक म्हणून कार्यरत होते. १९ नोव्हेंबर रोजी दुपारी १.३० च्या सुमारास कार्यालयातून फोन आला आणि वडिलांना तात्काळ ऑफिसमध्ये बोलाविण्यात आले. 'साहेब स्वतः भेटण्यास बोलावत आहेत', अशी माहिती त्यांना देण्यात आली. दिव्या यांच्या म्हणण्यानुसार फोननंतर वडील प्रचंड तणावात होते. त्यांनी मुलगी व पत्नीला सांगितले विस्तार अधिकारी अक्षर शेडगे यांचा फोन आल्याचे सांगत वरिष्ठ अधिकारी भुजबळ ऑफीसमध्ये तात्काळ भेटण्यासाठी बोलाविल्याचे सांगितले. मुलीने व पत्नीने काय झाले विचारले असता मी आधीही पैसे दिले आहेत, तरीही वारंवार कार्यालयीन अधिकारी पैशाची मागणी केली जाते. अधिकारी मला नोकरीवरुन काढून टाकण्याची धमकी देतात, अफरातफरीच्या गुन्ह्यात अडकवून नोकरीवरुन हाकलतो, असे म्हणतात. मी प्रामाणिकपणे काम करतो, तरीही जाणूनबुजून मानसिक त्रास दिला जात असल्याचे सांगितले. या त्रासाला मी कंटाळलो असल्याचे मुलगी व पत्नीने सांगितले. यावर पत्नी व मुलीने वडिलांना समजावून सांगितले होते.

**दुपारी २.३० वा. धक्कादायक घटना; घरातील किचनमध्ये गळफास**

वडिलांना समजवल्यानंतर दिव्या अभ्यासासाठी बेडरुममध्ये तर आई घराबाहेर पाणी मारण्यासाठी गेली असताना, किचनमध्ये मोठा आवाज झाल्याने आईने धावत आत येत पाहिले तेव्हा प्रकाश बाविस्कर यांनी किचनमधील सिलिंग फॅनला झेंडा दोरीने गळफास घेतलेला होता. आईने त्यांचे पाय पकडून वर उचलत मदतीसाठी आरडाओरडा केला. दरवाज्याची कडी बाहेरुन बंद असल्याने दिव्या बाहेरुन ओरडत राहिली. शेजाऱ्यांनी धाव घेऊन कडी उघडली. दिव्याने किचनमधील चाकूने दोरी कापून वडिलांना खाली उतरवले. शेजाऱ्यांच्या मदतीने व सीपीआर दिल्यानंतर त्यांना श्वास येऊ लागला आणि तातडीने जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. प्रकाश बाविस्कर यांच्यावर १९ ते २५ नोव्हेंबर या कालावधीत सात दिवस सदर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु होते. २५ नोव्हेंबर रोजी रात्री ११.३० वाजता त्यांचे निधन झाल्याची डॉक्टरांनी माहिती दिली.

**पोलीसांकडून गुन्हा दाखल करण्यास विलंब**

मृतदेह शवविच्छेदनासाठी बार्शी ग्रामीण रुग्णालयत आणला गेला. मुलगी दिव्या व नातेवाईकांनी पोलिसांना तुम्ही वरिष्ठ अधिकारी भुजबळ व विस्तार अधिकारी अक्षर शेंडगे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करा, अशी मागणी केली. मात्र पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी प्रोसेस करु द्या, असा गुन्हा दाखल करता येत नसल्याचे सांगितले. यावर नाराज झालेल्या कुटुंबिय, नातेवाईक व संघटना आक्रमक होत आरोपींवर गुन्हा दाखल झाल्याशिवाय मृतदेह ताब्यात न घेण्याचा कुटुंबीयांचा ठाम पवित्रा घेतला. गुन्हा घेण्यास पोलीस प्रशासन टाळाटाळ करीत असल्याने कुटुबियांनी पोलीस निरीक्षकास, आम्हाला न्याय द्या. आपल्यावर कोणाचा दबाव आहे का? दोषींना पाठीशी घातले जात आहे का? अशी विचारणा करत जोपर्यंत दोषींवर गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत प्रेत ताब्यात घेणार नसल्याचा पवित्रा घेतला. या प्रकरणामुळे रुग्णालय परिसरात मोठा तणाव निर्माण झाला होता. बराच काळ मुलगी दिव्या, नातेवाईक व ग्रामपंचायत कर्मचारी संघटना ठाण मांडून बसले. यानंतर अखेर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास का उशीर केला, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## सोलापूर महापालिका निवडणूक प्रारूप मतदार यादीवर बुधवारी एकूण ४५ हरकती प्राप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी जाहीर करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीवर महापालिका निवडणूक कार्यालयाकडे आज दिवसभरात एकूण ४५ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

पहिल्या दिवशी गुरुवार दि. २० नोव्हेंबर रोजी एकही हरकत आली नव्हती. शुक्रवार दि. २१ नोव्हेंबर रोजी एकूण ६ तक्रारी महापालिका निवडणूक कार्यालयात प्राप्त झाल्या होत्या. दरम्यान, दि. २४ नोव्हेंबर रोजी एकूण ५३ तक्रारी महापालिका निवडणूक कार्यालयाकडे प्राप्त झाल्या होत्या. २६ नोव्हेंबर रोजी ४५ हरकती प्राप्त झाल्या आहेत. यामध्ये दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झाले असतील तर त्यांची नावे त्या प्रभागातून वगळण्यात यावीत आणि संबंधित प्रभागात समाविष्ट करण्याबाबतचे ३५ अर्ज तर इतर ९ अर्ज दाखल झाले आहेत. मनपा संबंधित प्रभागगाच्या क्षेत्रातील विधानसभा भाग यादीत मतदारांची नावे असूनही मतदार यादीमध्ये त्यांची नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्याबाबत एक अर्ज आला आहेत. आज एकाच दिवशी एकूण ४५ हरकती व सूचनांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. दि. २० ते २६ नोव्हेंबर दरम्यान एकूण १७९ हरकती व सूचना आल्या आहेत. प्रसिध्द प्रारूप मतदार यादीवर नागरिकांना राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार दि.२० ते ३ डिसेंबर २०२५ अखेरच्या कालावधीत नमूद कारणाकरीता हरकती / सूचना महापालिका निवडणूक मुख्य कार्यालय डॉ. कोटणीस हॉल, आय.सी.आय.सी.आय. बँकेच्यावर या ठिकाणी कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत स्वीकारण्यात येतील. दुस-या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले, संबधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नांवे असूनही, महानगरपालिकेच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नांवे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ठ करणे या संदर्भात सूचना करावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

## अंतिम मतदारयादी आता १० डिसेंबरला होणार प्रसिद्ध

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

सोलापूर महापालिका निवडणूक २०२५ मतदार यादीसंदर्भात सुधारित कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार प्रारूप मतदारयादीवर हरकत घेण्यासाठी ३ डिसेंबरपर्यंत मुदत वाढविली आहे. सुधारित कार्यक्रमानुसार अंतिम यादी १० डिसेंबरला प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

यापूर्वी प्रारूप मतदारयादीवर हरकत घेण्यासाठी २७ नोव्हेंबर पर्यंत मुदत देण्यात आली होती. ही मुदत वाढविण्यात आली असून आता हरकत घेण्यासाठी ३ डिसेंबर ही अंतिम तारीख देण्यात आली आहे. पूर्वीच्या कार्यक्रमानुसार प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी जाहीर करण्याची तारीख ५ डिसेंबर होती, ती आता १० डिसेंबर करण्यात आली आहे. मतदान केंद्राच्या ठिकाणी यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक यापूर्वी ८ डिसेंबर होती. सुधारित कार्यक्रमानुसार आता ही यादी १५ डिसेंबरला प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक यापूर्वी १२ डिसेंबर होती. त्यात बदल करून आता ही यादी २२ डिसेंबरला प्रसिद्ध करण्यात येणार आहे. राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी यासंदर्भातील आदेश काढले आहेत.

## स्व. विष्णूपंत कोठे प्रतिष्ठानतर्फे बांधल्या २६ नवदांपत्यांच्या रेशीमगाठी

### पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**



गोरज मुहूर्तावरची लगबग....मंगलवाद्यांचे सूर...आणि अनुपम्य असा सोहळा 'याची देही याची डोळा' पाहण्यासाठी जमलेले हजारो वऱ्हाडी अशा वातावरणात बुधवारी स्व. विष्णुपंत कोठे प्रतिष्ठानतर्फे २६ जोडप्यांचा मोफत सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा अत्यंत आनंदी वातावरणात झाला. लिंगराज वल्याळ मैदानावर झालेल्या या सामुदायिक विवाह सोहळ्यास सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, संयोजक आमदार देवेंद्र कोठे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, मनपा आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्व. विष्णूपंत कोठे प्रतिष्ठानतर्फे मोफत सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे यंदाचे दुसरे वर्ष होते. प्रारंभी २६ जोडप्यांना सजवलेल्या बग्गीत बसवून शहरातून थाटात वरात काढण्यात आली. स्व. लिंगराज वल्लयाळ क्रीडांगणापासून सुरुवात झालेली ही वरात सत्यम चौक- साईबाबा चौक - ७० फूट रस्ता - संत तुकाराम चौक - अशोक चौक - वालचंद महाविद्यालय - कर्णिक नगरमार्गे पुन्हा स्व. लिंगराज वल्याळ क्रीडांगणावर आली. या ठिकाणी नव वधू-वरांचे हजारो वऱ्हाडींनी मोठ्या आनंदात स्वागत केले. सायंकाळी ५.४२ वाजताच्या गोरज मुहूर्तावर २६ नव्या वधू-वरांचा सामुदायिक विवाह सोहळा झाला.

पद्मशाली पुरोहित संघम वेदपाठशाळेच्या श्रीनिवास म्याडम पंतलु आणि आत्माराम चिप्पा पंतलू यांच्या मार्गदर्शनाखाली पुरोहितांनी मंत्रोच्चारात सर्व विवाह विधी करवून घेतले. अक्षता पडताच ढोल ताशांच्या गजरात फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करण्यात आली.

स्व. विष्णूपंत कोठे प्रतिष्ठानच्या या सामुदायिक विवाह सोहळ्यासाठी मैंदर्गी मठाचे अभिनव रेवणसिद्ध पट्टदेवरू, पालकमंत्री जयकुमार गोरे, संयोजक आमदार देवेंद्र कोठे, सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलिस उपायुक्त विजय कबाडे, सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, शहाजी पवार, अविनाश महागावकर, भाजपा महिला आघाडीच्या शहराध्यक्षा रंजिता चाकोते, देवेंद्र भंडारे, माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, पद्माकर काळे, प्रथमेश कोठे, विनायक कोंड्याल, माजी सभागृह नेते सुरेश पाटील, श्रीनिवास करली, गुरुशांत धुत्तरगावकर, त्याचबरोबर भाजपाचे माजी नगरसेवक, नगरसेविका तसेच भाजपाचे पदाधिकारी कार्यकर्ते आदी राजकीय, प्रशासकीय, धार्मिक, सांस्कृतिक, शिक्षण, वैद्यकीय, पत्रकारिता, विधी क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. बळवंत जोशी यांनी सूत्रसंचालन केले. विवाह सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी स्व. विष्णूपंत कोठे प्रतिष्ठानच्या स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### नूमवि मराठी शाळेत संविधान दिन, शहीद दिन साजरा

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

नू.म.वि. मराठी शाळेत संविधान दिन व शहीद दिन साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले, संविधान प्रास्ताविका व शहिदांच्या प्रतिमेचे पूजन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंत्रोळीचे सहशिक्षक श्रीरंग बनसोडे यांनी केले. मुख्याध्यापक स्मिता माळवदकर यांनी प्रास्ताविक केले. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी संविधानावर आधारित छोटी भाषणे दिली. शिक्षक सविता नवगिरे यांनी शहीद दिन व संविधान दिनाचे व महत्व मनोगतातून सांगितले. संविधान दिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्यात संविधान मूल्यांवर आधारित रंगभरण स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा,सुलेखन स्पर्धा,राष्ट्रीय प्रतीके स्पर्धा इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांची घेण्यात आली. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचे घटनेच्या महत्त्वाविषयी जागरूकता निर्माण झाली. या स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक बक्षिसे देऊन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री लंगोटे व सौ आळसंदे यांनी आभार मानले. संविधान रॅलीने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळा समितीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन यांचे मार्गदर्शन लाभले.



### व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मेडीयम स्कूलमध्ये संविधान दिन साजरा

**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**

व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये संविधान दिन साजरा करण्यात आला. संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापिका जी.एच. कल्याणी यांनी केले. सुरुवातीस विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाचे उद्देशिकेचे वाचन केले. विद्यार्थिनी राजलक्ष्मी येलदी हिने दिनविशेष आपल्या मनोगतातून व्यक्त केले. रेखा बाबानगरे संविधानाची प्रस्तावना व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाबद्दल माहिती दिली. सुनिता मंद्रुपकर यांनी संविधानातील नागरिकांचे मुलभूत कर्तव्य याविषयी माहिती दिली. यावेळी उपमुख्याध्यापिका मिना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर व नागमणी पेगडा व क्रीडा विभाग प्रमुख संतोष पाटील व संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापूरे, उपाध्यक्ष यमुना दिड्डी, सचिव संतोष गड्डम व सहसचिव नागेश शेंडगे आदी उपस्थित होते.

# टीईटी परीक्षा बंधनकारकमधून आश्रमशाळेतील शिक्षकांना वगळले

## ▸▸इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयाचा आदेश तात्पुरता रद्द

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**



आश्रमशाळेतील शिक्षकांना टीईटी परीक्षा म्हणजेच शिक्षक पात्रता परीक्षा बंधनकारक केल्याचा आदेश शासनाने काढला होता. तो आदेश रद्द करावा, अशी मागणी विविध शिक्षक संघटनेकडून करण्यात आली होती. त्याला यश आलेइतर मागास बहुजन कल्याण संचालनालयानकडून टीईटी परीक्षा बंधनकारक आदेश तात्पुरता रद्द करण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्यावतीने चालवण्यात येणाऱ्या आश्रमशाळांतील सर्व शिक्षकांना १७ ऑक्टोबर २०२५च्या पत्रानुसार उत्तीर्ण होणे अनिवार्य करण्यात आले होते. मात्र इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहसचिव सुनिल तुंबारे यांनी २० नोव्हेंबर रोजी पत्र काढून त्या आदेशाला स्थगिती दिली आहे. तसेच दोन वर्षात शिक्षक टीईटी परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास सेवा सक्तीने समाप्त करण्यात येतील, अशा प्रकारचा निर्णय जाहीर केला होता. त्यामुळे आश्रमशाळेतील शिक्षक अडचणीत आले होते. त्यामुळे हा आदेश रद्द करावा, अशी मागणी शिक्षकांमधून करण्यात आली होती. त्याला यश आले आहे.

टीईटी सक्तीच्या विषयाबाबत राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी या मागणीसाठी व टीईटी उत्तीर्ण न झाल्यास सेवा समाप्ती करण्यात येणार आहे, असा आदेश आश्रम शाळेतील शिक्षकांना लागू करण्यात आला होता. तो रद्द करण्यात यावा आणि शिक्षकांच्या मनात सेवेबाबत तयार झालेली भीतीची भावना दूर व्हावी. यासाठी शिक्षक मध्यवर्ती संघटनेच्या वतीने राज्यभरातील जिल्हाधिकारी कार्यालयावर ९ नोव्हेंबरला मूक मोर्चा काढण्यात आला होता. त्यामुळे आश्रमशाळेतील शिक्षकांच्या सेवा समाप्तीचा आदेश रद्द करण्यात आला आहे.

**- निलेश देशमुख,**
राज्य सचिव, शिक्षक सहकार संघटना.

आश्रमशाळांमधील शिक्षकांसाठी टीईटी परीक्षा सक्ती आदेश काढण्यात आले होते. त्या आदेशाला इतर मागास बहुजन कल्याण सहसंचालनालयाकडून स्थगिती देण्यात आले असून त्या शिक्षकांसाठी टीईटी परीक्षा सक्ती रद्द करण्यात आल्याचे पत्र प्राप्त झाले असून इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून त्या आदेशाची कार्यवाही करण्यात येणार आहे.

**- गणेश सोनटके,**
**सहसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग सोलापूर**

# शहिदांच्या स्मृती प्रित्यर्थ रक्तदान शिबिरात २०० रक्तदात्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ नोव्हेंबर-**



रोटरी क्लब ऑफ सोलापूर एमआयडीसी, तेजज्ञान फौंडेशन, रापेल्ली परिवार यांचे श्रुती इंजिनिअरिंग पोलीस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्यांच्या स्मरणार्थ आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन पोलीस उपायुक्त गौहर हसन यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद वाघमारे आणि श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयचे प्रेसिडेंट श्री सत्यनारायण बोल्ली व चेअरमन डॉ. माणिक गुर्रम, रोटरी क्लबचे अध्यक्ष रमेश कमटम, सचिव काशिनाथ कुंटला यांची प्रमुख उपस्थिती होती. पोलीस उपायुक्त गौहर हसन यांनी फित कापून व शहीद अशोक कामटे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून शिबिराचे उदघाटन केले.

यावेळी रोटरीचे भावी प्रांतपाल जयेश पटेल, माजी प्रांतपाल वेंकटेश चन्ना यांनीही भेट देऊन रक्तदात्यांना प्रोत्साहित केले. या शिबिरात तब्बल २०० रक्तदात्यांनी रक्तदान करून आपली सामाजिक बांधिलकी जपली. अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील श्रुती इंजीनियरिंग येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी तेजज्ञान ग्लोबल फाउंडेशनचे श्री गणेश ईराबती, बोल्ली ब्लड बँकेचे अशोक इंदापुरे, संजय मडुर, श्रीनिवास रिकमल्ले, रोटरी क्लब सोलापूर एमआयडीसीचे चार्वाक बुर्गल, सत्यनारायण गुर्रम, अंबादास गड्डम, गोपाळ रापेल्ली व कर्मचारी वृंदांनी शिबीर यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. मुख्य संयोजक परशुराम रापेल्ली यांनी मान्यवरांचे, रक्तदात्यांचे आभार मानले.

### सांगोला महाविद्यालयात संविधान दिवस साजरा

**सांगोला :** सांगोला महाविद्यालयात दि. २६ नोव्हेंबर रोजी राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, रिमेंम्बरन्स-डे समि ती व अंतर्गत गुणवत हमी कक्षा यांच्या वतीने संविधान दिवस साजरा करण्यात आला. यावेळी प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांनी संविधान दिनाचे महत्त्व विशद केले. यावेळी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन डॉ.जमीर तांबोळी यांनी केले.

कार्यक्रमाचे नियोजन अधिक्षक विलास माने यांचे मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे डॉ.रेणुकाचार्य खानापूरे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.रामचंद्र पवार, शारीरिक शिक्षण संचालक प्रा.जगदीश चेडे, प्रा.डॉ.तानाजी माने यांनी केले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार प्रकरण

# ॲट्रासिटीच्या गुन्हयातून प्रियकराची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२६ नोव्हेंबर-**



येथील नामांकित बँकेतील अधिकारी महिलेस लग्नाचे आश्वासन देऊन शारीरिक संबंध प्रस्थापित करून लग्नास नकार देऊन फसवणुक केल्याप्रकरणी दाखल गुन्हयातून आदित्यकुमार श्रीइंद्रदेव झा (वय ३०, रा. २९, पद्मानगर सोलापूर) याची येथील प्रमुख जिल्हा न्यायाधिश मनोज शर्मा यांनी आरोपीची निर्दोष मुक्तता केली.

यात हकीकत अशी की, एका नामांकित बँकेमध्ये फिर्यादी अविवाहीत तरूणी व आदित्यकुमार झा हे अधिकारी म्हणून कार्यरत होते. सन २०१४ मध्ये सदर तरूणी व आदित्यकुमार यांची पुणे येथे प्रशिक्षणा दरम्यान ओळख निर्माण झाली व तदनंतर दोघांची बदली सोलापूर येथे झाली, दि. २६ जानेवारी २०१५ रोजी आदित्यकुमारने लग्न करतो असे आश्वासन देऊन हॉटेलच्या रूममध्ये सुरूवातीस सदर तरूणीवर अत्याचार केला. त्यानंतर वेळोवेळी राहत्या फ्लॅटवर व तरूणीच्या घरी ३ फेब्रुवारी २०१६ पर्यंत शारीरिक संबंध प्रस्थापित केले. २८ मे २०१६ रोजी आंतरजातीय विवाह माझ्या घरच्यांना मान्य नाही, असे कारण सांगून लग्न करण्यास नकार दिला. तरूणीस तिच्या जातीवरून अपमानित केले.

अशा आशयाच्या पिढीत तरुणीच्या फिर्यादीवरून आदित्यकुमार यांचेविरूध्द बलात्कारासह ॲट्रासिटीचा गुन्हा विजापूर नाका पोलीस ठाण्यात दि. ३० ऑगस्ट २०१६ रोजी दाखल करण्यात आला. या गुन्हयाचा तपास तत्कालीन सहाय्यक पोलीस आयुक्त महेश जोशी यांनी करून आरोपीविरूध्द दोषारोपपत्र न्यायालयात पाठवले होते. या खटल्यामध्ये सरकार पक्षातर्फे एकूण १४ साक्षीदार तपासण्यात आले. खटल्याचे अंतिम युक्तीवादावेळी ॲड. मिलिंद थोबडे यांनी आरोपीची बाजू मांडताना आपले युक्तीवादामध्ये अशा प्रकरणामध्ये सुरूवातीपासून लग्न करण्याचा उद्देश नसताना लग्न करतो.

असे खोटे आश्वासन दिल्याचे शाबित झाल्यास आरोपीस दोषी धरता येईल. याप्रकरणामध्ये सरकार पक्षाने आरोपीचा सुरूवातीपासून लग्न करण्याचा हेतू नसताना देखील लग्नाचे आश्वासन दिले होते. ही बाब शाबित करण्यात आलेली नाही. तरूणीचे आरोपावरून पुर्णपणे संमतीने शारीरिक संबंध झाल्याचे दिसून येत असल्याने सदर तरूणीवर बलात्कार करण्यात आला असे म्हणता येणार नाही. केवळ लग्नास नकार दिल्याने पुर्ण संमतीने झालेले शारीरिक संबंध बलात्काराच्या व्याख्येत येत नसून अशा परिस्थितीत आरोपीचा सुरूवातीपासून तरुणीशी लग्न करण्याचा उद्देश नव्हता. असे म्हणता येणार नाही. असे मुद्दे मांडून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे सादर केले.

हे निवाडे न्यायालयाने ग्राह्य धरून आरोपीची मुक्तता केली. यात आरोपी तर्फे ॲड. मिलिंद थोबडे, ॲड. राजकुमार मात्रे यांनी तर सरकार पक्षातर्फे ॲड. आनंद कुर्डुकर यांनी तर मुळ फिर्यादीतर्फे ॲड. शशी कुलकर्णी यांनी काम पाहिले.




| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| १ | पायल सुरवसे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| २ | ममता वस्त्रद | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ३ | नंदिनी क्षीरसागर | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ४ | श्रेया चव्हाण | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ५ | वैष्णवी चव्हाण | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ६ | अथर्व मानाळे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ७ | समृद्धी बरडे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ८ | लक्ष्मी आळगुंडगी | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ९ | पुर्वी पटणे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| १० | वेदिका पुरूड | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ११ | आदर्श गाढवे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| १२ | रोहिणी उपरे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| १३ | शुभम वाघमारे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| १४ | अमृता डावरे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| १५ | मानसी थोरात | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| १६ | सिद्धी कर्पेकर | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| १७ | रत्नेश्वरी सागर | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| १८ | प्रतिक्षा निंबाळकर | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| १९ | अंजली रेवतगावकर | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| २० | तपस्या सिळे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| २१ | भक्ती साठे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| २२ | रिया देशमुख | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| २३ | प्रतीक काकडे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| २४ | समर्थ कुलकर्णी | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| २५ | अथर्व भोसले | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| २६ | रामेश्वरी बंडगर | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| २७ | प्रगती कांबळे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| २८ | श्रेया भोसले | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| २९ | अस्मिता शिंगनाथ | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ३० | सिद्धी कटके | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ३१ | स्नेहल तोडकरी | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ३२ | भाग्यश्री गरड | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ३३ | वैष्णवी गवळी | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ३४ | ममता आवले | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ३५ | परिणीती कदम | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ३६ | ज्ञानाश्री गवळी | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ३७ | उन्मती कदम | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ३८ | दिव्या पाटील | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ३९ | भक्ती भोकरे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ४० | वैभवी भोकरे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ४१ | तुषार मुंडे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ४२ | विरेश उण्णगड्डे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४३ | मनस्वी इंगुले | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४४ | पूर्वा भालेराव | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४५ | स्नेहा पाटील | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४६ | प्रिया बरगुडे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४७ | अंजूम नदाफ | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४८ | वैष्णवी पाताळे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४९ | भूमी आवताडे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५० | पद्मजा कारंजकर | भारती विद्यापीठ, सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| ५१ | प्रणाली गायकवाड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५२ | श्रेया नंदगावकर | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५३ | अनुराधा शिंदे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५४ | श्रेया मोरे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५५ | रेणुका कदम | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५६ | प्रिया पवार | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५७ | नेहा कुलकर्णी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५८ | वेदांतिका पवार | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५९ | पुनम मुठे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ६० | समृद्धी चौधरी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ६१ | स्वाती माशाळे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ६२ | अमृता यळमेली | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ६३ | विनित गायकवाड | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ६४ | अजय कोळी | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ६५ | हेमलता दलसिंगे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ६६ | नव्या पत्तत्तीपाका | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ६७ | निकिता माने | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ६८ | गौरी पागाद | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ६९ | विलास धडे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ७० | आरूशी निंबाळकर | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ७१ | आकांक्षा धडे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ७२ | अक्षय पवार | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ७३ | भुमिका तंबाके | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ७४ | श्रेया बगले | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ७५ | तेजस्विनी क्षीरसागर | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| ७६ | समृद्धी काळे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ७७ | सायली भोसले | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ७८ | अंजली बिराजदार | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ७९ | स्नेहा आदलिंगे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ८० | पायल चव्हाण | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ८१ | नंदिनी हिरोळे | एस.व्ही.एस.स्कूल, भवानी पेठ, सोलापूर |
| ८२ | मुकंद काळे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ८३ | वैष्णवी जव्हेरी | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ८४ | दिव्या चोपडे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ८५ | कृष्णाली माने | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ८६ | कल्याणी जाधव | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ८७ | उपासना मुंगल | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ८८ | श्रावणी शिंदे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ८९ | आर्या जाधव | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ९० | श्रुतिका सुरवसे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ९१ | श्रुतिका सुरवसे | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| ९२ | सुजाता अंबीगार | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ९३ | प्रिती मोरे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ९४ | कार्तिकी बडवणे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ९५ | स्वराली राठोड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ९६ | अमृता स्वामी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ९७ | तेजस पवार | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ९८ | प्रसाद कदम | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ९९ | वेदिका राठोड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| १०० | माधवी उण्णगड्डे | भारती विद्यापीठ, सोलापूर |

धाराशिव
दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## तांदुळवाडी येथे खंडोबा षष्ठी यात्रेचा उत्साह प्रारंभ!

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२६ नोव्हेंबर -**

येथे मंगळवार, २५ नोव्हेंबर ते गुरुवार, २७ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत खंडोबा षष्ठी यात्रेचे आयोजन करण्यात आले असून, यात्रेला गावातील नागरिक, महिला, युवक आणि बालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. तीन दिवस गावात धार्मिक उत्साह आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रंगत पाहायला मिळत आहे.

मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध काळी मैना फेम म्हाळसाकांत यांच्या जागरण-गोंधळ कार्यक्रमाने यात्रेची सुरुवात झाली. रात्री ८.३० वाजता झालेल्या या कार्यक्रमाला भाविकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली.



बुधवार दि. २६ नोव्हेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता श्री खंडोबा नैवेद्य कार्यक्रम पार पडणार आहे. रात्री टेंभुर्णी येथील अब्दुल भाई मुलाणी यांचा रंगबहार आर्केस्ट्रा कार्यक्रम सादर होणार असून यात्रेची रंगत अधिकच वाढणार आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### शिवकुमार खबाले यांना पीएचडी पदवी प्रदान

**कळंब, दि.२६ नोव्हेंबर -**

येथील शिवकुमार शामराव खबाले यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर अंतर्गत ज्युदो खेळाडूंच्या निर्वतनावर चिंता, ताण आणि आक्रमकता यांच्या परिणामाचा अभ्यास या विषयात पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी हि पदवी प्रो.डॉ. चंद्रजीत जाधव, संचालक व क्रीडा विभाग प्रमुख, तेरणा महाविद्यालय धाराशिव यांनी मार्गदर्शनाखाली संपादित केली. या यशाबद्दल कळंब छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने शिवाजी कापसे, शाम खबाले, उपाध्यक्ष प्रा. अविनाश मोरे, सहसचिव संजय घुले, कोषाध्यक्ष बाळकृष्ण गुरसाळे, भागवत चोंदे, नरहरी, सोनटक्के, प्राचार्य डॉ. हनुमंत माने आदी मान्यवरांच्या हस्ते डॉ. शिवकुमार खबाले यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.



### यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात संविधान दिन साजरा

**तुळजापूर, दि.२६ नोव्हेंबर -**


यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने संविधान दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद गायकवाड, उपप्राचार्य प्रा.डॉ. प्रवीण भाले, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. राजेश बोपलकर, प्रा. स्नेहा ठाकूर व सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते. संविधान दिनानिमित्त प्रास्ताविक व संविधान वाचन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ. प्रवीण भाले यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य मुकुंद गायकवाड तसेच डॉ. श्रीरंग लोखंडे यांनी संविधान दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिवाजी जेटीथोर तसेच आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. राजेश बोपलकर यांनी केले.



### तेरणा महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा

**धाराशिव, दि.२६ नोव्हेंबर -**

तेरणा महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ.डी.बी. मोरे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रा.डॉ. तुळशीराम उकिरडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थितांनी संविधानाची प्रस्तावना सामूहिकरीत्या वाचून लोकशाही, न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांची पुनःप्रतिज्ञा केली. कार्यक्रमाला प्रा. सुनील पाटील, प्रा. डॉ. अनघा तोडकरी, प्रा. डॉ. सुशीलकुमार सरवदे, प्रा. सुधाकर चव्हाण, प्रा. जयंत कांचनबटवे, प्रा. अविनाश ताटे, प्रा. छाया शिंदे, प्रा. प्रतुल चव्हाण यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती लाभली.



### ‘मोहेकर’मध्ये संविधान दिन साजरा

**कळंब, दि.२६ नोव्हेंबर -**

शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग, राज्यशास्त्र विभाग व रासेयोच्या संयुक्त विद्यमाने २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. हेमंत भगवान यांच्या हस्ते संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. डॉ. नामानंद साठे यांनी भारतीय संविधानाच्या मंजुरीपासून ते लागू होण्यापर्यंतचा इतिहास सांगत स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय या मूल्यांवर आधारित संविधानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. त्यानंतर सामूहिक उद्देशपत्रिकेचे वाचन करण्यात आले. कार्यक्रमाला संचालक प्रा.डॉ. संजय कांबळे, उपप्राचार्य जयंत भोसले, प्रा.डॉ. दीपक सूर्यवंशी, प्रा.डॉ. ज्ञानेश चिंते, डॉ.आर.व्ही. ताटीपामूल यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हनुमंत जाधव, अरुण मुंढे, रमेश भालेकर, विनोद खरात व कमलाकर बंडगर यांनी परिश्रम घेतले.

# श्री तुळजाभवानी मंदिर परिसराच्या विकासासाठी सरकारकडून १८०० कोटींचा निधी

## आ. राणाजगजितसिंह पाटील यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२६ नोव्हेंबर -**

तुळजाभवानी मंदिर परिसराच्या विकासासाठी सरकारकडून १८०० कोटींचा ऐतिहासिक निधी देण्यात आला आहे.

सर्व पुजारी, व्यापारी आणि नागरिकांना विश्वासात घेऊन शहरातील विकासकामे होत आहेत. धाराशिव-तुळजापूर रेल्वे मार्गाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू असून आपल्या महायुती सरकारने या प्रकल्पासाठी तब्बल ३२९५ कोटींचा निधी दिला आहे, असे प्रतिपादन आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.



नगर परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ प्रभाग क्र.९ येथे आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या कॉर्नर सभेचे आयोजन करण्यात होते.

त्याप्रसंगी बोलत होते. तुळजापूरच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय जनता पक्षाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार विनोद (पिटू) गंगणे, विविध प्रभागातील नगरसेवक पदाचे उमेदवाराकरिता आ. राणाजगजितसिंह पाटील कॉर्नर सभा घेत आहेत. तुळजापूरकरांचे उत्पन्न वाढवणे ही आपली जबाबदारी आहे.

आगामी काळात तुळजापूरचा कायापालट करण्याचा निर्धार व्यक्त करत, शहराच्या विकासासाठी नागरिकांचे सहकार्य आवश्यक असल्याचे यावेळी सांगितले.

यावेळी भाजपा नगराध्यक्ष पदाचे उमेदवार विनोद गंगणे, आनंद कंदले, विजय कंदले, प्रतीक रोचकरी यांच्यासह प्रभागातील प्रमुख कार्यकर्ते नागरिक, महिला भगिनी उपस्थित होते.

## महंत इच्छागिरी महाराजांची निवडणुकीतून माघार; जनतेला योग्य उमेदवार निवडाचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२६ नोव्हेंबर -**

नगराध्यक्ष पदासाठी अपक्ष उमेदवार म्हणून उभे असलेल्या महंत इच्छागिरी महाराजांनी २५ नोव्हेंबर रोजी प्रसिद्धी पत्रक जारी करून निवडणुकीतून माघार घेत असल्याचे जाहीर केले. तसेच तुळजापूरकरांनी नगराध्यक्ष पदासाठी योग्य उमेदवाराची निवड करावी, असे आवाहन त्यांनी केले.



महंत इच्छागिरी महाराजांनी भाजपकडे उमेदवारी मागितली होती. त्यासाठी त्यांनी भाजप आणि अपक्ष असे दोन अर्ज दाखल केले होते. मात्र भाजपची उमेदवारी न मिळाल्याने पक्षाचा अर्ज बाद झाला आणि अपक्ष अर्ज कायम राहिला. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी ते निवडणूक आयोगाच्या कार्यालयात पोहोचले असले तरी वेळेअभावी अर्ज काढता आला नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रसिद्धी पत्रकात त्यांनी नमूद केले की, गेल्या दोन वर्षांत तुळजापूरची चर्चा महाराष्ट्रभर झाली असली तरी ती धार्मिक, आध्यात्मिक किंवा सांस्कृतिक नव्हे तर अराजकता, व्यसन, भ्रष्टाचार आणि अस्वच्छ राजकारणामुळे झाली आहे. शक्तीपीठाची पवित्र ओळख वाचवण्यासाठी महंत मंडळींनी निवडणुकीत हस्तक्षेप करण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रसिद्धी पत्रकावर महंत इच्छागिरी महाराज, महंत मावजीनाथ महाराज आणि महंत व्यंकट अरण्य महाराज यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## इटकळमध्ये धाडसी चोरी; शेतकरी प्रकाश पांढरे यांचे ३ लाखांचे साहित्य लंपास



**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.२६ नोव्हेंबर -**

परिसरात बुधवारी पहाटेच्या सुमारास झालेल्या धाडसी चोरीने शेतकरी समाजात मोठी खळबळ उडाली आहे. शेतकरी प्रकाश पांढरे यांच्या गट क्रमांक १५३ मधील शेतात अज्ञात चोरट्यांनी प्रवेश करून सुमारे ३ लाख रुपये किंमतीचे शेतीसंबंधित साहित्य लंपास केले.

प्राथमिक माहितीनुसार, चोरट्यांनी शेतातील ५ एच.पी. पाणबुडी मोटर (किंमत ३० हजार), ५० फूट केबल (१२ हजार), तसेच विविध ठिबक सिंचन साहित्य (८ हजार) अशी शेती कामांसाठी अत्यावश्यक उपकरणे चोरीस नेली.

त्याचबरोबर पांढरे विहीर अनुदान योजनेतून नव्याने विहीर खोदत असून त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पोकलेन मशीनमधील अंदाजे २ लाख ५० हजार रुपये किंमतीची तांत्रिक साधनेही अज्ञातांनी लंपास केली आहेत. या चोरीमुळे विहीर व पोकलेनचे काम पूर्णपणे ठप्प झाले आहे.

याखेरीज पांढरे यांचे काका पंडित बाबाराव पांढरे व अण्णाराव बाबाराव पांढरे यांच्या शेतातील बोअरवेलमधील केबल वायरही चोरट्यांनी चोरल्याचे उघड झाले आहे. सलग झालेल्या या चोऱ्यांमुळे पांढरे कुटुंबाला मोठा आर्थिक फटका बसला आहे.

घटनेमुळे परिसरातील शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण पसरले असून रात्रीची गस्त वाढवावी, संशयास्पद वाहनांवर लक्ष ठेवावे आणि शेत परिसरात सुरक्षा वाढवावी, अशी जोरदार मागणी शेतकरी बांधवांकडून पोलिस प्रशासनाकडे होत आहे.

## न्यायालयीन लढ्याला यश; शेतकऱ्यांना मिळणार आणखी २२० कोटींचा दिलास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ नोव्हेंबर -**

धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. २०२० च्या खरीप हंगामातील अतिवृष्टीमुळे झालेल्या सोयाबीन पिकांच्या नुकसानीसंदर्भातील न्यायालयीन लढ्याचा निकाल शेतकऱ्यांच्या बाजूने लागला आहे. विमा कंपनीने नाकारलेल्या नुकसानभरपाईसाठी शेतकऱ्यांनी दिलेल्या या प्रदीर्घ लढ्यानंतर उच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण आदेश दिले असून, विमा कंपनीने जमा केलेले ७५ कोटी रुपये व्याजासह तातडीने शेतकऱ्यांना वितरित करण्याचे निर्देश दिले आहेत.



तसेच, राज्य सरकारने रोखून ठेवलेली १३४ कोटी रुपयांची देय रक्कम देखील शेतकऱ्यांना देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना एकूण २२० कोटी रुपयांची अतिरिक्त नुकसानभरपाई मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, अशी माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

सन २०२० मध्ये खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर सोयाबीन पिकांचे काढणीनंतर नुकसान झाले होते. मात्र, तांत्रिक कारणे सांगत बजाज अलायन्स या खासगी विमा कंपनीने नुकसानभरपाई देण्यास टाळाटाळ केली. तत्कालीन ठाकरे सरकारकडूनही अपेक्षित सहकार्य न मिळाल्याने हा प्रश्न न्यायालयात गेला.

आतापर्यंत न्यायालयाच्या आदेशाने २८९ कोटी रुपये शेतकऱ्यांना वितरित करण्यात आले आहेत. उर्वरित रक्कम न मिळाल्याने आमदार पाटील यांनी उच्च न्यायालयात पुढील लढा दिला. महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर या प्रकरणात जेष्ठ विधीज्ञांची नियुक्ती करण्यात आली. या लढ्यात जेष्ठ विधीज्ञ ॲड. धोर्डे पाटील, ॲड. व्ही. डी. साळुंखे, ॲड. राजदीप राऊत तसेच सर्वोच्च न्यायालयातील ॲड. चौधरी यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या युक्तिवादामुळे शेतकऱ्यांच्या बाजूने निकाल लागल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले व सर्व विधीज्ञांचे आभार मानले.

या निकालामुळे जिल्ह्यातील ३,३३,४१२ शेतकऱ्यांना अतिरिक्त नुकसानभरपाई मिळणार आहे. अन्यायाविरुद्ध लढा देऊन मिळवलेले हे यश समाधानकारक असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

शेतकऱ्यांचा न्याय मिळवण्यासाठी आपण ताकदीने लढलो आणि शेवटी जिंकलो. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अतिरिक्त २२० कोटी रुपये मिळणार असल्याचे मोठे समाधान आहे, असे आमदार पाटील यांनी नमूद केले.

## धाराशिवमध्ये संविधान व मतदान जनजागृती रॅली संपन्न

**धाराशिव, दि.२६ नोव्हेंबर -**

भारतीय संविधान दिनानिमित्त सामाजिक न्याय विभागातर्फे संविधान व मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन धाराशिव येथे करण्यात आले. जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते हिरवा ध्वज दाखवून रॅलीला सुरुवात झाली. रॅलीदरम्यान संविधान जनजागृती, मतदार जनजागृती व कायदेविषयक पत्रकांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास आयुक्त सचिन कवळे, शिक्षणाधिकारी सुधा साळुंके, एम.डी. देशमुख आणि विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

## आरपीआय उमेदवार शुभम कदम यांच्या अवैध धंदेमुक्त राजकारणाच्या वचननाम्याची शहरात चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२६ नोव्हेंबर -**

नगरपरिषद निवडणुकीत प्रभाग क्रमांक २ (अ) साठी आरपीआयचे अधिकृत उमेदवार तथा पत्रकार शुभम कमलचंद कदम यांनी सादर केलेल्या अनोख्या वचननाम्याने शहरात चांगलीच खळबळ उडाली आहे. १०० रुपयांच्या स्टॅम्पवर लिहिलेल्या या वचननाम्यात कदम यांनी नगरसेवक म्हणून निवडून आल्यास कोणत्याही प्रकारचा अवैध व्यवसाय-मटका, जुगार अड्डे, गांजा किंवा ड्रग्ज विक्री-करणार नाही तसेच स्वतःच्या नावाने किंवा सहकाऱ्यांना टपरी उभारून मटका-जुगारास प्रोत्साहन देणार नाही, असा स्पष्ट शब्दांत उच्चार केला आहे.

या धाडसी भूमिकेमुळे तुळजापूर शहरात राजकारणाच्या आड अवैध धंदे होतात का? असा प्रश्न मतदारांमध्ये मोठ्या प्रमाणावर चर्चेला आला आहे.

अनेकांनी सोशल मीडियावरही कदम यांच्या निर्णयाचे समर्थन करत पारदर्शकतेसाठी ही सकारात्मक सुरुवात असल्याचे मत व्यक्त केले आहे.

याशिवाय, कदम यांनी नागरिकांच्या मताचा आदर ठेवत नगरपरिषद कार्यालयातून स्वच्छ, पारदर्शक व लोकाभिमुख सेवा उपलब्ध करण्याचे आश्वासन दिले आहे.

त्यांच्या वचननाम्यात प्रभागातील स्वच्छता व्यवस्थेचा विकास, सार्वजनिक प्रकाशयोजनेतील उणीवा भरून काढणे आणि लहान मुलांसाठी असलेले हक्काचे मैदाने अबाधित राहावीत यासाठी ठोस उपाययोजना करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. राजकारणात प्रवेशानंतर जनसेवाच्या नावाखाली काही लोकप्रतिनिधी अवैध धंद्यांकडे वळतात, अशी सामान्यांची धारणा आहे.

परंतु शुभम कदम यांच्या वचननाम्यामुळे ही बाब उघडपणे चर्चेत आली असून शहरात या अनोख्या निर्णयाबद्दल वेगवेगळ्या स्तरांवर प्रतिक्रिया उमटत आहेत.

तुळजापूरच्या निवडणूक वातावरणात कदम यांच्या वचननाम्याची होत असलेली चर्चा आगामी निवडणुकीत कोणता प्रभाव निर्माण करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## व्ही. पी. शैक्षणिक संकुलात संविधान दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ नोव्हेंबर -**

छत्रपती संभाजीनगर रोडवरील व्ही. पी. शैक्षणिक संकुलातील कृषी महाविद्यालय व श्री साई जनविकास आयटीआय येथे भारतीय संविधान दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. डॉ. प्रतापसिंह पाटील व करण प्रतापसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी संविधानिक मूल्यांप्रती निष्ठा व्यक्त केली.

कार्यक्रमाची सुरुवात संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. प्रमुख अतिथी, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत संविधानाच्या प्रस्तावनेचे सामूहिक वाचन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी एकाच सुरात प्रस्तावना पठण करत लोकशाही, समता, स्वातंत्र्य व बंधुता या मुल्यांबद्दलची बांधिलकी दृढ केली.

प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी संविधान निर्मितीची ऐतिहासिक प्रक्रिया, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मोलाचे योगदान आणि भारतीय लोकशाहीची भक्कम पायाभरणी याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला कृषी महाविद्यालयाचे व्यवस्थापक प्रा. हरी घाडगे, डॉ. अमित गांधले, प्रा.डी.एस. शेटे, प्रा.एस.ए. दळवे, प्रा.ए.एस. शिंदे, प्रा.एस.व्ही. भालेकर, प्रा.पी.पी. गोटे, डॉ.बी.डी. घोडके, प्रा. नवनाथ मुंडे, प्रा. प्रवीण माळी, प्रा.आर.व्ही. सुतार, ग्रंथपाल ए.बी. कांबळे, ओंकार गिरी तसेच आयटीआयचे व्यवस्थापक प्रा.डी.एम. घावटे, एस.आर. पुदाले, एस.एस. भोरे, एस.एस. सुतार यांसह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## विविध उपक्रमांनी न.प. शाळेत संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२६ नोव्हेंबर -**

तुळजापूर खुर्द येथील न. प .प्रा. शाळा क्र .३ मध्ये संविधान दिन विविध उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.




कार्यक्रमाची सुरुवात संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करून आणि प्रतिमापूजनाने झाली. त्यानंतर शहरातील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद धर्मा गायकवाड यांचे व्याख्यान झाले. संविधान निर्मितीची प्रक्रिया, संविधानातील तरतुदी, नागरिकांचे हक्क, कर्तव्य, मूलभूत अधिकार, याविषयी विस्तृत विवेचन प्राचार्य महोदयांनी यावेळी केले. त्यानंतर भारतीय संविधानाचा विजय असो अशा उत्स्फूर्त घोषणा देत विद्यार्थ्यांनी वॉर्डातून प्रभात फेरी काढली.

प्रभात फेरीनंतर रंगभरण स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा ,मानवी साखळी अशा विविध उपक्रमांनी संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा किरण भगवान सुरवसे, पालक सचिन ठेले, शिक्षणतज्ज्ञ भगवान सुरवसे यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक तुकाराम मोटे, शिक्षण विभाग प्रमुख अशोक शेंडगे, सतीश यादव, निर्मला कुलकर्णी, जालिंदर राऊत, वैशाली गोमारे, पुष्पा काळे, दिगंबर थेटे, रणजीत नाईकवाडे, अतुल काकडे, अनिल राठोड ,दत्ता मेढे, गोविंद प्रताप, कल्पना व्हटकर, मुजाहिद शेख, सागर परमार यांच्यासह शाळेतील सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विरोधकांचे जातीपातीचे राजकारण मतदारांनी उधळून लावावे : आ. पवार

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, २६ नोव्हेंबर :** नगरपालिकेत झालेला भ्रष्टाचार, बोगस कामे, शासनाकडून जनतेच्या विकासासाठी आलेल्या निधीचा दुरुपयोग करुन शहरात होर्णाय़्या विकासकामात अडथळे निर्माण केले आहेत.या निवडणुकीसाठी नगराध्यक्ष पद ओबीसी महिला राखीव असताना आपल्या घरात उमेदवारी देवून ओबीसी समाजावर आन्याय केला आहे. मतदाराकडून प्रतिसाद मिळत नसल्याने आता विरोधकांनी जाती पातीचे राजकारण सुरु केले आहे. विरोधकांच्या या खेळ्या ओळखून मतदारांनी कट कारस्थान उधळून लावावे असे आव-ाहन आ. अभिमन्यू पवार यांनी केले आहे.

औसा नगरपालिकेच्या प्रभाग दहा मध्ये प्रचारसभा झाली. त्यावेळी आ. अभिमन्यू पवार बोलत होते. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजी माने, माजी नगराध्यक्ष किरण उटगे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती चंद्रशेखर सोनवणे, शहराध्यक्ष शिवरूद्र मुर्गे उपस्थित होते.

आ. अभिमन्यू पवार म्हणाले, औसा शहराचा सर्वांगीण व समतोल विकास



साधण्यासाठी जात किंवा धर्म पाहून मी कधीही निधी दिला नाही. ज्याला भागात गरज आहे त्या भागाला प्राधान्य देत कामे केली. पण विरोधकांना लोकांसमोर विकास दाखविण्यासारखे काही नाही. म्हणून जातीयतेचा आधार घेऊन विरोधक मतदारांची दिशाभूल करत आहेत. नगराध्यक्ष पद ओबीसी महिलेला राखीव असतानाही हे पद घरात ठेवण्याचा राष्ट्रवादीचा प्रयत्न हा ओबीसी समाजाचा अपमानच आहे असा समाचार घेत आ. पवार यांनी विरोधकांना टोलावले.

औसा शहरात नवीन सुसज्ज बसस्थानक, माकणी-औसा ५५ कोटींची पाणीपुरवठा योजना, शहरातील सर्व कच्च्या रस्त्यांचे सिमेंट रस्त्यांमध्ये रूपांतर, ४५ कोटींची वाढीव पाणीपुरवठा योजना आणि नवीन पाईपलाइनची कामे अंतिम टप्पात आ-हेत. शहराच्या सुरक्षेसाठी मुंबईतील मलबार हिलप्रमाणे सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असून शहरात अधुनिक पाच मजली उपजिल्हा रुग्णालय उभारण्यात येत आहे. मुस्लिम समाजातील दर्गे, मशीद व धार्मिक स्थळांच्या विकासासाठी १७ कोटी रुपये खर्च करण्यात आले असून हिंदू-मुस्लिम-दलित असा कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान न्याय देण्यात आला असल्याचे आ. पवार यांनी यावेळी स्पष्ट केले.

बेलकुंड एमआयडीसी व नवीन बसस्थानकाबाबत विरोधकांकडून पसरवल्या जाणाऱ्या अफवा पूर्णपणे खोट्या असून विकासावर बोलण्यासारखे काही नसल्याने विरोधक अशी दिशाभूल करीत असल्याचा आरोप पवारांनी केला. औशातील मतदारांनी यापूर्वी केलेल्या विकासाची दखल घेत महायुतीला कौल देऊन विकासाच्या पर्वात सहभागी व्हावे असे आवाहन आ. अभिमन्यू पवार यांनी केले. सभेला दहा व अकरातील प्रभागातील उमेदवार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विकासाची गती ठेवण्यासाठी भाजपला मत द्या : आ. निलंगेकर



**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, २६ नोव्हेंबर :** निलंगा शहरात सुरू असलेले विकास कामाची गती पुढील काळातही कायम ठेवण्यासाठी नगरपालिका निवडणुकीत भाजप उमेदवारांना मतदानरुपी आशीर्वाद द्या असे आवाहान माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी केले.

भाजपा उमेदवाराच्या प्रच-ारात शहरात आयोजित विविध ठिकाणच्या कॉर्नर बैठकीत ते बोलत होते. भाजपने नगराध्यक्ष पदासाठी संजय हलगरकर यांना उमेदवारी दिली असून नगर-सेवक पदासाठी विविध प्रभागातून आशा फुलारी, किशोर लंगोटे, लक्ष्मीबाई नागदे, ड विरभद्र स्वामी, पूजा मोहोळकर, ईश्र्वर गायकवाड, रमेश कांबळे, सोनाली हाडोळे, शोभा पोतद-ार, खदीर मासूलदार, सुधा वाघमारे, रुकसाना शेख, मनोज कोळ्ळे, मोबिनिसा आत्तार , धर्मप्रकाश निंबाळकर, मीनाक्षी निलंगेकर, निळकंठ पेठकर, तबसुम शेख, सचिन गायकवाड, रंजना कांबळे, अश्विनी सूर्यवंशी, रेश्मा माडीबोणे, नयूम शेख, यांना उमेदवारी दिली आहे.

आमदार निलंगेकर म्हणा-ले, निलंगा शहराला ४८ किलोमीटरहून नवीन पाईपलाईन टाकून कायमस्वरूपी पाणीपुरवठा सुरू करण्यात आली आहे. दोन नवीन पाण्याच्या टाक्या, संपूर्ण अंतर्गत पाईपलाईन, विविध समाज बांधवांसाठी समाजमंदिरे आणि मुस्लिम बांधवांसाठी दोन आधुनिक शादीखाने उभारण्यात आले आहेत. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपच्या सत्ता काळात प्रयत्न केले आहे. निलंगा शहराचा परिपूर्ण विकास करायचा असेल तर भाजपा महायुती हा एकमेव पर्याय आहे. आपल्या भविष्यासाठी योग्य निर्णय घ्या.

विविध प्रभागाच्या कॉर्नर बैठकीत माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी भाजपाच्या विकासकामांचा आढावा घेत मतदारांना महायुतीच्या बाजूने मतदान करण्याचे आवाहन केले.

यावेळी नगराध्यक्ष पद-ाचे उमेदवार संजयजी हलगरकर, नगरसेवक पदाचे उमेदवार आशाताई फुलारी, किशोर लंगोटे, पॅनल प्रमुख बाळासाहेब शिंगाडे, हरिभाऊ सगरे, प्रभारी मंगेश पाटील, गणेश धुमाळ, रवि फुलारी, संतोष बरमदे, व्यंकटराव धुमाळ, जगताप, भिवाजी घोलप, टोंम्पे, सुभाषराव झरे, नजीरभाई शेख, अनिल पाटील, प्रताप धुमाळ, तगदिश हाश्मी, मनिषा-ताई सिरसले, लक्ष्मीबाई चोपणे, रेखाताई बोकडे, इंदूबाई झरे, संध्याताई चौधरी, राहूल कांबळे, माधवजी गुमटे, व्यंकटराव पेठकर, महादेव वाले, बाल-ाजीराव पाटील, गोविंदजी हता-गळे, प्रदिप येरूळे, महेश सल-गरे, दत्ताजी कोराळे, शिवाजीराव म्हैत्रे, सुग्रीव कांबळे, प्रभाकर गुमटे, देवानंद साठे, जीवन निटूरे, आशितोष गुमटे, नंदकुमार लंगोटे, रणजित कोराळे, राजकुमार दाडगे, संतोष तुगावे, ज्ञानेश्वर पाटील, प्रभु डोंबे, वामन सिरस-ले, विजयकुमार हिरास, बाल-ाजी सोनवळकर आदी उपस्थित होते.

# नाईकनगर आश्रम शाळा संघ राज्यस्तरीय शुटिंग बॉल स्पर्धेसाठी पात्र

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, २६ नोव्हेंबर :**नुकत्याच सायन्स कॉलेज नांदेड येथे संपन्न झालेल्या शालेय विभागीय शुटींग बॉल स्पर्धेत माध्यमिक आश्रम शाळा नाईकनगर धसवाडी ता.अहमदपूर येथील १७ वर्षा खालील मुलींच्या संघाने नेत्रदीपक कामगिरी करत धाराशिवच्या संघाला अंतीम सामन्यात जोरदार टक्कर देऊन विजयश्री खेचून आणली व राज्यपातळीवर होणाऱ्या स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष शिव-ाजीराव भिकाने, कोषाध्यक्षा श्रीमती नागिमे एम. व्ही., सचिव सचिन भिकाने व सहसचिव डॉ.श्री शशीकिरण भिकाने, मुख्याध्यापक बालाजी झाडे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सर्वांनी विजयी संघाचे सर्व खेळाडू व प्रशिक्षक मधुकर संपते, भागेश आरदवाड व दिनकर गुट्टे यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.



# लक्कड जवळगा येथे शालेय मुलींना मोफत सायकल वाटप

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, २६ नोव्हेंबर :** शिरूर अनंतपाळ तालुक्यातील लक्कडजवळगा



येथील प्रथम नागरिक महिला सरपंच सौ. अर्चना विनोद कुंभार यांनी गावातील मुली रापका येथे शालेय शिक्षण घेण्यासाठी दररोज चार किलोमीटर पायी ये जा करतात. या मुलींना दररोज चार किलोमीटर अंतर पायी चालत जावे लागते चार किलोमीटर यावे ला-गते हे ग्रामपंचायत सदस्य यांच्या कानावर घातले.व सर्वानुमते या मुलींना मदत करण्याचा विचार केला ग्रामपंचायतीच्या वतीने महिला संरपच सौ अर्चना विन-ोद कुंभार यांच्या हस्ते आठवी ते दहावीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या १६ मुलींना सायकलींचे मोफत वाटप करण्यात आले.

गावातील मुली दररोज शिक्षणासाठी रापका हा दूरचा प्रवास करीत जाणे येणे करताता याचा मुलींना त्रास सहण करावा लागत होता येथील गावच्या संरपच महिला असल्याने त्यांच्या लक्षात आले व संरपच अर्चना कुंभार यांनी पंधराव्या वित आयोग निधीतून गावातील शेतकरी मजूर व गरजू मुलींना १६ सायकलींचे वाटप केले. यावेळी उपसरपंच बाबूराव जगताप, पोलिस पाटील अरविंद माने, ग्रामसेवक झहीरोद्दीन सय्यद, रयत क्रांती संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष शिव-ाजी पेटे, विनोद कुंभार, महादेव झरकर, विजयकांत पांचाळ, नामदेव झरकर, गोविंद कांबळे, रामेश्वर माळी, आशोक हजारे, राम तेलंगे, सुरेश पेटे, रावसाहेब कांबळे यांच्यासह ग्रामस्थ पालक विद्यार्थी उपस्थित होते.

# भ्रष्टाचारमुक्त पालिकेचा कारभार हा आमचा वचननामा

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, २६ नोव्हेंबर :** शहरातील सामान्य नागरिकाच्या हक्काच्या निधीची विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात लूट केली जात आहे असा आरोप करून उबाठा शिवसेना उमेदवार लिंबन महाराज रेशमे म्हणाले, निवडून आल्यानंतर जन-तेचा सेवक म्हणून शहरात गुणवत्तापूर्ण विकासकामे व शहरातील नागरिकांना दर्जेदार मूलभूत सुविधा उपलब्ध करून देवू. भ्रष्टाचार मुक्त पालिकेचा कारभार.. हा आमचा विकासाचा जाहीरनामा नव्हे तर तो आमचा वचननामा आहे असे मत लिंबन महाराज यांनी व्यक्त केले.

निलंगा नगरपालिका निवडणुकीत उबाठा शिवसेना व शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांची शहर विकास आघाडी झाली असून या आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार समाजसेवक लिंबन महाराज रेशमे आहेत.आघाडीचा जाहीरनामा प्रकाशन करताना आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी डॉ. शोभाताई बेंजरगे, अविनाश रेशमे, सुधीर मसलगे, सुनील सूर्यवंशी, शेख इफरोज, मारुती गायकवाड

## उबाठा शिवसेना उमेदवार लिंबन महाराज रेशमे यांचे पत्रकार परिषदेत प्रतिपादन

यांच्यासह शहर विकास आघाडीचे उमेदवार व दोन्ही पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलताना लिंबन महाराज म्हणा-ले, डॉ बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करून त्यांनी दिलेल्या संविधानाप्रमाणे पालिकेचा कारभार करण्यासाठी सामान्य माणसाला विकासाचा केंद्रबिंदू म्हणून आज संविधान दिनाचे औचित्य साधून जाहीरनामा प्रकाशित करण्यात येत आहे .

शहरात विस्कळीत झालेली पाणीपुरवठा सुरळीत करून २४ तास पाणी पुरवठा, भाजीपाला विक्रेत्यांची व नागरिकांच्या सोयीच्या ठिकाणी भाजीपाला मार्केट, नगर परिषदेच्या रोजंदारीवरील कामगारांना मुस्लिम समाजाच्या व मातंग समाजाच्या व्यक्तीला नगराध्यक्ष करण्यासाठी आपणच



कायम करण्यासाठी प्रयत्न करणार, शहरा-तील अनेक घराचे प्रलंबित कबाले वाटप, बाहेरच्या गुत्तेदाराला विकास कामे न दर्जेदार विकास कामे करणाऱ्यांना विकास कामे देऊन स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणार, यासह विविध योजनेच्या माध्यमातून शहरांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नगरपालिकेत आघाडीचे सत्ता असताना पुढाकार घेऊन हमीद शेख व बालाजी दोरवे यांना नगराध्यक्ष केले असल्याचे आवर्जून सांगितले.

नगर परिषदेत सत्तेत आल्यानंतर गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पत्रकारांच्या पत्रकार भवन चा प्रश्न प्राधान्याने सोडवू असे त्यांनी सांगितले. पत्रकार परिषदेचे प्रास्ताविक शोभाताई बेंजरगे यांनी केले तर आभार अविनाश रेशमे यांनी मानले.

# चाकुरात संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन व रॅली

**त.भा. वृत्तसेवा,**

**चाकूर, २६ नोव्हेंबर :** भारतीय संविधान दिनानिमित्त चाकूर येथील डॉ.अण्णाभाऊ साठे चौक येथे भारतीय संविधानाचा गौरव साजरा करून भारतीय संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. दरम्यान चाकूर शहरातून संविधान रॅली काढण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अद्वितीय प्रज्ञा, कर्तृत्व आणि विचारांची सर्वोच्च देणगी म्हणजे भारतीय संविधान. त्यानिमित्ताने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जय जयकार आणि संविधानाचा जयघोष करण्यात आला. सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातही बाबासाहेबांना अभिवादन करून संविधानदिन उत्साहात साजरा केला. यावेळी चाकूर शहरा-तून संविधान रॅली काढण्यात आली. याप्रसंगी चाकूर शहरा-तील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# संविधानाने दिलेल्या मुलत्वाचे पालन करा : वरंडेकर




**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, २६ नोव्हेंबर :** दोन वर्षे अकरा महिने अठरा दिवस अभ्यास करुन भारतरत्न विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांने संपूर्ण जगाने आदर्श घ्यावाअशी सर्व श्रेष्ठ भारतीय राज्य घटना आपल्या देशाला दिली त्यात समता स्वातंत्र्य बंधुता या मुलतत्वचा समाविष्ट केला असून समता, स्वातंत्र्य, बंधुता, या मुलतत्वाचे पालन करा असे प्रतिपादन दे-वणी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सागर वरंडेकर यांनी केले.

देवणी पंचायत समितीच्या सभागृहात संविधान दिनाचे आयोजन करण्यात आले होते तेव्हा ते बोलत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन भारतीय राज्य घटनेच्या उद्देश पत्रिकेचे वाचन यावेळी करण्यात आले त्यानंतर देवणीचे कर्तव्यदक्ष गटविकास अधिकारी सागर वरंडेकर यांचा सा. लोकवैभव वृतपत्राचे संपादक गिरीधर गायकवाड नागराळकर यांच्या वतीने संविधानाची प्रत देऊन सन्मान करण्यात आला. या संविधान दिन कार्यक्रमास सहा. गटविकास अधिकारी ज्ञानोबा मूळे, तालुका कृषि अधिकारी कृष्णा मुंडे, धनंजय पवार,संतोष श्रुनगारे, यशवंत माने, बालाजी सूर्यवंशी, विश्वनाथ माचेवाड दिलीप कांबळे श्रीमती संगीता एस. सूर्यवंशी कनिष्ठ,सहा.आय. सी. डी. एस. अशोक कट्टेवार, विस्तार अधिकारी ग्रामपंचायत अल्लापुरे, आय. सी. डी. एस. कोठूळे एम.ए व कार्यालयातील सर्व कर्मचारी अधिकारी उपस्थित होते.सूत्रसंचालन अशोकराव कट्टेवार यांनी केले व उपस्थिताचे आभार मानले.

# निवडणूक नियम पालनासाठी ड्रोनची नजर : रायबोले

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, २६ नोव्हेंबर :** अहमदपूर नगरपरिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून, दिनांक २ डिसेंबर रोजी होणाऱ्या मतदानाच्या पार्श्र्वभूमीवर अहमदपूर पोलीस दल पूर्णपणे सज्ज झाले आहे. शहरात आचारसंहितेची कडक अंमलबजावणी करण्यासाठी पोलिसांनी ॲक्टिव्ह मोड स्वीकारला असून, शहरावर आता सीसीटीव्ही आणि ड्रोनची करडी नजर असणार आहे, अशी माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांनी चाय पे चर्चा करताना दिली.

निवडणूक प्रक्रिया भयमुक्त आणि पारदर्शक वा-तावरणात पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाने कंबर कसली आहे. शहरातील प्रमुख प्रवेशद्वारे आणि महत्त्वाच्या रस्त्यांवर स्थायी व तात्पुरती नाकाबंदी सुरू करण्यात आली असून, संशयास्पद वाहनांची कसून तपासणी केली जात आहे. तसेच, अवैध शस्त्रे आणि दारूचा साठा रोखण्यासाठी पोलीस ठाण्याच्या हद्दीत 'कोम्बिंग ऑपरेशन' तीव्र करण्यात आले आहे. सराईत गुन्हेगार आणि तडीपार आरोपींवर प्रतिबंधात्मक कारवाई केली जात आहे

केवळ मानवी गस्तच नव्हे, तर तंत्रज्ञानाच्या मदतीनेही शहरावर वॉच ठेवला जाणार आहे. अहमदपूर शहरातील बंद पडलेले सीसीटीव्ही कॅमेरे पुन्हा कार्यान्वित करण्यात आले असून, त्याचे थेट प्रक्षेपण पोलीस ठाण्यातून पाहिले जात आहे. याशिवाय, प्रचार सभा, रॅली आणि मिरवणुकीवर आकाशातून लक्ष ठेवण्यासाठी ड्रोन कॅमेऱ्यांचा वापर केला जाणार आहे. सोशल मीडियावरही पोलिसांची सायबर टीम विशेष लक्ष ठेवून असून, आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाईचा इशारा



देण्यात आला आहे.

याविषयी बोलताना उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले म्हणाले की, निवडणूक काळात शांतता व सुव्यवस्था राखणे आणि मतदारांमध्ये विश्र्वास निर्माण करणे ही आमची प्राथमिकता आहे. आचारसंहितेचा भंग करणाऱ्या कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा उमेदवाराच्या कृतीवर 'शून्य सहनशीलता' (नशी ढेश्रशीरपलश) धोरणानुसार कठोर कारवाई केली जाईल. नागरिकांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता निर्भयपणे मतदान करावे.

नागरिकांना आपल्या परिसरात पैसे वाटप, दारू वाटप किंवा आचारसंहितेचा भंग होताना दिसल्यास अवघ्या १०० मिनिटांत भरारी पथक घटनास्थळी पोहोचून कारवाई करेल. तक्रारदाराचे नाव गुप्त ठेवण्याची सोयही या पमध्ये उपलब्ध आहे. अशा महत्व पूर्ण माहिती त्यांनी सांगितली.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज लोह्यात सभा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ नोव्हेंबर-**

लोहा व कंधार नगरपरिषद निवडणुकीतील भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची उद्या गुरुवार २७ नोव्हेंबर रोजी लोहा येथे जाहीर सभा होणार असून, माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सभेला राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री व नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे आदी नेते प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.



गुरुवारी २७ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता बैल बाजार, लोहा येथे ही मुख्यमंत्री फडणवीस यांची जाहीर सभा होईल. लोहा नगरपरिषदेतील भाजपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार गजानन सूर्यवंशी तसेच कंधार नगरपरिषदेतील भाजपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार गंगाप्रसाद यन्नावार यांच्यासह दोन्ही शहरातील नगरसेवक पदाचे भाजपचे उमेदवार या सभेला उपस्थित राहणार आहेत. या सभेस नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भारतीय जनता पक्षाचे नांदेड दक्षिण ग्रामीणचे जिल्हा अध्यक्ष डॉ.संतूक हंबरडे,लोहा विधानसभेचे भाजपा प्रभारी एकनाथ पवार यांनी केले आहे. जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचारात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नांदेड जिल्ह्यातील ही पहिलीच जाहीर सभा असल्याने त्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# स्वप्नपंख नाटकाने दुर्लक्षित घटकांच्या शैक्षणिक प्रश्नाला केले अधोरेखित

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ नोव्हेंबर-**

सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने आयोजन करण्यात आलेल्या ६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा २०२५-२६ च्या प्राथमिक फेरीत नांदेड केंद्रावर मंगळवार ता. २५ रोजी स्वप्नरंग सांस्कृतिक संस्था, नांदेड च्या वतीने दिनेश कवडे लिखित आणि दिग्दर्शित 'स्वप्नपंख ' हे नाटक सादर करण्यात आले. शंकरराव चव्हाण नाट्यगृह नांदेड येथे झालेल्या या प्रयोगाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

मनुष्य जन्मताना पंख घेऊन येत नाही. पण त्याच्या स्वप्नांना मात्र पंख असतात आणि त्या पंखांना बळ देण्याचं काम हे शिक्षण करत असतं हे स्वप्नपंख या नाटकाने आधीरेखित केले. स्वप्नपंख हे नाटक एका चहा



विक्रेता आणि त्याच्या मुलीची गोष्ट नाही तर त्या लाखो कुटुंबांची कहाणी आहे, जे रोज जगण्यासाठी लढतात, धावत राहतात, पडतात, पुन्हा उभे राहतात.

या नाटकातील ज्ञानेश्वर ने हे संघर्ष करणाऱ्या बापाची भूमिका उत्तम रित्या सादर केली. मुलीचं भविष्य वाचवण्याची धडपड तर दुसऱ्या बाजूला प्रशासकीय व्यवस्था कागद, नियम, राजकारण, धर्माचे खेळ यात गरीब माणूस कसा चिरडला जातो हे या नाटकाच्या माध्यमातून दिग्दर्शक दिनेश कवडे यांनी प्रभाविपणे मांडले. या नाटकातील एका प्रमुख भूमिकेत असलेली आराध्या हीचा अभिनय प्रेक्षकांच्या टाळ्या मिळवून गेला. कथेला अनुरूप नैपथ्य, प्रभावी प्रकाश योजना आणि दृशांना अनुसरून संगीत हे या नाटकाचे वैशिष्ट्य होते.

या नाटकातील ज्ञानेश्वर ची भूमिका (शाम डुकरे), विद्या (आराध्या पांचाळ), मंगला (सौ. किरण टाकळे), सलीम (गौतम गायकवाड), रहीम (अथर्व देसाई), मास्तर (संदेश महाबळे), कर्मचारी (डॉ. अजय पाटील), आक्का (शांती वैद्य), पंकज (अमोल कुंटेवाड), दुष्यंत (नागेश डोईबळे), कार्यकर्ता (परीक्षित पांचाळ), अमोल (समर्थ खेडकर), छोटा मुलगा (दिशांत कवडे), नृत्यांगना (सेजल क्रिपलानी, जान्हवी कदम, राखी देशमुख) यांनी पार पाडली. तर नाटकाला प्रभिविपणे सादर करण्यात प्रकाश योजना (प्रतिभा शेंडे, कैलाश पोपुलवाड), संगीत संयोजन व नृत्य दिग्दर्शन (सुधांशू सामलेट्टी), नैपथ्य (दिनेश कवडे व गौतम गायकवाड), रंगभूषा (किरण टाकळे, सुधांशू सामलेट्टी), वेशभूषा (शांती वैद्य, संदेश महाबळे) व गीत रचना (दिनेश कवडे) यांचे मुख्य योगदान होते.

आज सायंकाळी ७ वा. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड द्वारा निर्मित, अतुल साळवे द्वारा लिखित व दिग्दर्शित 'तो ती आणि मनोहर' हे नाटक सादर होणार आहे. नाममात्र रु. १५ व रु. १० मध्ये तिकीट दर असलेली ही राज्य नाट्य स्पर्धा सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी व सांस्कृतिक कार्य संचालनालायाचे संचालक विभीषण चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून जास्तीत जास्त नाट्य रसिकांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान करण्यात आले आहे.



## बिरसा मुंडा व शामा कोलाम यांच्या प्रतिमांचे अनावरण

**किनवट-** मांडवा येथे आज आदिवासी समाजाचे महान क्रांतिकारी वीर धरतीआबा बिरसा मुंडा व आदिवासी समाजातील पुरोगामी नेता शामा कोलाम यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांच्या जिवनकार्याचा गौरव करणारा फलक अनावरण सोहळा उत्साहात पार पडला. हा सोहळा युवा नेते ड. प्रतीक केराम यांच्या हस्ते संपन्न झाला. जयंतीच्या औचित्याने ग्रामस्थांनी एकत्र येत दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाला प्रतिष्ठित मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. यामध्ये महिला मोर्चाच्या अध्यक्षा सौ. सागरताई शिंदे, ओबीसी नेते बाबुराव केंद्रे, विहिंपचे अनिरुद्ध केंद्रे, ग्रामपंचायतचे सरपंच गोविंद आत्राम, ग्रामसेवक आरमाळकर, कृष्णकमल नाडकुंटीवार, उपसरपंच रविकांत वडलवार, देवराव येंड्रलवार, कमलबाई कुमरे, रामू धुर्वे, सरस्वती आत्राम, अविनाश मुंडे, अजय शिंदे यांचा समावेश होता. जयंतीचे औचित्य साधून आयोजित हा फलक अनावरण सोहळा अत्यंत यशस्वी आणि प्रेरणादायी ठरला

## श्रीनिकेतन शाळेत दिन उत्साहात

**नांदेड** -दीपक नगर तरोडा बुद्रुक भागातील श्रीनिकेतन प्राथमिक शाळेत भारतीय संविधान दिन विविध कार्यक्रम घेऊन उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ.सौ.एस.एन राऊत यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमात भारतीय संविधानाचे निर्माते महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संविधानाबाबत जनजागृती करण्यासाठी शाळा परिसरात विद्यार्थ्यांची प्रभात फेरी घोषणासह काढण्यात आली. शाळेतील विद्यार्थी गणेश वाघमारे, मंजू देशमुख, रसिका कुरूडे, श्रेया कांबळे, तनवी रणवीर, माही केदारे, प्रतीक गायकवाड, रोहन गजभारे, हर्षद कीर्तने, आदी विद्यार्थ्यांनी संविधान दिनावर प्रकाश टाकला. कार्यक्रमास शाळेतील शिक्षक अविनाश इंगोले, प्रल्हाद आयनेले,सुदर्शन कल्याणकर, बाळकृष्ण राठोड, गतीश मगरे, सौ. सुरेखा मरशिवने, बालवाडी शिक्षिका सौ. बुद्धांगना गोखले यांच्यासह पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा कार्य अध्यक्ष पदी मुन्तजीबोद्दीन यांची नियुक्ती

**नांदेड** -महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी नांदेड जिल्हा काँग्रेस कमेटी (उत्तर) च्या कार्यकारणीला मान्यता



दिली असून प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष ॲड. गणेश पाटील यांनी नवीन कार्यकारणी घोषीत केली आहे. नांदेड जिल्हा काँग्रेस कमेटी (उत्तर) च्या जिल्हा कार्य अध्यक्ष पदी पक्षातील माजी नगरसेवक मुन्तजीबोद्दीन यांची नियुक्ती करण्यात आली. मुन्तजीबोद्दीन गेल्या १४ वर्षापासुन नांदेड काँग्रेस कमिटीचे प्रवक्ता म्हणून काम पाहात आहेत. या नियुक्तीबद्दल मुन्तजीबोद्दीन यांनी नांदेडचे लोकप्रिय खासदार प्रा. रविंद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष (उत्तर) राजेश पावडे, नांदेड महानगर अध्यक्ष अब्दुल सत्तार यांचे आभार मानले आहे.

## अडचणीतल्या महिलांसाठी हक्काचा शासकीय आधार

**नांदेड** -महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागामार्फत नांदेड शहरात माता अनुसया शासकिय महिला वसतिगृह (राज्यगृह) ही शासकीय संस्था अनाथ, निराधार, निराश्रीत व अडचणीतल्या महिलांसाठी कार्यरत आहे. येथे १८ ते ६० वर्षांपर्यंत निवाऱ्याची आवश्यकता असणाऱ्या निराधार, विधवा, कुमारी माता, परित्यक्ता, आत्याचारीत महिलांसाठी विनाशुल्क अन्न, वस्त्र, निवारा, समुपदेशन व पुर्नवसनाची व्यवस्था केली जाते. त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी प्रशिक्षणाची व्यवस्था केली जाते. येथे आवश्यकतेनुसार कायदेशीर सल्ला व मदत दिली जाते, तसेच नियमित आरोग्य तपासणी केली जाते. १८ वर्षापुढील महिलांना मानसिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक दृष्ट्या सक्षम व स्वावलंबी बनविण्यासाठी तसेच पुनर्वसनाच्यादृष्टिने त्यांच्या विवाहाकरीता संस्थेत सर्वतोपरी प्रयत्न केले जातात. येथे शिक्षण व प्रशिक्षण घेत असलेल्या महिलांना आवश्यकतेनुसार प्रवेश दिला जातो. समस्याग्रस्त १८ वर्षापुढील महिलांनी संकटकाळी चुकीच्या मार्गानी न जाता समस्येचे निराकरण होईपर्यंत अल्प कालावधीसाठी या संस्थेत दाखल होण्याच्या फायदा घ्यावा. प्रवेशासाठी फोटोसह ओळखपत्र आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी कामकाजाच्या दिवशी दुपारी १ ते ३ यावेळेत अधीक्षक माता अनुसया शासकिय महिला वसतिगृह (राज्यगृह), हॉटेल भाईजी पॅलेसच्या पाठीमागे शिवाजीनगर उड्डाणपुल परिसर शिवाजीनगर नांदेड येथे किंवा दुरध्वनी क्रमांक ०२४६२-२३३०४४ संपर्क साधावा, असे आवाहन नांदेड येथील शासकीय महिला राज्यगृह अधीक्षक अ.सा.ठकरोड यांनी केले आहे.

# संविधान दिनी पालकांनी शाळेला ठोकले कुलुप

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २६ नोव्हेंबर-**



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सावरकरनगर ईस्लापूर येथे डेपुटेशनच्या नावावर रोज अध्यापणासाठी शिक्षक बदलून येत असल्यामुळे विद्यार्थ्यांचा भविष्य अंधारात जात असल्याकारणाने जो पर्यंत शाळेला कायमस्वरूपी शिक्षक देत नाही तो पर्यंत शाळा उघडणार नाही म्हणून संविधान दिनी सविधानाचे वाचन करूण सदरील शाळेला येथील पालकांनी कुलुप लावले.

किनवट तालुक्यातील इस्लापुर येथील जिल्हा परिषद प्रार्थमिक शाळेत गेल्या महिन्यापासून शाळेवर डेपुटेशनच्या नावावर रोज दोन दिवसात शिक्षक बदलुन येत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे यामुळे विद्यार्थाचे कोणतेच बेसिक पुर्ण होत नसल्याने येथील पालकांनी मुख्यकार्यकारी अधिकारी नांदेड, व गट शिक्षणाधिकारी किनवट यांच्याकडे कायमस्वरूपी शिक्षक द्या या मागणीचे निवेदन दिले होते. परंतु त्या निवेदनाची दखल न घेतल्यामुळे दिनांक २६ रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास संविधाना दिनाच्या दिवशी संविधानाचे वाचन करूण शिक्षण विभागाच्या या ढिसाळ कारभाराला वैतागुन अखेर पालकांनी शाळेला कुलूप ठोकले आहे .

शाळा १ ते ४ असुन किनवट तालुक्यात सदरील शाळा प्रथम क्रमांकावर असून येथे पट संख्या ४५ आहे .येथील विद्यार्थी वेगवेळ्या परीक्षेत गुणवत्ता प्राप्त करुण राज्य व देश पातळीवर गेलेले आहे आशा शाळेकडे शिक्षण विभागाचे दुर्लक्ष असल्यामुळे जनतेत शिक्षण विभागाच्या विरोधात तिव्र नाराजी वक्त होत आहे.

# 'तोट्यात' कोलमोडलेल्या नायगाव बाजार समिती सचिवांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. २६ नोव्हेंबर-**

नायगाव शहराची ओळख असलेली व तालुक्याची आर्थिक कणखर मानली जाणारी नायगाव कृषी उत्पन्न बाजार समिती आज दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभी आहे. बाजार समितीच्या आवारात सर्वत्र बांधकाम साहित्याचे ढीग, कचऱ्याचे साम्राज्य, दुर्गंधीचा फैलाव आणि प्रशासनाचे साफ दुर्लक्ष या सगळ्यामुळे परिसर अक्षरशः कचराकुंडी बनला आहे.

बाजार समितीच्या परिसरात अनधिकृतपणे बांधकाम साहित्य टाकले जात असून, येणारा-जाणारा नागरिक त्रस्त झाला आहे. अनेक ठिकाणी पावसाचे पाणी साचून चिखलाचे डबके तयार झाले आहेत. दुर्गंधी इतकी वाढली आहे की व्यापारी, शेतकरी व ग्राहक नाक दाबून परिसरातून मार्ग काढताना दिसत आहेत.

एवढी गंभीर परिस्थिती असूनही प्रशासक आणि सचिव यांचे याकडे संपूर्णतः दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. ज्यांच्या जबाबदारीवर बाजार समिती



उभी आहे, त्यांनाच या परिस्थितीची फिकीर नाही. मग सुधारणा कोण करणार? असा सवाल व्यापारी मंडळातून केला जात आहे. नायगाव बाजार समितीचा विस्तार संपूर्ण तालुकाभर पसरलेला असताना. ही समिती सतत तोट्यात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे.

**'जादा मुदत' सेवा चर्चेचा विषय**

नायगाव बाजार समितीचे सचिव संजय कदम यांची मागील पंधरा वर्षांपासून एकाच ठिकाणी झालेली 'जादा मुदत' सेवा आता चर्चेचा विषय ठरला आहे. बाजार समितीची स्थिती दिवसेंदिवस ढासळत असताना सचिवांना मात्र खुर्चीचा मोह सुटत नसल्याने या सर्व घडामोडींवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देण्याची गरज व्यक्त करण्यात येत आहे. काहींना हे 'ठराविक संरक्षण' असल्याचा संशय असून, पंधरा वर्षे एकाच पदावर टिकून राहणे हा प्रश्नचिन्ह निर्माण करणारा मुद्दा ठरत आहे. कमिटी बदलली, प्रशासक बदलले, पण सचिव बदलत नाहीत, हे नेमके कशाचे संकेत? असा सवाल व्यापारी संघटनांकडून केला जात आहे.

**पारदर्शक प्रशासनाची अंमलबजावणी आवश्यक**

बाजार समितीची सद्यस्थिती पाहता तातडीने स्वच्छता मोहीम, आर्थिक लेखापरीक्षण, अनधिकृत कचरा व साहित्य टाकण्यावर कठोर कारवाई आणि पारदर्शक प्रशासनाची अंमलबजावणी आवश्यक असल्याचे समाज विघटनातून सांगितले जात आहे. नायगाव तालुक्याचे आर्थिक केंद्र असलेली बाजार समिती आज अक्षरशः अस्तित्वाच्या संकटात सापडली असून, लवकरात लवकर सुधारणा न झाल्यास येणाऱ्या काळात परिस्थिती आणखी बिकट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# सिडको येथे संविधान दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २६ नोव्हेंबर-**

सिडको येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास संविधान दिनानिमित्त दिनांक २६ नोव्हेंबर रोजी महिला मंडळ व परिसरातील समाज बांधवांच्या वतीने अभिवादन करून संविधान उद्देशिकाचे वाचन करण्यात आले.तर सांची बुद्ध विहार संभाजी चौक सिडकोच्या वतीने संविधान रॅली सिडकोच्या मुख्य रस्त्याने काढण्यात आली.

लोकशाहीच्या आत्मा समजले जाणाऱ्या संविधान दिनानिमित्त २६ नोव्हेंबर २०२६ हा दिवस भारतीय इतिहासाचा स्वर्ण दिवस म्हणायला काही हरकत नाही. तो राष्ट्राच्या विचारसंस्कृतीला, नागरिकत्वाची गुणवत्ता, समाजाची नैतिकता आणि लोकशाहीचे आधारस्तंभ यांचे पुनर्मूल्यांकनांची आठवन करून देतो. यानिमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क सिडको येथे सिडको हडको परिसरातील महिला मंडळ व उपासक, उपासिका, बालक, बालिका यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या अभिवादन करून संविधान उद्देशिकाचे वाचन करण्यात आले. यावेळी महिलांनी संविधानाविषयी आपले मनोगत ही व्यक्त केले तर राहुलनगर वाघाळा येथिल जेष्ठ उपासक मारोती कांबळे यांनी संविधानावर सविस्तर माहिती दिली. याचवेळी सिडको येथील सांची बुद्ध विहार समितीच्या वतीने संविधान रॅली सिडकोतील मुख्य रस्त्याने काढण्यात आली. यावेळी सिडको हडको परिसरातील बौद्ध उपासक उपासिका बालक बालिका यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे घेण्यात आलेल्या संविधान दिन कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते प्रदीप हनवते यांनी केले होते. यावेळी भारतीय बौद्ध महासभेच्या केंद्रीय शिक्षिका सुजाता आढाव, कविता उघडेराव, वैशाली वाडे, सुनंदा दुधाटे, निरंजना लांडगे, ममता लांडगे, थोरात बाई, सूर्यवंशीबाई, सरपाते काकू, हटकर ताई, यांच्यासह मारुती कांबळे, विलास गजभारे, डि.के. कांबळे, बालाजी गायकवाड, गौतम जमदाडे, गोडबोले मामा यांच्यासह पत्रकार संभाजी सोनकांबळे यांची उपस्थिती होती.

## बाजीराव पाटील जाधव शिरूरकर यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. २६ नोव्हेंबर-**

तालुक्यातील शिरूर येथील रहिवासी व वयोवृद्ध शेतकरी बाजीराव शिवराम पाटील जाधव वय ९५ वर्षे यांचे शनिवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचे पार्थिवावर दुपारी शिरूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी रामदास पाटील , पत्रकार बी. व्ही.चव्हाण, गणेशराव पाटील जाधव तळेगावकर , प्राध्यापक उत्तम जाधव , सतीश पाटील मातुळकर, सूर्यवंशी आधीच अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. त्यांचे पश्चात एक मुलगा , चार मुली, सुना ,जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# रोटरी व इन्नरव्हील क्लबच्या वतीने 'तयारी अभ्यासाची' कार्यक्रम

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ नोव्हेंबर-**

रोटरी क्लब नंदीग्राम आणि इन्नरव्हील क्लबच्या वतीने दि.३० नोव्हेंबर रोजी डॉ.बी.जी. पाटील यांचा तयारी अभ्यासाची हा कार्यक्रम डॉ.शंकरराव चव्हाण नाट्यगृहात होणार असल्याची माहिती रोटरी क्लबच्या अध्यक्षा स्मिता गंदेवार, इन्नरव्हील क्लबच्या डॉ.मीनाक्षी पाटील व रोटरी क्लबच्या माजी अध्यक्षा पुष्पा गायकवाड यांनी दिली.

दि.३० नोव्हेंबर रोजी दुपारी बारा ते दोन व सायंकाळी सात ते नऊ वेळेत हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, शिक्षण अधिकारी माधव सलगर यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. विद्यार्थी व पालकांच्या शैक्षणिक भविष्यासाठी हा कार्यक्रम असून, यामध्ये अभ्यासामध्ये गोडी कशी निर्माण करावी, आत्मविश्वास एकाग्रता, स्मरणशक्ती कशी वाढवावी, यशस्वी होण्याचे मार्ग कोणते, गणित विषयात आवड कशी निर्माण करावी, पाठ केलेले विसरल्यास काय करावे, यासह अनेक मुद्यांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम निःशुल्क असून, पालकांसह विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ.बी.जी. पाटील यांनी यावेळी केले.

# मुदखेड नगर परिषदेची सत्ता राष्ट्रवादीच्या हाती द्या : आ. चिखलीकर

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २६ नोव्हेंबर-**

मुदखेड नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक दि.२ डिसेंबरला होणार असून या निवडणुकीत मतदारांनी राष्ट्रवादीच्या हाती सत्ता द्यावी पंचवीस वर्षात जे अशोकरावने केलं नाही ते आम्ही विकास करून दाखवू असे राष्ट्रवादीचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी मुदखेड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजीत पुतळ्याच्या ठिकाणी घेण्यात आलेल्या प्रचार सभेत बोलताना केले.

यावेळी बोलताना चिखलीकर म्हणाले की अशोकराव एक दाना पेरून



शंभर दाणे काढतात पैसे द्यायचे मतदान घ्यायचं आणि लाखो रुपये कमवायचे हा अशोकराव चा धंदा असून ते कुठेतरी थांबवलं पाहिजे त्यामुळे जनतेने यावेळी बदल घडून आणावा आणि राष्ट्रवादीचे नगराध्यक्ष पदाचे अधिकृत उमेदवार गिरजाबाई माधवराव पचलिंग यांना निवडून द्यावे तसेच त्यांच्यासोबतचे सर्व नगरसेवकांना घड्याळाच्या चिन्हावर मतदान करून निवडून द्यावं अशी विनंती यावेळी आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी जाहीर सभेत बोलताना केली.या जाहीर सभेला चांगला प्रतिसाद मिळाला असल्याचे दिसून आले.

याप्रसंगी माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, माजी आमदार अविनाश घाटे, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब रावणगावकर, नागोराव पचलिंग,पूजाताई व्यवहारे, यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# नागरी शिस्त ही सामूहिक जबाबदारी : भार्गवी मुंढे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ नोव्हेंबर-**

नागरी शिस्त राखण्याची जबाबदारी ही व्यक्ती, संस्था आणि प्रशासन या तिघांचीही संयुक्त आहे. सामूहिक जबाबदारीनेच समाज प्रगतिपथावर चालू शकतो, असे प्रतिपादन मुख्यमंत्री फेलो भार्गवी मुंढे यांनी केले.

नांदेड जिल्हा परिषदेच्या वतीने आज यशवंतराव चव्हाण सभागृहात संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी. बी. गिरी, समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र



आऊलवार, मुख्यमंत्री फेलो भार्गवी मुंढे, जिल्हा कृषी अधिकारी डॉ. नीलकुमार ऐतवडे, प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, नियोजन शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे, लेखाधिकारी निळकंठ पाचंगे, उपशिक्षणाधिकारी अवधूत गुंजेवार आदींची उपस्थिती होती.

मुंढे यांनी विविध राज्यांचे उदाहरण देत नागरी शिस्त व संविधानिक मूल्यांवर विवेचन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखविलेल्या मार्गाने सामूहिक जबाबदारी स्विकारली तर विकासाचा मार्ग सर्वांसाठी प्रशस्त होतो, असे त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाज कल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार यांनी केले. त्यांनी संविधान दिनाचे महत्त्व स्पष्ट करत २६ नोव्हेंबर ते २६ जानेवारी २०२६ या कालावधीत घर-घर संविधान उपक्रमांतर्गत प्रत्येक घरापर्यंत संविधान उद्देशिका पोहोचविण्यात येणार असल्याची माहिती दिली. प्रारंभी मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सभागृहातील सर्वांनी भारताच्या संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी मिलिंद व्यवहारे यांनी केले. या प्रसंगी जिल्हा परिषदेचे कर्मचारी रणजीत गजभारे यांच्या वतीने लाडूंचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे स्वीय सहाय्यक बालाजी नागमवाड, शुभम तेलेवार, शशिकांत गोले, गंगाधर माचनवाड, विजय वाघमारे, रणजीत गजभारे, सोपान खिल्लारे, राजेश जोंधळे, साईचरण मुगावे, शिवसांब चेडू, गजेंद्र श्रीरामवार, कुलदीप जोशी, बालाजी आवर्दे उज्वला गजभारे, शालिनी शेळके, प्रतिभा चोळाखेकर, वैशाली थोरात, मोहिनी जाधव, स्नेहल वळसे, पूजा सोनटक्के, सुरज नाईक, राजेश तावडे, अशोक पंडित आदींसह जिल्हा परिषदेचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्यातून उद्यानांचा विकास : आयुक्त

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ नोव्हेंबर :** विविध स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून शहरातील ग्रीन बेल्टमध्ये उद्यानांचा विकास करण्याची संकल्पना मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी मांडली.विविध संस्थानी त्यास पाठबळ दिले असून यामुळे शहरात आता उद्यानांचा विकास गतीने होणार आहे.

नागरिकांचे आरोग्य सुदृढ रहावे यासाठी शहरात उद्याने असणे गरजेचे आहे. पर्यावरणाच्या रक्षणासाठी देखील उद्यानांची आवश्यकता आहे. त्यामुळे शहरात उद्याने विकसित करण्यासाठी काय करता येईल? याची आयुक्त श्रीमती मानसी यांनी बुधवारी विविध ग्रीन बेल्टला भेटी देऊन पाहणी केली.या जागेवर उद्याने विकसित करण्याची संकल्पना त्यांनी मांडली. ही कल्पना मांडताच स्वयंसेवी संस्थानी त्यास पाठबळ व्यक्त केले.मनपाने त्यांना सहकार्य करण्याची ग्वाही दिली. या माध्यमातून शहरात एकूण ७ ग्रीन बेल्ट विकसित केले जाणार आहेत.मनपा स्वतः ३ ग्रीन बेल्ट विकसित करणार आहे. यामुळे आगामी काही दिवसात शहरातील ग्रीन बेल्ट मध्ये उद्याने विकसित झालेली दिसून येणार आहेत.त्यामुळे शहरातील पर्यावरण संवर्धन होण्यास मदत होणार असून शहराचा चेहरा-मोहरा बदलला जाणार आहे.



# लातूर शहरातील कारंजे बनले शोभेच्या वस्तू!





**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ नोव्हेंबर :** लातूर शहरातील तापमानातबदल व्हावा, वातावरणातील शुष्कता कमी व्हावी या उद्देशाने शहराच्या विविध भागात उभारण्यात आलेले अनेक कारंजे बंद पडले असून मुख्य रस्त्यावरील तहसिल कार्यालय, महात्मा गांधी चौक, महानगरपालिका कार्यालयापाठीमागीलनाना - नानी पार्क समोरील कारंजेही अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत असल्याचे पाहावयासमिळते. याकरिता मनपाचालाखोंचा निधी खर्च करण्यात आला असून कारंजे कालांतराने बंद पडणार असतील तर ती उभारण्यातचका आली ? असा सवाल लातूरच्या सुजाण नागरिकांतूनकेला जात आहे.

शहराच्या सौंदर्यात भर टाकण्याच्या दृष्टीने तसेच वातावरणातील शुष्कता, आर्द्रता कमी करण्याकरिता शहराच्या अनेक भागात शोभेचे कारंजे सुरु करण्यात आले होते. त्याकरिता मुख्य ठिकाणी आकर्षक कठडे, त्यावर विद्युत रोषणाईची सोयही करण्यात आली होती. जेव्हा ही कारंजे सुरु केली गेली तेव्हा काही काळ लातूरच्या सौंदर्यात निश्रि्चत भर पडली. हवेतील धुळीचेकण कमी करण्याकामीहीया उपक्रमाचा लाभ होईल असे सांगितले गेले होते. काही दिवस चालू राहिल्यानंतर पुन्हा कारंजे बंद पडले. नाही म्हणायला आता राजीव गांधी चौकातील राजीव गांधी यांच्या पुतळ्याजवळील कारंजे चालू अवस्थेत दिसतात. गांधी चौकातील कारंजे मागच्या अनेक दिवसांपासून बंद पडले आहेत.

लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने हाती घेण्यात आलेले असे अनेक उपक्रम सुरुवातीचे काही दिवस चालू ठेवले की ते पुन्हा बंद पडल्याची अनेक उदाहरणे आहेत. काही वर्षांपूर्वी शहरातील दुभाजकांच्या सुशोभिकरणाचाही उपक्रम हाती घेण्यात आला होता. त्याची जबाबदारी काही संस्था - संघटनांवर सोपविण्यात आली होती. संबंधित संस्थांनी आपल्याला नेमून दिलेल्या परिसरात स्वच्छता ठेवण्यासोबतचआपली जाहिरातहीकेली होती. मनपातील स्थायी समितीच्या सभेत याबाबतचानिर्णय घेण्यात आला होता. त्यावेळी स्थायी समितीच्या सभापतिपदीभारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नगरसेवक अशोक गोविंदपूरकर हे विराजमान होते. त्यांच्या दूरदृष्टीतून मनपाचानिधी खर्च न होता, इतर संस्था - संघटनांचे सहाय्य घेऊन शहर सुशोभित करण्याचा त्यांचा मनोदय होता. मनपा प्रशासनाने शहराच्या सुशोभिकरणासाठी प्रशासकाच्या काळातहीहा उपक्रम चालू ठेवायला काहीचहरकत नव्हती. त्यामुळे किमान शहराच्या सौंदर्यात बाधा आली नसती. कारंज्यांच्याबाबतीतहीमनपा प्रशासनाने हाचनिर्णय घेऊन ती नियमित चालू ठेवली असती तर शहराच्या बकालपणात बऱ्याच प्रमाणात घट झाली असती. एकंदर परिस्थितीतविद्यमान परिस्थितीत लातूर शहरातील कारंजे शोभेच्या वस्तू बनल्या आहेत, हे मात्र खरे.

# केवळ वळण रस्त्यालगतच नव्हे तर शहराच्या भरवस्तीतही टाकला जातोय उघड उघड कचरा

## लातूरच्या अस्वच्छतेचे विदारक चित्र; समोर दिसत असूनही मनपा प्रशासन बनतेय अनभिज्ञ

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ नोव्हेंबर :** लातूर शहरातील विविध भागात असणाऱ्या स्वच्छतेचे चित्र मनपा प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न होऊनही अद्याप त्याबाबत प्रशासनात जागृती झाल्याचे दिसत नाही. मागच्या तीन साडेतीन वर्षांच्या कार्यकाळात पदाधिकाऱ्यांशिवाय काम करण्याची सवय लागलेल्या मनपा प्रशासनाला शिस्त येणार तरी केव्हा आणि नागरी समस्यांची पोटतिडकीने सोडवणूक होणार तरी केव्हा? असा आर्त टाहो फोडण्याची पाळी आता लातूरकरांवर येऊन ठेपल्याचे पाहावयास मिळत आहे. शहरालगतच्या वळण रस्त्यासोबतच आता शहरातील भर वस्तीतही कचरा टाकला जात असल्याचे चित्र पाहायला मिळते.







लातूर शहराला मागच्या काही काळापासून विविध समस्यांनी जणू व्यापून टाकले आहे. आपल्या समस्यांच्या सोडवणुकीसाठी सामान्य नागरिकांनी महापालिकेत कितीही खेट्या मारल्या तरी त्यावर कोणताही निर्णय वेळेत घेतला जात नसल्याचे सर्वज्ञात आहे. सगळ्यात महत्वाचा प्रश्न नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित आहे. शहर व शहराचा परिसर स्वच्छ असेल तरच नागरिक आरोग्यदृष्टया सदृढ राहू शकणार आहेत. शहराच्या विविध भागात कचरा नेण्यासाठी घंटा गाड्यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. नागरी वस्त्यातील कचरा एखाद दिवसाचा अपवाद वगळता उचललाही जातो. परंतु अनेक भागात घंटा गाड्या फिरकतही नाहीत. कंत्राटी पध्दतीमुळे असे प्रकार आता वारंवार घडताना दिसत असल्याचे बोलले जाते.

लातूर शहराच्या चारही बाजूंच्या वळण रस्त्यावर सगळीकडे मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जात असल्याची बाब काही नवीन नाही. याबाबत माध्यमांनी अनेकदा मनपाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करूनही काही उपयोग झाल्याचे दृष्टीपथास येत नाही. प्लास्टिकचा कचरा, पाण्याच्या रिकाम्या बाटल्या, अन्य प्लास्टिकचे साहित्य असा कधीही नष्ट न होणारा आणि पर्यावरणाला बाधक असणारा कचरा शहराच्या अनेक भागात इतस्ततः विखुरलेला पाहावयास मिळतो. वळण रस्त्यावर तर ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिगच्या ढीग पडलेले पाहायला मिळतात. वास्तविक पाहता वळण रस्ते वस्तीपासून दूर असल्याने नागरिक त्याचा वापर मोकळ्या हवेत फिरण्यासाठी, हवापालटासाठी करण्याची मनीषा बाळगून असतात. पण, दुर्दैवाने सामान्य नागरिकांची ती मनीषाही मागच्या अनेक वर्षांपासून पूर्ण होताना दिसत नाही. कारण अशा प्रकारचा कचरा टाकला जात असल्याने वळण रस्ते आता दुर्गंधीची भांडारे बनताना आढळून येतात. वळण रस्त्यावरून जाताना लोकांना आता शहराच्या एखाद्या बकाल वस्तीतून जाताना ज्याप्रमाणे नाकाला रुमाल लावून जावे लागते, तसे जावे लागताना दिसतेय.

शहरातील मोक्याच्या ठिकाणी अगदी शाळा - महाविद्यालयांसमोरील रस्त्यावरही मोठ्या प्रमाणात कचरा साठलेला दिसतो. रस्त्यालगत कोठेही म्हणजे एखादा कोपरा वा विजेच्या खांबाजवळील मोकळ्या जागेत खुलेआम कचरा टाकला जात असल्याचे दिसून येते. अगदी उदाहरणादाखल सांगावयाचे झाल्यास शहरातील महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयाजवळील महात्मा बसवेश्र्वरांच्या पुतळ्यालगतच्या जागेत तसेच उस्मानपुऱ्यातून मनपा कार्यालयाकडे जातानाच्या कोपऱ्यावरील मनपा कॉम्प्लेक्सच्या जवळही असाच कचरा टाकण्यात येत असल्याचे वारंवार दिसून येते. लातूरच्या अस्वच्छतेचे हे विदारक चित्र अनेकांच्या काळजीत भर टाकणारे आहे. त्यामुळे मनपा प्रशासनाने आता अगोदर ज्याप्रमाणे शहराच्या अनेक भागात कचरा कुंड्या उपलब्ध करून दिल्या जात असत, त्याप्रमाणे नजीकच्या काळात कोठेही कचरा टाकण्याची नागरिकांची सवय बंद करण्यासाठी कचरा कुंड्या उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी मागणी वाढीस लागली आहे.

# केशवराज'मध्ये विविध उपक्रमांनी संविधान दिन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ नोव्हेंबर :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि. २६ नोव्हेंबर २०२५ बुधवार रोजी संविधान दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधानाची प्रत यांच्या पूजनाने करण्यात आली. याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या तथा भारतीय स्त्रीशक्ती शाखा लातूरच्या सदस्या डॉ. शैलजा हासबे, भारतीय स्त्रीशक्ती शाखा लातूरच्या राष्ट्रीय सदस्या अनघा अंधोरीकर, भारतीय स्त्रीशक्तीच्या शाखा लातूरच्या उपाध्यक्षा प्रेमा बाहेती, विद्यालयाच्या पर्यवेक्षिका राजश्री कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी विषय मांडणी करताना प्रमुख वक्त्या शैलजा हासबे यांनी संविधानाची रचना सांगितली. विद्यार्थ्यांना संविधानातील आपल्या कर्तव्यांची ओळख करून दिली. देशाचे उत्तम नागरिक म्हणून जबाबदारीने कार्य पार पाडावे, स्वच्छतेची नैतिक जबाबदारी पार पाडावी, राष्ट्रीय मालमत्तेचा आदर करावा, महिलांचा आदर करावा, ६ ते १४ वयोगटातील प्रत्येकापर्यंत शिक्षण पोहोचावे, अशा अनेक कर्तव्यांची माहिती याप्रसंगी त्यांनी दिली.




याप्रसंगी विद्यालयातली इ. ९ वी अ वर्गातील विद्यार्थ्यांनी संविधानावर आधारित तयार केलेल्या भित्तिपत्रकाचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. तसेच शासन परिपत्रकानुसार संविधान दिनानिमित्त विद्यालयात संविधान प्रभात फेरी, संविधानावर आधारित प्रश्नमंजुषा, चित्रकला प्रदर्शनी, मानवी साखळी या विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व स्वागत विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक जितेंद्र जोशी यांनी केले. संगीत शिक्षक संतोष बीडकर यांनी 'यह कल कल छल छल बहती गंगा धारा' हे देशभक्तीपर गीत सादर केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन वनमाला कलुरे यांनी केले तर विष्णू इरळे यांच्या संविधानाच्या उद्देशकेने कार्यक्रमाची सांगता झाली.

ज्ञानोपासक मंडळांतर्गत संपन्न झालेल्या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली रेणुका गिरी, श्रीमती तेजस्विनी सांजेकर, अश्विनी स्वामी, संविधान दिनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे प्रमुख व्यंकटेश माने, प्रयागराज गरुड, अशोक रायते, अमोल गायकवाड, सुवेद सूर्यवंशी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# लातुरात अभिजात इंटरनॅशनल शॉर्ट फिल्म फेस्टिवलचे आयोजन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ नोव्हेंबर :** अभिजात फिल्म सोसायटी व दयानंद शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दुसरा अभिजात आंतरराष्ट्रीय लघु चित्रपट महोत्सव दि.१६, १७ व १८ डिसेंबर २०२५ रोजी लातूर येथील दयानंद सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे.

गतवर्षीप्रमाणे याही वर्षी चित्रपती व्ही. शांताराम यांच्या नावाने या महोत्सवातील विजेत्या लघुपटास प्रथम पारितोषिक देण्यात येणार असून लघुपट निर्मितीच्या इतर एकूण २५ विभागात वेगवेगळी पारितोषिके देण्यात येणार आहेत. या स्पर्धेत माहितीपट, ॲनिमेशन आणि व्हिडीओ साँग्सचा देखील समावेश असणार आहे.

यंदा भारत, युनायटेड स्टेट्स, युनायटेड किंगडम, जर्मनी, स्पेन, इटली, रशिया, मलेशिया, कॅनडा, ऑस्ट्रिया, सौदी अरेबिया आणि इराण इ. देशातून मराठी, हिंदी, इंग्रजी, मालवणी, तेलुगू, तमिळ, बंगाली, कन्नड, आसामीस, मल्ल्याळम, पंजाबी, राजस्थानी, इटालियन, जर्मन, टर्किश, स्पॅनिश, चायनिज (कँटोनीज), रशियन, कॅटलन, फ्रेंच या भाषांमधून सुमारे २५० लघुपटांनी सहभाग नोंदवलेला असून यातील निवडक ८० लघुपट या महोत्सवात दाखवण्यात येणार आहेत. या महोत्सवाचे परिक्षक म्हणून संतोष पाठारे आणि रघुनाथ फडणीस हे ज्येष्ठ समीक्षक काम बघणार आहेत.

या महोत्सवात लघुपट निर्मिती तंत्राबरोबरच इतर विषयांवर अभ्यासपूर्ण व्याख्याने व परिसंवाद देखील होणार आहेत. लघुपटनिर्मितीसाठी इच्छुक लेखक-दिग्दर्शकांसाठी निर्मिती सहकार्य करण्यासाठी व त्यांच्या संकल्पनांना पाठबळ देण्यासाठी 'पीच टँक' हा आगळा उपक्रम यानिमित्ताने राबवण्यात येणार आहे. नि:शुल्क असलेल्या या महोत्सवाचा लातूरकर रसिक प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन अभिजात फिल्म सोसायटीचे जितेंद्र पाटील, प्रा डॉ. विश्र्वास शेंबेकर, डॉ. स्वप्नील देशमुख आणि धनंजय कुलकर्णी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# लातुरात संविधान सन्मान भव्य ५०० फूट तिरंगा रॅली संपन्न

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ नोव्हेंबर :** भारतीय संविधान अमृत महोत्सव वर्ष आणि संविधान दिना निमित्त संविधान सन्मान समिती, यांच्या वतीने शहरात भव्य ५०० फूट लांबीच्या संविधान सन्मान तिरंगा ध्वज रॅलीचे आयोजन करण्यात आले. पु. भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेली ही रॅली उत्साहात आणि देशभक्तीच्या भावनेने ओतप्रोत भरलेली होती.

रॅलीचा शुभारंभ भिक्खू पय्यानंद थेरो, भंते बोधिराज, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, महानगरपालिकेच्या आयुक्त मानसी मीना, तसेच समाज कल्याण उपायुक्त अविनाश देवसटवार सह आयुक्त यादव कांबळे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला. रॅलीची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून होत संविधान चौक येथे समारोप करण्यात आला. शहरातील विविध विद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी पथनाट्य, झांज पथक, तसेच महापुरुषांच्या वेशभूषेत आकर्षक प्रात्यक्षिके सादर करून रॅलीला विशेष रंगत आणली. ५०० फूट तिरंग्याखाली निघालेली ही रॅली नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेत होती.




संविधान चौकात बोलताना पु.भिक्खू पय्यानंद थेरो म्हणाले, या अमृत महोत्सवी वर्षात आपण सर्वांनी एकच संकल्प करायला हवा भारतीय संविधानावरील निष्ठा कधीही ढळू देणार नाही, संविधानातील मूल्ये आपल्या आचरणात आणू, आणि प्रत्येक नागरिकापर्यंत संविधानाची जागृती पोहोचवू. शासनानेही संविधान वर्ष अधिक व्यापक पातळीवर जनसहभागातून साजरे करावे, संविधानाचे महत्त्व घरोघरी पोहोचवावे व युवकांना लोकशाही मूल्यांची भक्कम जाण निर्माण करून द्यावी. आजची रॅली हा त्याच जागृतीचा एक सुंदर प्रारंभ आहे. आपण सर्वजण संविधानाचे संरक्षक आहोत आणि ही जबाबदारी अभिमानाने पार पाडली पाहिजे.



रॅलीचा समारोप संविधान चौकात संविधान उद्देशिका वाचन आणि राष्ट्रगीताने करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. यु. डी. गायकवाड यांनी केले, तर आभार निलेश बनसोडे यांनी मानले.या रॅलीमध्ये कालिदास माने, बसवंत उबाळे, सुशील चिकटे, डॉ विजय अजनीकर, अशोक देडे, शोभा सोनकांबळे, आशा चिकटे, विशाल वाहुळे, प्रा सतिश कांबळे, उत्तम कांबळे, सुरेश सोनकांबळे मिलिंद धावारे, आदीजन शहरातील विविध क्षेत्रातील विविध शाळांचे विद्यार्थी, संविधानप्रेमी नागरिक, तसेच महाविहार धम्मसेवक ग्रुपचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# पं. मुकेश जाधव यांना यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्कार जाहीर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ नोव्हेंबर :** लातूरचे सुपुत्र, जागतिक ख्यातीचे तबलावादक आणि पंडित शांताराम चिगरी गुरुजींचे पट्टशिष्य पंडित मुकेश जाधव यांना यावर्षीचा यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्कार जाहीर झाला आहे. अंबाजोगाई येथे आयोजित यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहात उद्या दि. २७ नोव्हेंबर रोजी या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे.



हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत क्षेत्रात तबला वादनाच्या माध्यमातून पं. मुकेश जाधव यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. विविध देशात त्यांनी तबला वादनाचे असंख्य कार्यक्रम सादर करून भारतीय संगीताची पताका उंचावली आहे. त्यांच्या या योगदानाची दखल घेत प्रतिष्ठेचा हा पुरस्कार प्रदान होत असल्याचे आयोजकांनी सांगितले. समारोहात पुरस्कार वितरणानंतर रात्री ८ वाजता पंडित मुकेश जाधव यांचे स्वतंत्र तबला वादन आयोजित करण्यात आले आहे. संगीतप्रेमींसाठी हा अविस्मरणीय अनुभव ठरणार आहे.

पंडित मुकेश जाधव यांचा गौरव होत असल्याबद्दल डॉ. संदीपान जगदाळे, प्रा. अंगद गायकवाड, सोनू डगवाले, संजय सुवर्णकार, मीनाक्षी कोळी व विजय श्रीमंगले यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. या समारोहाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाचे आयोजक दगडू लोमटे यांनी केले आहे.